

# सुखी जोडपे व इतर कथा

## सॉमरसेट मॉम

## वृषाली जोशी

# सुखी जोडपे व इतर कथा

मूळ लेखक – सॉमरसेट मॉम

मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी

सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.

दूरभाष ९९२१७४६२४५

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# सुखी जोडपे व इतर कथा

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

**पण**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# सुखी जोडपे व इतर कथा

लेखक : सॉमरसेट मॉम

अनुवादक: डॉ. वृषाली जोशी

चलभाष : ९९२१९७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

## प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : २० नोव्हेंबर २०२२

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# सुखी जोडपे व इतर कथा

## लेखक सॉमरसेट मॉम यांची माहिती

## कथानुक्रम


1. सुटका
2. वचन
3. मण्यांची माळ
4. अद्भुतरम्य तरुण स्त्री
5. सुखी जोडपे
6. दृष्यमानता आणि खरेपणा
7. अँटीबेसच्या तीन जाड बायका

# सॉमरसेट मॉम



इंग्लीशमधील सर्वाधिक लोकप्रिय क्लासिक लेखकांमध्ये सॉमरसेट मॉमचे नाव घेतले जाते. त्याच्या कथांवरून अडतीस सिनेमे, शेकडो नाटके यांची निर्मिती झाली. त्यांच्या कथा आणि कादंबऱ्या यांच्या काही हजार प्रती छापल्या गेल्या. जगातील जवळपास सर्व .भाषांमध्ये त्यांच्या कथांचे अनुवाद झाले. त्यांच्या कथांवरून निर्मिती झालेल्या सिनेमांची यादी भली मोठी आहे..

# The escape

# सुटका



माझी खात्री आहे, की एखाद्या बाईने एकदा ठरवले, की या माणसाशी लग्न करायचे, तर ताबडतोब विमानाने लांबवर निघून जाण्याशिवाय त्याला दुसरा काहीही पर्याय नसतो. पण नेहमीच असे होते, असे नाही. एकदा माझ्या एका मित्राने त्याच्यासमोरील अटळ असा फास बघून [संकटापासून लगेच पळ काढायची गरज असल्याने, त्याचे सामान म्हणजे फक्त टूथब्रश घेऊन] एका बंदरापासून बोटीने वर्षभर जगभर प्रवास केला. तो केल्यावर आता आपण सुरक्षित आहोत, असे समजून, [बायकांचे प्रेम आणि विश्वास सतत

बदलत असतो] आणि वर्षभरात ती मला विसरली असेल, असे समजून,] तो त्याच बंदरावर उतरला. त्याने त्याला आनंदाने हात करणारी पहिली व्यक्ती कोण पाहिली असेल, तर जिच्यापासून त्याने पळ काढला होता, तीच ती छोटीशी बाई होती. अशा परिस्थितीतील सुटका करून घेतलेला एक माणूस मला माहिती आहे. त्याचे नाव चॅरिंग. तो रुथ बार्लोच्या प्रेमात पडला, तेव्हा काही तो फार तरूण नव्हता. त्याला काळजी घेण्याचा अनुभव होता. पण रुथ बार्लोकडे एक मोठी देणगी होती, [की त्याला गुण म्हणावे?] ज्यामुळे बरेचसे पुरुष तिला विरोध करू शकत नसत. यामुळेच रॉजर त्याची सर्वसाधारण विचारशक्ती व शहाणपणा हरवून बसला. तो सहज व झटपट आजारी पडल्यासारखा वहावत गेला. ही दयनीय भेट होती. मिसेस बार्लो दोनदा विधवा झालेली होती. तिचे डोळे मोठे व काळे होते. आणि मी पाहतो आहे तेव्हापासून, ते सतत फिरत असतात. ते सतत असे असतात की त्यातून कधीही अश्रू टपकू लागतील. ते असे सुचवतात, की जग तिच्यासाठी फार काही आहे. तुम्हाला असे वाटेल, की कोणालाही सहन करायला लागेल, त्यापेक्षा तिचे बिचारीचे दुःख फार मोठे आहे. जर रॉजर चॅरिंगसारखे, तुम्ही बळकट, जाड आणि भरपूर पैसेवाले असता, तर तुम्हाला स्वतःशी असे म्हणणे भागच पडले असते, की जीवनातील कठीण संकटांपासून, या बाईचा बचाव केला पाहिजे. या मोठ्या, सुंदर डोळयामधील उदासीनता घालवणे किती चांगले असेल! मला रॉजरकडून समजले, की सगळ्यांनी तिला वाईट वागवले होते. ती अशी दुर्दैवी बाई होती, की तिच्या बाबतीत, काहीही चांगले कधीही झाले नव्हते. जर तिने लग्न केले, तर नवरा तिला मारत असे. जर तिने

शेअरचे काही व्यवहार करण्यासाठी दलाल गाठला, तर तो तिला फसवत असे. जर तिने कामाला स्वयंपाकीण ठेवली, तर ती पित सुटे. तिने छानसे कोकरू पाळले, तर ते नक्की मरे.

रॉजरने शेवटी त्याच्याबरोबर लग्न करण्यासाठी तिचे मन वळवल्याचे मला सांगितले, तेव्हा मी तो आनंदी व्हावा अशी इच्छा प्रगट केली.

तो म्हणाला, "मला वाटते, तुम्ही चांगले मित्र व्हाल. तुला माहिती आहे का, ती तुला थोडी घाबरते. तिला वाटते, तू दुष्ट आणि बेपर्वा आहेस."

"तिला असे का वाटते, कुणास ठाऊक."

"तुला ती आवडते, बरोबर?"

"खूपच."

"त्या बिचारीचा वेळ फार वाईट चालला होता. मला तिची फार कीव आली."

"मी म्हणालो, "हो."

याहून कमी मी बोलू शकलो नाही. ती मूर्ख असल्याचे मला माहिती होते आणि मी विचार केला, ती गुप्त बेत आखणारी असून, माझा स्वतःचा असा विश्वास होता, की ती नखासारखी कडक आहे. मी तिला पहिल्यांदा भेटलो, तेव्हा आम्ही एकत्र ब्रिज खेळलो. ती आणि मी भागीदार असतांना, ती दोन वेळा माझे चांगले कार्ड तिने जास्त छान खेळीने खेळले.

मी एखाद्या देवदूतासारखा वागलो. पण मी कबूल करतो, की मी विचार केला, कुणाच्या डोळ्यातून पाणी येणार असेल, तर ते तिच्यापेक्षा

माझ्या डोळ्यातून यावे. जेव्हा संध्याकाळच्या सुमारास, मी खूप पैसे हरलो, तेव्हा ती म्हणाली, की ती मला चेक पाठवेल. आणि कधीच पाठवला नाही. मला असा विचार केल्यावाचून रहावेना, की आम्ही परत भेटलो, तेव्हा तिने नव्हे तर मी दयनीय भाव दर्शवायला हवे होते.

रॉजरने तिची त्याच्या मित्रांशी ओळख करून दिली. त्याने तिला छान रत्ने दिली. त्याने तिला इकडे तिकडे फिरवले. लगेचच त्यांच्या लग्नाची घोषणा करण्यात आली. रॉजर खूप आनंदी होता. तो चांगला वागत होता आणि त्याच वेळेस, त्याच्या खूप मनात असलेले देखील करत होता. ही वेगळीच परिस्थिती होती. तो स्वतःवर जास्तच खूश असला, तर त्यात काही नवल नव्हते.

मग अचानक तो प्रेमातून बाहेर पडला. का ते मला समजले नाही. त्याला तिच्या संभाषणाचा कंटाळा आला असावा. कारण ती काहीच संवाद साधत नव्हती. कदाचित तिची दयनीय दृष्टी त्याच्या हृदयतारा छेडू शकत नसेल. त्याचे डोळे उघडे होते आणि पुन्हा तो त्याच्या जगातील शिष्ट माणूस झाला. त्याच्या लक्षात आले, की रुथ बार्लोने त्याच्याशी लग्न करायचे ठरवले आहे. आणि त्याने अशी शपथ घेतली, की काही झाले, तरी तो रुथ बार्लोशी लग्न करणार नाही. पण गोंधळून त्याला काय करावे, ते कळत नव्हते. आता त्याच्या भावना त्याच्या काबूत होत्या. त्याला स्पष्टपणे दिसले, की तो त्या बाईशी संपर्कात आला होता आणि आता जर त्याने तिला त्याला सोडायची विनंती केली, तर ती [ तिच्या विनवणीवजा पद्धतीने] तिच्या

जखमी भावना खूप वाढवून उघड्या करेल. शिवाय स्त्रीचे प्रेम अव्हेरणे, हे पुरुषासाठी लाजीरवाणे ठरते. तो वाईट वागला, असा विचार लोक करतात.

रॉजरने स्वतःचे मंडळ नेमले. त्याने शब्दाने किंवा हावभावांनीदेखील असे दाखवले नाही, की त्याच्या रुथ बार्लोबद्दलच्या भावना बदलल्या आहेत. तो तिच्या इच्छांकडे लक्ष देत राहिला. तो तिला जेवायला बाहेर नेत राहिला. ते एकत्र खेळायला जात. तो तिला फुले पाठवे. तो तिच्याबद्दल सहानुभूती बाळगून होता व छान वागत होता. त्यांनी असे ठरवले की त्यांना पाहिजे तसे घर मिळाल्याबरोबर त्यांनी लग्न करावे. कारण तो मोठ्या सार्वजनिक खोलीत रहात असे आणि ती फर्निचर असलेल्या खोलीत. ते त्यांना पाहिजे तशी जागा शोधत राहिले. जागांचा दलाल त्याला निरोप पाठवी व तो रुथला घेऊन, खूप जागा बघायला जात असे. पण समाधानकारक काही मिळणे दुरापास्त होते. रॉजरने अजून दलाल नेमले. तो घरामागून घरे बघत राहिला. ते तळघरापासून ते छपराखालील प्रत्येक खोलीपर्यंत जागांची कसून तपासणी केली. कधी त्या फार मोठ्या असत, तर कधी लहान असत. कधी त्या बाजारापासून फार लांब असत. तर कधी बाजाराच्या अती गर्दीत असत. कधी त्या फार महाग असत. तर कधी त्यात बरीच दुरुस्ती करायची गरज असे. कधी त्या फार हवेशीर असत. तर कधी कोंदट असत. कधी त्या फार अंधाऱ्या असत. तर कधी उजाड असत. रॉजरला जागेमध्ये नेहमीच काहीतरी दोष दिसत असे. तो खूष होणे अवघड होते आणि तसे घर शोधणे अवघड होते. योग्य घराशिवाय तो रुथला त्यात रहायला सांगू शकत नव्हता. घर शोधणे हा दमवणारा अनुभव होता. हल्ली रुथ चिडचिड करू लागली होती.

रॉजरने तिला धीर धरायला सांगितले. कुठेतरी त्याना पाहिजे तसे घर, असणारच होते. थोडी चिकाटी ठेऊन, त्यांना ते सापडले असते. त्यांनी शेकडो घरे पाहिली. त्यांनी हजारो पायऱ्या चढल्या. त्यांनी अनेक स्वयंपाकघराची तपासणी केली. रुथ दमली. एकदा तिचा स्फोट झाला. ती म्हणाली, “तुझे असेच चालू  राहिले, तर मला विचार करावा लागेल. अनेक वर्षे आपले लग्नच होणार नाही.”

तो उत्तरला, “असे म्हणू नकोस. मी तुला वाट बघायची विनंती करतो. माझ्याकडे आताच दलालांकडून मी फक्त ऐकलेल्या घरांची नवीन यादी आली आहे. त्यात निदान साठ तरी घरे आहेत.”

ते परत घराच्या शोधात निघाले. अजून अजून घरे बघितली. दोन वर्षे ते घरे बघत होते. रुथ शांत असून, रागीट झाली. तिचे सुंदर पण दयनीय डोळे आनंदीपणा सोडून दुःखी भाव दाखवू लागले. माणसाच्या सहनशक्तीला मर्यादा आहेत. मिसेस बार्लोकडे एखाद्या देवदूताइतका धीर होता. पण शेवटी ती चवताळून उठली. तिने विचारले, “तुला माझ्याशी लग्न करायचे आहे, की नाही? तिच्या आवाजात चांगलाच कडकपणा होता. पण त्याने उत्तरातील सभ्यता सोडली नाही. “अर्थात मला करायचे आहे. घर सापडल्याबरोबर आपण लग्न करू. तसेही मी आताच आपल्याला आवडेल अशा घरासंबंधी ऐकले आहे.”

“मला आता अजून घरे बघायची इच्छा उरलेली नाही.”

“बिचाऱ्या प्रिय रुथ, मला वाटते तू दमलेली दिसत आहेस.”

रुथ बार्लो अंथरुणावर पडली. ती रॉजरला भेटेना. तिच्या रहायच्या ठिकाणी तिची चौकशी करणे, आणि तिला फुले पाठवत रहाणे, एवढे तो करत राहिला. तो चिकाटी असलेला शूर नायक होता. रोज तो तिला लिहून कळवे, की आज त्याला एक घर बघायला जायचे आहे. असा एक आठवडा गेला आणि त्याला पत्र मिळाले.

रॉजर,

मला वाटत नाही, की तुझे माझ्यावर प्रेम आहे. माझी काळजी घ्यायला उत्सुक असलेला एकजण मला भेटला आहे. आज मी त्याच्याशी लग्न करत आहे.

रुथ


त्याने विशेष निरोप्याबरोबर तिला उत्तर पाठवलेः

तुझ्या निरोपाने मला हलवले. मी हा धक्का कधीच सहन करू शकणार नाही. पण तुझे सुख हे मला प्रथम अभिप्रेत आहे. मी तुला या पत्राबरोबर सात घरांचे पत्ते पाठवत आहे. त्यातील एक तुला नक्कीच आवडेल.

रॉजर

# The Promice

# वचन




माझी बायको जराही वक्तशीर नाही. त्यामुळे मी जेव्हा तिच्याबरोबर क्लॉरिजमध्ये जेवण घ्यायचे ठरवले, तेव्हा मी दहा मिनिटे उशीरा पोचलो आणि ती न सापडल्यामुळे आश्चर्यचकित झालो नाही. मी माझ्यासाठी पेयाची मागणी केली. खूप गर्दी होती आणि फक्त दोन तीन टेबले रिकामी होती. काही

लोक त्यांचे जेवण झाल्यावर कॉफी पीत होते. इतर माझ्यासारखे लोक कोरड्या मार्टीनिशी खेळत बसले होते. आत्मविश्वासपूर्ण पुरुषांमध्ये, उन्हाळ्याचे फ्रॉक घातलेल्या बायका आनंदी व सुंदर दिसत होत्या. पण मला आता थांबायच्या असलेल्या पाऊण तासासाठी पुरेशी रुचीपूर्ण वाटेल, अशी कुणी दिसत नव्हती. त्या दिसायला बारीक व आल्हादक होत्या. त्यांनी छान कपडे केले होते आणि सहजतेने, काही काळजी नसल्यासारख्या वावरत होत्या. पण त्यातील बऱ्याचशा एकसारख्याच वाटत होत्या आणि मी त्यांना चौकस नजरेने पहाण्याऐवजी सहन करत होतो. दोन वाजले आणि मला भूक लागली. माझी बायको मला म्हणाली, ती निळसर हिरवा रत्नखडा व घड्याळ घालू शकत नाही, कारण रत्नखडा हिरवा झाला आहे आणि घड्याळ बंद पडले आहे. आणि याबद्दल ती तिच्या पापी नशीबाला दोष देते. मला रत्नखड्याबद्दल काही बोलायचे नाही. पण मी कधीकधी विचार करतो, की घड्याळाला तिने इजा केली, तर ते बंद पडू शकते. मी असा विचार करत असतांना, एक वेटर असे [ जसे काही शब्द सुचवत आहेत, त्यापेक्षा काही वाईट होण्याचा निरोपाचा अर्थ असल्याचे ] सांगत आला की एका बाईने फोन करून सांगितले, की ती घरी अडकली आहे आणि तुमच्याबरोबर जेवण घेऊ शकत नाही.

मी कां कू करू लागलो. इतक्या गर्दीच्या ठिकाणी एकट्याने खाणे फारसे सुखावह नव्हते. पण क्लबमध्ये जायला उशीर झाला होता. मग मी ठरवले, की मी आहे तिथेच राहिलेले बरे. मी जेवायच्या हॉलमध्ये गेलो. त्या

हॉलमधील जेवणाने मला कधीच विशेष समाधान दिले नव्हते. [ जसे इतर खूप पट्टीच्या खाणाऱ्या लोकांना दिले होते, ] फॅशनेबल हॉटेलमधील वेटर्सना असली नावे माहिती होती. पण यावेळेस माझे कमी दगडी डोळ्यांनी स्वागत केले गेले.

हॉटेलच्या व्यवस्थापकाने पडेल चेहऱ्याने मला सांगितले, की रिकामे टेबल नाही आहे. मी नाईलाजाने मोठ्या जेवायच्या हॉलकडे पाहिले. आणि अचानक मला एक ओळखीचा चेहरा दिसला. एलिझाबेथ व्हरमॉन्ट माझी जुनी मैत्रिण होती. ती हसली आणि ती एकटीच असल्याचे दिसल्याने मी तिच्याकडे गेलो.

मी विचारले, "तुम्ही एका भुकेलेल्या माणसावर दया करून त्याला इथे बसून द्याल का?

"ओहो, नक्की. पण माझे जवळ जवळ होत आले आहे."

ती एका मोठ्या खांबाशेजारील लहानशा टेबलाशी बसलेली होती. जेव्हा मी माझी जागा घेतली, तेव्हा मला जाणवले, की आम्ही गर्दीपासून दूर अशा साधारण खासगी ठिकाणी बसलो होतो. मी म्हणालो, "मी नशीबवान ठरलो. मला भुकेने चक्कर यायला लागली होती."

ती पटल्यासारखी हसली. पण त्यामुळे तिचा चेहरा अचानक उजळून निघाला नाही, तरीपण त्यावर थोडा तरी गोडवा पसरला. तो क्षणभर तिच्या ओठांवर हो नाही करत राहिला. मग चकाकणाऱ्या डोळ्यांकडे गेला आणि तिथे हळुवारपणे रेंगाळला.

एलिझाबेथ व्हरमॉन्ट सर्वसामान्य होती, असे कोणीच म्हणू शकले नसते. ती मुलगी असतांना मला माहिती नव्हती. पण खूपजणांनी मला सांगितले होते, की तेव्हा ती इतकी सुंदर होती, की एखाद्याच्या डोळयात अश्रू आले असते. आणि माझा यावर नक्कीच विश्वास बसला. कारण आता, पन्नाशीची असली, तरी ती अद्वितीय होती.

अनेकांचा कलिजा खलास करणारे तिचे सौदर्य म्हणजे तारुण्याचे एक क्षुल्लक, बिनवासाचे, मंद असे उमलणारे आवाहन होते. मला ते भडक मेकपने रंगवलेले एकसारखे चेहरे आवडत नाहीत. मला वाटते मूर्ख स्त्रिया त्यामुळे त्यांचे हावभाव न दिसणारे करतात आणि त्यांचे व्यक्तीमत्व पावडर, लाली व लिपस्टिकने धूसर करतात. पण एलिझाबेथ व्हरमॉन्टने नैसर्गिकपणे तिचे सौदर्य खुलवले होते. तुम्ही साधनांचा विचार करत नाही, तर परिणामाला पसंती दर्शवता. मत्सर जागृत करणारे धैर्य दाखवत, तिने मेकप केला होता. त्या पूर्णचंद्रासारख्या चेहऱ्यामुळे तिच्या चारित्र्याची प्रभा कमी होण्याऐवजी अधिक तेजाळली होती. मला वाटते, तिने केस रंगवले होते. ते काळे, चकाकणारे व मऊ होते. तिला जणू आळशीपणे रेलून बसणे माहिती नसल्यासारखे, ती ताठ बसली होती आणि ती खूप बारीक होती. तिने काळा सॅटीनचा ड्रेस घातला होता. त्याचा साधेपणा स्तुत्य होता. तिच्या गळयाभोवती मोत्यांची मोठी माळ होती. बाकी दागिने म्हणजे फक्त मोठी पाचूची लग्नाची अंगठी होती. त्याच्या मंद रंगाने, तिचा गोरा हात उठून दिसत होता. लाल नखांच्या तिच्या हातांनी ती तिचे वय लपवत होती. त्याला एखाद्या मुलीसारखी गोलाई नसली, तरी तुम्ही त्यांच्याकडे थोड्या दुःखाने

बघू शकत होतात. थोड्याच वेळात ते शिकारी पक्ष्याच्या नखांसारखे दिसू लागले असते.

एलिझाबेथ व्हरमॉन्ट एक उल्लेखनीय बाई होती. सेंट अर्थच्या सातव्या उमरावाची मुलगी होती. तिने वयाच्या अठराव्या वर्षी एका श्रीमंत माणसाशी लग्न केले. आणि आश्चर्य वाटेल अशा चैनीत, नैतिक अधःपतन करत, ऐंद्रिय उपभोग घेत राहिली. ती स्वतःची काळजी घेत असल्याबद्दल खूप अभिमानी होती. पण परिणामांबद्दल बेपर्वा असलेली होती. दोन वर्षात तिच्या नवऱ्याने धक्का बसेल अशी प्रकरणे करून, तिला घटस्फोट दिला. तिने एका पत्रकाराशी लग्न करून, अठरा महिन्यांनी त्याच्यापासून पळ काढला. मग अनेक प्रेमप्रकरणे केली. तिची बेपर्वाई, तिचे चक्रावून टाकणारे सौदर्य, भानगडबाज वागणूक आणि उधळेपणामुळे, ती लोकांच्या डोळ्यात खुपू लागली. लवकरच तिने लोकांच्या गावगप्पांना चांगला विषय पुरवला. चांगल्या लोकांच्या नाकात तिच्याविषयीचा वाईट, नकोसा दर्प दरवळू लागला. ती जुगारी, दुष्ट व उधळी होती. तिच्या प्रेमिकांशी ती विश्वासू नसली, तरी तिच्या मित्रमंडळींशी ती नाते टिकवून होती. तिने काही केले, तरी तिला नावाजणारे त्यातील काहीजण होते. ती मनमोकळी, प्रामाणिक, उत्साही आणि धीराची होती. ती कधीही ढोंगीपणे वागत नसे. ती उदार आणि गंभीर होती. तिच्या आयुष्यातील या काळात, मला तिची अशी ओळख झाली. थोर बायकांसाठी धर्म आता फारसे महत्व राखून नाही. जेव्हा त्यांच्यावर संकटे कोसळतात तेव्हा मनाला उभारी मिळण्यासाठी, त्या मोठ्या हिरीरीने कलेत रस घेतात. त्यांच्या सामाजिक स्तरातील लोकांकडून, त्यांना जेव्हा दुर्लक्षित

वागणूक मिळते, तेव्हा त्या लेखनकला, चित्रकला किंवा संगीतकलेचा आधार घेतात. मला ती चांगली सोबतीण वाटली. तिच्या अंगी तयार शहाणपण होते आणि ती नैसर्गिक रीत्या निर्भयतेने बोलणारी होती. [ त्यामुळे उपयुक्त वेळ वाचत असे. ] तिच्याकडे तयार शहाणपण होते. डोळयांना खुपेल इतक्या गडद तिच्या भूतकाळाबद्दल [ विनोदाने लक्ष दुसरीकडे वळवत ] बोलायला, ती तयार असे. तिचे बोलणे न शिकवता, चांगले होते. कारण सगळ्या गोष्टींकडे दुर्लक्ष करणारी, ती प्रामाणिक बाई होती.

मग तिने एक नवलपूर्ण गोष्ट केली. चाळीसाव्या वर्षी तिने एकवीस वर्षाच्या मुलाशी लग्न केले. तिचे मित्र म्हणाले, की हा तिचा आयुष्यातील सर्वात वेडेपणा होता. तो मुलगा चांगला होता, पण तो अननुभवी होता. ती त्याचा लाजीरवाण्या पद्धतीने गैरफायदा घेत असल्यामुळे, बऱ्या वाईट काळात जे तिच्या बरोबर राहिले, त्यांनी आता तिच्यासाठी काही करायला नकार दिला. हे फार मर्यादा ओलांडणारे होते.

त्यांनी भविष्यकाळात काही नको ते होण्याचा अंदाज केला. एलिझाबेथ व्हरमॉन्ट कुणाही माणसाला सहा महिन्यांपेक्षा जास्त चिकटून राहू शकत नसे. त्यांनाही तशी आशा नव्हती. त्या तरुणाला एवढीच आशा होती की त्याची बायको इतकी भानगडबाजपणे वागेल, की त्याला तिला सोडणे भाग पडेल. ते सगळे चुकले. तिचा हृदयपालट व्हायला काळ कारणीभूत ठरला, की पीटर व्हरमॉन्टचा निरागसपणा व साधे प्रेम तिला भावले, ते मला कळले नाही. पण ती त्याची कौतुकास पात्र असलेली बायको ठरली. ते गरीब

होते तरीही ती उधळी होती. पण ती काटकसरी गृहिणी बनली. ती अचानक एवढी काळजीने वागणारी झाली, की तिच्या भानगडबाजपणाबद्दल बोलणाऱ्या जिभा शांत झाल्या. त्याला सुखी करणे एवढेच तिचे काम उरले. ती त्याच्यावर अत्यंत मनापासून प्रेम करत असल्याबद्दल, कुणालाच संशय उरला नाही. तिच्याबद्दल उठणारे सगळे प्रवाद बंद झाले. उलट तिची गोष्ट लोक एकमेकांना सांगू लागले. ती बदलली होती. माझे अशा कारणाने मनोरंजन झाले, की जेव्हा ती मानाने पूर्ण म्हातारी होईल, तेव्हा तिचा वाईट ठळक भूतकाळ मागे पडेल आणि ती ती बदनाम बाई नसेल, तर तिला नीट माहिती नसणारी कुणी मृत बाई असेल. कारण बायकांची विसरण्याची क्षमता हेवा करण्यासारखी असते.

पण पुढे काय घडणार आहे हे कुणाला समजते? डोळ्याची उघडझाप होण्याच्या आत सर्व काही बदलले. आदर्श लग्नानंतर दहा वर्षांनी पीटर व्हरमॉन्ट वेड्यासारखा बार्बारा कँटॉन नावाच्या एका मुलीच्या प्रेमात पडला. एके काळी विदेश व्यवहार मंत्रालयातील सचिवपदी असलेल्या उमराव रॉबर्ट याची ती सर्वात लहान मुलगी होती. ती चांगल्या प्रकारे सुंदर होती. अर्थात त्या वेळी तिची तुलना एलिझाबेथ बाईसाहेबांशी करणे बरोबर नव्हते. काय झाले, हे खूप लोकांना माहिती होते. पण कुणीही हे सांगू शकले नसते, की एलिझाबेथला त्याबद्दल संशय होता, की नाही. तिच्या अनुभवात न बसणारे हे प्रकरण ती कसे काय घेणार आहे, याचे लोकांना नवल वाटत होते. तिने आतापर्यंत अनेक प्रेमिकांना झिडकारले होते आणि कुणीही तिला एकटे पाडले नव्हते. माझ्या बाजूने मी असा विचार केला, की ती छोट्याशा मिस

कँटॉनचे लहानसे काम करेल. मला तिचे धैर्य आणि हुशारी माहिती होती. जेवणानंतर आम्ही गप्पा मारत असतांना, हे सर्व माझ्या मनात येत होते. तिच्या वरवरच्या वागण्यात काही दिसत नव्हते. तिला काही त्रास आहे, असे न वाटता, ती नेहमीसारखीच आनंदी, सुंदर व मनमोकळी दिसत होती. ती नेहमीसारखीच बोलत होती. संभाषणाच्या ओघात येणाऱ्या विविध विषयांवर चांगल्या शहाणपणे, ह्ळूवारपणे व चौकस फसवेपणे ती ऐकत होती. मला मजा येत होती. काही चमत्कृतीमुळे तिला पीटरच्या नवीन भावनांची जाणीव नसावी. मी मला असे समजावले, की तिचे त्याच्यावरील प्रेम इतके मोठे होते, की ती असा विचार करू शकत नव्हती, की त्याचे प्रेम कमी असेल.

आम्ही कॉफी प्यायली व काही सिगरेटी ओढल्या. तिने मला किती वाजले, असे विचारले.

"पावणेतीन"

"मी बिल मागवते."

"तू मला जेवणाचे बिल देऊ देणार नाहीस का?"

ती हसून म्हणाली, "अर्थात."

"तुला घाई आहे का?"

"मला तीन वाजता पीटरला भेटायचे आहे.

"ओहो, तो कसा आहे?"

"छान आहे."

ती थोडी हसली. ते तिचे खूप वेळाचे आनंदी हसू होते. पण मला त्यात काही खट्याळपणा दिसला. क्षणभर तिने हो नाही केले आणि माझ्याकडे मुद्दाम पाहिले.

"तुला चौकस परिस्थिती आवडते, नाही का? माझ्या नशीबाच्या प्रवासाबद्दल तुला कधीच तर्क करता येणार नाही. मी आज सकाळी पीटरला फोन करून मला तीनला भेटण्याबद्दल विचारले. मी त्याला घटस्फोट घ्यायला सांगणार आहे."

मी ओरडलो, "असे करू नकोस." मला फार लाजीरवाणे वाटले व काय बोलावे, ते कळेना. "मला वाटले, तुमचे दोघांचे छान चालले आहे."

"तुला असे वाटते का, की साऱ्या जगाला जे माहिती आहे, ते मला माहिती नसेल? मी काही इतकी मूर्ख नाही."

तिला काय म्हणायचे आहे, ते मला माहिती नाही, असे ढोंग करणे व त्यावर विश्वास नसल्याचे तिला सांगावे, अशी ती बाई नव्हती. मी क्षणभर गप्प राहिलो.

"पण तू घटस्फोट घ्यायला का तयार व्हावेस?"

रॉबर्ट कँटॉन हा जुना म्हातारा माणूस आहे. मी पीटरला घटस्फोट दिला, तरी तो बार्बाराला पीटरशी लग्न करून देईल का, याबद्दल मला शंका आहे. आणि तू जाणतोस, की माझ्यासाठी अजून एक घटस्फोट म्हणजे फार काही नाही --- "

तिने तिचे छान खांदे उडवले.

“त्याला तिच्याशी लग्न करायचे आहे, हे तुला कसे माहिती?”

“तो तिच्या प्रेमात आकंठ बुडाला आहे.”

“हे त्याने तुला सांगितले का?”

“नाही. मला ते माहिती आहे, हे देखील त्याला माहिती नाही. तो इतका गरीब, बिचारा आणि आवडता आहे, की तो माझ्या भावना दुखावू इच्छित नाही.”

“कदाचित ते तात्पुरते आकर्षण असेल. ते नाहीसे होईल.”

“का नाहीसे होईल? बार्बारा तरूण आणि सुंदर आहे. ती छान आहे. ते एकमेकांना शोभेसे आहेत. आणि शिवाय, जरी ते आकर्षण नाहीसे झाले, तरी काय मोठे चांगले होणार आहे? ते आता एकमेकांवर प्रेम करतात आणि प्रेमामध्ये वर्तमानकाळालाच महत्व आहे. मी पीटरपेक्षा एकोणीस वर्षांनी मोठी आहे. जर माणसाने वयाने मोठ्या, आईसारख्या बाईवर प्रेम करणे थांबवले, तर पुन्हा तो तिच्यावर प्रेम करणे शक्य आहे का? तू कादंबरीकार आहेस. तुला मानवी स्वभावाबद्दल जास्त माहिती असेल.”

“पण तू हा त्याग का करते आहेस?”

दहा वर्षांपूर्वी त्याने जेव्हा मला त्याच्याशी लग्न करण्याबद्दल विचारले, तेव्हाच मी त्याला सांगितले होते, की त्याला पाहिजे तेव्हा तो या लग्नातून मोकळा होऊ शकतो. तू बघतो आहेस, की आमच्या वयात इतके जास्त अंतर आहे, की मला वाटते ते फार चांगले नव्हते.”

त्याने तुझ्याकडून न मागितलेले वचन तू पाळणार आहेस का?"

तिने तिच्या बारीक व लांब हातांना झोका दिला आणि आता मला वाटले, की त्या अंधारात ते हिरवे रत्न चमकतांना काही वाईट घडणार आहे.

"ओहो, तुला माहिती आहे, मला हे केलेच पाहिजे. प्रत्येकाने सभ्य माणसासारखे वागले पाहिजे. खरे सांगायचे, तर म्हणूनच मी आज इथे जेवण घेते आहे. याच टेबलावर त्याने मला लग्नाबद्दल विचारले होते. आम्ही बरोबर जेवत होतो. मी आता जिथे बसले आहे, तिथेच बसले होते. त्रास असा आहे, की मी तेव्हा त्याच्या जेवढी प्रेमात होते, तेवढीच आजही आहे." ती क्षणभर थांबली. मी पाहिले, की तिने रागाने दात चावले.

"तर आता मला गेले पाहिजे. पीटरला वाट बघायला लावलेले आवडत नाही."

तिने माझ्याकडे थोड्या नाईलाजाने पाहिले. मला जाणवले, की तिला खुर्चीतून उठवत नाही आहे. पण ती हसली व एकाएकी उठून उभी राहिली.

"तुला मी तुझ्याबरोबर आलेले आवडेल का?"

ती हसत म्हणाली, "फार तर हॉटेलच्या दारापर्यंत."

आम्ही चालत चालत हॉटेलच्या दारापर्यंत आलो तेव्हा एक हमाल तेथील फिरत्या दाराभोवती घुटमळत होता. तिला टॅक्सी हवी आहे का, असे

मी विचारले.

“नको इतका छान दिवस आहे. मी चालेन.” तिने तिचा हात माझ्या हातात दिला. “तुला भेटून खूप छान वाटले. मी उद्या परदेशी चालले आहे. पण पानगळीच्या मोसमामध्ये मी लंडनला असेन. मला फोन कर.”

ती हसली व मान हलवून वळली. मी तिला डेव्हीज रस्त्यापर्यंत जातांना बघत राहिलो. हवा वसंत ऋतुसारखी मोकळी होती. घरांच्या छपरावर निळ्या आकाशात पांढरे ढग सावकाशीने विहरत होते. ती एकदम उमदेपणे व डौलदारपणे ताठ चालत होती. तिची अंगलट छान बारीक होती. त्यामुळे येणारे जाणारे लोक तिच्याकडे बघत होते. एका टोपी झुकणाऱ्या माणसाला, तिने झुकून अभिवादन केल्याचे मी पाहिले. माझ्या मनात असा विचार आला, की गेल्या हजार वर्षात, त्याला असे वाटले नसेल, की तिचे हृदय मोडून पडले आहे. मी परत सांगतो ती फार प्रामाणिक बाई होती.

# A string of beads

# मण्यांची माळ




आम्ही जेवायला बसल्यावर लॉरा म्हणाली, “मी तुझ्याशेजारी बसले आहे, हे माझे भाग्य आहे.”

मी नम्रपणे बोललो, “हे माझे भाग्य आहे.”

“ते आपण बघू. मला तुझ्याशी बोलायची संधी हवी होती. तुला सांगण्यासाठी माझ्याकडे एक गोष्ट आहे.”

हे ऐकून माझ्या पोटात धस्स झाले.

मी उत्तरलो, “मला वाटते, तू तुझ्याबद्दल किंवा माझ्याबद्दल बोलावेस.”

“ओहो, पण मला तुला ती गोष्ट सांगायची आहे. मला वाटते त्याचा तुला उपयोग होईल.”

“तुला सांगायचीच असेल, तर सांग. पण आधी आपण काय घ्यायचे ते तर ठरवू.”

ती थोड्या नाराजीने बोलली, “ते काम तू माझ्यावर सोपवणार नाहीस का? मला वाटते, त्याने तुला आनंद होईल.”

“मला झालेला आहे. कदाचित तू नाटक लिहिले असशील आणि तुला ते मला वाचून दाखवायचे असेल.”

“माझ्या काही मित्रांना मी ते वाचून दाखवले आहे, हे खरे आहे.”

“मी त्याची फारशी शिफारस करणार नाही. खरी गोष्ट ही कधी खरी नसते, तर शोध लावल्यासारखी असते.”

“म्हणजे काय?”

मी कबूल केले, “फार काही नाही. पण मला वाटते, ती बरी असावी.”

“मला वाटते, तू मला ती सांगून द्यावीस.”

“मी ऐकतो आहे. ते मला जाडे करणारे सूप, मी पिणार नाही आहे.”

तिने माझ्याकडे ताण येऊन पाहिले व मग पदार्थांकडे पाहिले. तिने लहानसा सुस्कारा टाकला.

"ओहो, ठीक आहे. मला वाटते, जर तू ते पिणार नसशील, तर मीही पिणार नाही. देवाला माहिती आहे, की मी माझ्या शरीरयष्टीच्या बाबतीत स्वातंत्र्य घेऊ शकत नाही."

"तू त्यात ढीगभर क्रीम घातल्यामुळे, याच्यापेक्षा जड कुठले सूप असू शकेल का?"

ती सुस्कारत म्हणाली, "हे बीटचे सूपच तर खरे, फक्त मला आवडणारे सूप आहे."

"काही काळजी करू नकोस. मला तुझी गोष्ट सांग आणि आपण मासा येईपर्यंत या पदार्थांविषयी विसरून जाऊ."

"ही गोष्ट घडली, तेव्हा खरे तर मी तिथे होते. मी लिव्हिंगस्टोन बरोबर जेवत होते. तुला तो माहिती आहे का?"

"नाही, मला नाही वाटत, मला तो माहिती आहे."

"तू त्यांना विचारलेस तर यातील प्रत्येक शब्द खरा असल्याचे ते सांगतील. ते त्यांच्या मुलांच्या शिक्षिकेला जेवायला यायला विचारतील. कारण काही शिक्षिकांनी अगदी आयत्या वेळी ही नोकरी सोडलेली आहे --- तुला माहिती आहे, की हे लोक किती बेपर्वा असतात --- ते फार वाईट नशीब असते. त्यांच्या मुलांची शिक्षिका, वीस एकवीस वर्षांची तरुण, सुंदर, छान मुलगी, मिस रॉबिन्सन होती. व्यक्तीशः मी अशी तरुण व सुंदर शिक्षिका कामाला ठेवली नसती. कधी काय होईल, हे कुणी सांगू शकत नाही."

"पण प्रत्येकजण चांगल्याचीच अपेक्षा करतो."

लॉराने माझ्या शेऱ्याकडे काही लक्ष दिले नाही.

“ती काम करण्याऐवजी, तरुण माणसांचा विचार करत असावी आणि मग जेव्हा तुम्हाला याची सवय होते, तेव्हा ती स्वतःचे लग्न ठरवते. पण मिस रॉबिन्सनची भलावण करणारे खूपजण होते आणि ती चांगली मान देण्यासारखी व्यक्ती होती. ती चर्चमध्ये काम करणाऱ्याची मुलगी होती, यावर माझा विश्वास होता.

आज जेवायला एक मनुष्य आहे. मला वाटते, तू त्याच्याबद्दल कधी ऐकले नाहीस. पण तो त्याच्या पद्धतीने चांगले नाव राखून आहे. तो उमराव बोर्सेली आहे आणि त्याला जगातील कुणाहीपेक्षा, रत्नांबद्दल बरीच माहिती आहे. तो मेरी लायनगेटच्या शेजारी बसला आहे. ती तिच्या गळ्यातील मोत्यांच्या माळेचा विचार करते आहे. संभाषणाच्या ओघात, ती त्याला विचारते, की तिच्या माळेबद्दल त्याचा काय विचार आहे. तो म्हणतो, की ती खूप सुंदर आहे. यावर तिच्या अभिमानाला धक्का बसतो. ती त्याला सांगते, तिची किंमत आठ हजार पौंड आहे.

तो म्हणतो, “हो, ती त्या किमतीची दिसते आहे.”

मिस रॉबिन्सन त्याच्या समोर बसली होती. त्या संध्याकाळी ती जरा जास्तच चांगली दिसत होती. तिने तिचा ड्रेस ओळखला. तो सोफीचा जुना ड्रेस होता. पण ती मुलांची शिक्षिका आहे, ही माहिती नसेल, तर तुम्हाला तसा संशयदेखील आला नसता.

बोर्सेली बोलला, “त्या तरुण स्त्रीने घातलेले नेकलेस फार सुंदर आहे.”

मेरी लायनगेट म्हणाली, “पण ती मिसेस लिव्हिंगस्टोनच्या मुलांची शिक्षिका आहे.

तो बोलला, “ते काहीही असू दे. पण माझ्या आयुष्यात मी पाहिलेली ती सर्वात सुंदर मोत्यांची माळ आहे. तिची किंमत सहज पन्नास हजार पौंड असेल.”

“काही काय?”

“मी तुला नक्की सांगतो, ती तेवढ्या किमतीची असणारच.”

मेरी लायनगेट पुढे झुकली. तिचा आवाज वरच्या पट्टीत गेला, “मिस रॉबिन्सन, तुला माहिती आहे का, की उमराव बोर्सेली काय म्हणाला?” ती ओरडली, “तो म्हणतो आहे, की तू घातलेल्या माळेची किंमत पन्नास हजार पौंड आहे.”

त्याच क्षणी तिथे संभाषणात खंड पडला, कारण प्रत्येकाने ते ऐकले. आम्ही सगळे वळून मिस रॉबिन्सनकडे बघू लागलो. ती थोडेसे लाजून हसली.

ती म्हणाली, “मी चांगला भाव केला, कारण मी यासाठी फक्त पंधरा शिलिंग दिले.”

“तू हे खरेच सांगत असणार.”

आम्ही सगळे हसलो. हे खरे तर मूर्खपणाचे होते. खऱ्या व महाग असलेल्या मोत्याच्या माळेची किंमत ती खोटी असल्याचे सांगून बायका आपल्या नवऱ्याला फसवत असल्याचे आम्ही ऐकले होते. ही बरीच जुनी गोष्ट आहे.”

माझ्या पद्धतीने काही विचार करत, मी म्हणालो, “आभारी आहे.”

पण हे विचित्र होते की पन्नास हजार पौंडाची माळ घालणारी मुलांची शिक्षिका, मुलांची शिक्षिका का रहावी. हे सरळ दिसत होते, की उमराव बोर्सेलीने नक्कीच बंडल मारली होती. मग एक असामान्य गोष्ट घडली. योगायोगाने एक लांब हात आला. मी रागाने बोललो, “असे नसणार. हे बनवायला खूप कष्ट घेतले गेले असणार. तुम्ही इंग्लिश वापरण्याचा मोहक शब्दकोश पाहिला आहे का?”

“मला वाटते, मी उत्सुक शेवटाकडे येत असतांना, तू मध्येच बोलू नयेस.”

पण मला परत तसे करावेच लागले. कारण त्यानंतर लगेच भाजलेला साल्मन मासा माझ्या डाव्या कोपराशी आणला गेला. मी म्हणालो, “मिसेस लिव्हिंगस्टोन आपल्याला मस्त जेवण देते आहे.”

लॉराने विचारले, “साल्मन जाडा होता का?”

मी मोठा तुकडा घेत म्हणालो, “नक्कीच.”

ती बोलली, “छे, तो तर लहानसा होता.”

मी तिला म्हणालो, “तू घे. योगायोगाने आलेला लांब हात काही हालचाल करायच्या मागे होता.

त्याच वेळेस स्वयंपाकी येऊन मिस रॉबिन्सनच्या कानात काही कुजबुजला आणि मला वाटले, की तिचा चेहरा पडला. असा मेकप

करण्याची चूक करणे, म्हणजे निसर्ग तुमची कधी काय फसवणूक करेल, हे माहिती नसल्यासारखे झाले. ती चक्रावून गेलेली दिसली. ती पुढे झुकली.

"मिसेस लिव्हिंगस्टोन, डॉसन म्हणतो आहे, हॉलमध्ये दोन लोक आले आहेत. त्यांना माझ्याशी ताबडतोब बोलायचे आहे."

सोफी लिव्हिंगस्टोन म्हणाली, "मग तू जावेस, ते बरे."

मिस रॉबिन्सन उठली व खोलीबाहेर गेली. सगळयांच्या मनात तोच विचार तरळून गेला. पण पहिल्यांदा मी सोफीला बोललो, "मला अशी आशा आहे, की ते तिला अटक करायला आले नसतील. प्रिय, तुझ्यासाठी हे फार भयंकर असेल, नाही का?"

तिने विचारले, "बोर्सेली, तुला काय वाटते, ती माळ खरी असल्याबद्दल, तुझी खात्री आहे का?"

"ओहो, नक्की."

मी म्हणालो, तिने ती चोरली असेल, तर ती आज रात्री घालायचे धाडस तिने केले नसते."

तिच्या मेकप केलेल्या चेहऱ्याच्या आड सोफी फिकी पडली. आणि

मी तिला तिच्या दागिन्यांच्या पेटीत सर्व काही ठीक आहे का, याचे नवल वाटत असलेले पाहिले. मी फक्त हिऱ्यांची माळ घातली होती. ती अजून मानेशी असल्याची मी हात लावून खात्री केली.

मिस्टर लिव्हिंगस्टोन म्हणाले, "काहीही बोलू नका. मिस रॉबिन्सनला असली महाग माळ घ्यायला कसे परवडेल?

मी म्हणालो, “तिला ती कुणी दिली असेल.”

सोफी म्हणाली, “तिच्या इतक्या नवलपूर्ण ओळखी आहेत!”

मी बोललो, “तसे आहेच.”

मला लॉराच्या बोलण्यात पुन्हा अडथळा आणणे भाग पडले.

मी बोललो, “तुम्ही या केसचा लखलखता पैलू लक्षात का घेत नाही?”

“अर्थात मला मिस रॉबिन्सनच्या विरुद्ध काही माहिती नाही. मला सर्व दृष्टीने, ती फार चांगली मुलगी वाटते. पण तुम्हाला ती लबाड व चोर वाटत असेल आणि आंतरराष्ट्रीय चोरांच्या टोळीची प्रसिद्ध सभासद आहे, असे तुम्ही शोधून काढले असेल, तर ते थरारक आहे.

“हे सिनेमातल्यासारखे आहे. पण अशी उत्तेजक गोष्ट होणे, फक्त सिनेमातच शक्य असते.

तर आम्ही श्वास रोधून थांबलो होतो. काही आवाज येत नव्हता. मी हॉलमधून गुद्दागुद्दीचे आवाज येण्याची किंवा निदान गुदमरून मारलेल्या किंकाळीची अपेक्षा करत होतो. फार काही नको ते पुढे होण्याची, अशी ती शांतता, मला वाटत होती. मग दार उघडले व मिस रॉबिन्सन चालत आली. माझ्या लक्षात आले, की नेकलेस नाहीसे झाले होते. मला ती अशक्त व उद्दीपित झालेली दिसली. ती टेबलाशी आली. बसली व त्यावर काहीतरी फेकले --- ”

“कशावर?”

“मूर्खा, टेबलावर. मोत्यांची माळ.”

ती म्हणाली, “हे माझे नेकलेस आहे.”

उमराव बोर्सेली पुढे झुकला.

तो म्हणाला, “पण ही तर खोटी आहे.”

ती हसत बोलली, “मी तुम्हाला तसे सांगितले होते.”

तो म्हणाला, “काही वेळापूर्वी तुझ्या मानेभोवती होती, ती ही माळ नाही आहे.”

तिने तिची मान हलवली व ती गूढपणे हसली. आम्ही सगळे उत्सुकतेने बघू लागलो. मला समजत नव्हते, की सोफी लिव्हिंगस्टोन मिस रॉबिन्सनवर इतकी खूष का झाली आहे व स्वतःला लोकांच्या नजरेचा असा आकर्षण बिंदू का ठरवते आहे. ती जेव्हा असे सुचवते आहे, की मिस रॉबिन्सनने स्पष्टीकरण दिलेले बरे, तेव्हा या तिच्या पद्धतीत काही संशयास्पद आंबटपणा आहे, असे मला वाटले. तर मग मिस रॉबिन्सन म्हणाली, की ती हॉलमध्ये गेली, तेव्हा तिथे जॅरोट दुकानातून आलेली दोन माणसे बसलेली होती. त्या माळेचा हुक सैल झाला असल्याने तिने तिची पंधरा शिलिंगची माळ त्यांच्या दुकानात नेली होती आणि ती माळ तिथे ठेवली होती कारण तिने ती त्याच दुपारी ती तेथून खरेदी केली होती. ती माणसे म्हणाली, की त्यांनी तिला तिची माळ परत करतांना, चुकीची माळ दिली. कुणीतरी खऱ्या मोत्यांची माळ गुंफायला दिली होती आणि मदतनीसाने चूक केली. अर्थात मला हे समजले नाही, की कोणी खरी माळ जॅरोटच्या दुकानात देण्याइतका

मूर्खपणा कसा काय करू शकले. त्या प्रकारच्या मोत्यांचे काम करणारे ते नव्हते. त्यांना खऱ्या व खोट्या मोत्यांमधील फरकही माहिती नव्हता. पण तुम्हाला माहिती आहे, की काही बायका किती मूर्ख असतात. तरीही मिस रॉबिन्सनने घातलेली माळ पन्नास हजार पौंडांची होती. तिने अर्थातच ती त्यांना परत देऊन टाकली --- ती अजून काय करू शकत होती --- मला वाटते, ती जरी पिरगळली गेली असली --- आणि त्यांनी तिला तिची माळ जरी परत दिली, तरी ते म्हणाले, की कायदेशीरपणे ते असे करू शकत नाहीत. तुम्हाला माहिती आहे की लोक कसे पोकळ दिमाखाने व मूर्खपणाने व्यापाऱ्यासारखे कसे बोलत असतात. त्याना अशा सूचना दिलेल्या असतात, की सूर्यप्रकाशाइतके लख्ख आहे की, किंवा तुम्ही त्याला जे म्हणाल ते --- त्याना तिला तीनशे पौंडांचा चेक देणे कायद्याप्रमाणे भाग आहे. मिस रॉबिन्सनने तो आम्हाला दाखवला. ती खूप खूष झाली होती.”

“म्हणजे हे चांगले नशीबच म्हणायचे, नाहीतर काय?

“तुम्हाला असे वाटेल. पण ते तिला नाशकारक ठरले.”

“ओहो, असे कसे काय झाले?”

जेव्हा तिचा सुट्टीवर जायचा काळ आला, तेव्हा तिने सोफी लिव्हिंगस्टोनला सांगितले, की तिने एक महिन्यासाठी डेयूव्हीलला जायचे आणि सगळे तीनशे पौंड उडवायचे ठरवले आहे. अर्थात सोफीने तिचे मन वळवायचा व पैसे बँकेत ठेवण्यासाठी विनवणी करायचा प्रयत्न केला. पण तिने काही ऐकले नाही. ती म्हणाली की तिला यापूर्वी कधीच अशी संधी

मिळाली नाही व पुढेही मिळणार नाही. निदान महिनाभर तरी ती उमरावाच्या बायकोसारखी चैनीत रहाणार होती. सोफी काही करू शकली नाही आणि शेवटी तिला तसे करण्यास जाऊ दिले. तिने तिला नको असलेले बरेच कपडे मिस रॉबिन्सनला विकले. तिने ते खूप वापरले होते व तिला त्यांचा कंटाळा आला होता. ती म्हणाली तिने ते देऊन टाकले. पण ते खरे नव्हते. तिने ते स्वस्तात विकले. मिस रॉबिन्सन एकटीच डेयूव्हीलला जायला निघाली. नंतर काय झाले असेल, असे तुला वाटते?"

मी उत्तरलो, "मी काही तर्क करू शकत नाही. मला वाटते तिने आयुष्य चांगले सुखात घालवले असेल."

ती येणे अपेक्षित असल्याच्या एक आठवडा आधी, तिने सोफीला लिहिले, की तिने तिचा बेत बदलला आहे आणि दुसरा व्यवसाय चालू केला आहे. ती अशी आशा करत होती, की ती परतली नाही, तरी मिसेस लिव्हिंगस्टोन तिला माफ करेल. अर्थात बिचारी सोफी चिडली. खरे काय झाले होते, तर मिस रॉबिन्सनने डेयूव्हीलला एका श्रीमंत अर्जेंटाइनला पकडले व पॅरीसला गेली. आणि तेव्हापासून ती तिथेच आहे. मी स्वतः तिला फ्लोरेन्समध्ये कोपरापर्यंत बांगड्या घातलेले व गळयात मोत्यांच्या माळा घातलेले पाहिले. अर्थात मी तिला कटवले. ते म्हणतात की बोईस डे बोलोगनमध्ये तिचे घर आहे. आणि मला माहिती आहे, तिच्याकडे रोल्स गाडी आहे. तिने काही महिन्यातच त्या अर्जेंटाइनला सोडून दिले व एका

ग्रीकला पकडले. आता ती कोणाबरोबर असते, मला माहिती नाही. पण गोषवारा बघता, ती पॅरीसमध्ये एक चलाख प्रस्थ बनून राहिली आहे.''

मी म्हणालो, ''तू जेव्हा ती बिघडली आहे असे म्हणालीस, तेव्हा मला वाटते, तू ते शुद्ध तांत्रिक भाषेत म्हणालीस.''

लॉरा बोलली, तू त्यातून काय अर्थ काढलास, ते मला माहिती नाही. पण यातून तुला एक गोष्ट मिळेल, असे तुला वाटत नाही का?''

दुर्दैवाने मी मोत्यांच्या माळेसंबंधी आधीच एक गोष्ट लिहिली आहे. मोत्यांच्या माळेसंबंधी कुणी सारख्या सारख्या गोष्टी लिहू शकत नाही.

''मला अर्धवट असे वाटते आहे, की मीच ही गोष्ट लिहावी. अर्थात मला शेवट बदलावा लागेल.''

''तू शेवट कसा करशील?''

''एका युद्धकाळात इकडे तिकडे फिरून हाल झालेल्या, एकच पाय असलेल्या किंवा अर्धा चेहरा उडालेल्या बँक कारकुनाशी मी तिचा साखरपुडा लावेन. ते खूप गरीब असतील. आणि लग्न झाल्यापासून त्यांची स्थिती काहीच सुधारत नाही. तो त्याच्याकडील शिल्लक रकमेतून उपनगरात एक छोटेसे घर घेतो आणि शेवटचा हप्ता भरण्याइतके पैसे जमा झाल्यावर ते लग्न करतात. मग ती त्याला तीनशे पौंड देते, तेव्हा त्याचा त्यावर विश्वासच बसत नाही. ते इतके आनंदी होतात, की तो तिच्या खांद्यावर डोके ठेऊन एखाद्या मुलासारखा रडतो. मग घर त्यांच्या ताब्यात येते. ते लग्न करतात. त्याच्या आईला त्यांच्याजवळ रहायला आणतात. तो रोज बँकेत जातो. आणि अजून

मूलबाळ झाले नसेल, तर ती शिक्षिका म्हणून काम करू शकते. त्याच्या जखमांमुळे तो नेहमी आजारी असतो. ती त्याची सेवाशुश्रुषा करते. हे सर्व फार दयनीय, गोड आणि छान असते.

मी धीराने म्हणालो, “हे सर्व मला काही चांगले वाटत नाही.”

लॉरा म्हणाली, “हो, पण हे बोध घेण्यासारखे आहे.”

# The romantic young lady

# अद्भुतरम्य तरुण स्त्री



खऱ्या आयुष्याच्या अनेक गैरसोयींपैकी एक म्हणजे, ते तुम्हाला क्वचित पूर्ण गोष्ट देते. काही प्रसंग तुमची रुची जागवतात. त्यातील लोक राक्षसाने राडा करावा, तसे असतात. तुम्हाला उत्सुकता वाटत रहाते, की

आता पुढे काय होईल. तर, सहसा काहीच होत नाही. तुम्हाला डोळ्यांपुढे दिसणारे अटळ विध्वंसक कृत्य शेवटी अटळ नसतेच. आणि उच्च प्रतीची दुःखांतिका, कुठल्याही कलापूर्ण सभ्यतेशिवाय असते. ती हळूहळू लहान होत, दिवाणखाण्यातील सुखांतिका उरते. म्हातारे होण्याचे खूप तोटे असतात. पण अशी भरपाई होऊ शकते. [आपल्या आपल्यात आपण कबूल करू, इतर काही थोडे नाहीत.] कधीकधी तुम्ही पूर्वी अनुभवलेल्या काही घटनांमधून काय निष्पन्न झाले, हे बघायची संधी ते तुम्हाला देते. गोष्टीचा शेवट काय होता, हे जाणून घ्यायची आशा तुम्ही सोडून दिलेली असते. आणि जेव्हा तुम्ही अगदी कमी अपेक्षा ठेवता, तेव्हा त्याचे ताट तुमच्यासमोर वाढून येते.

मार्क्र्युसा डे सॅन इस्टेबॅनला तिच्या गाडीपर्यंत पोचवल्यावर मला गतकाळातील गोष्टी स्मरल्या. मी परत हॉटेलात गेले व स्वागतकक्षासमोरील मोकळया जागेत बसून उत्तेजक पेय मागवले. सिगरेट पेटवली. मी माझ्या आठवणी जाग्या करू लागले. हॉटेल नवीन व छान होते. ते युरोपमधील पहिल्या दर्जाच्या हॉटेलसारखेच होते. मी खंत करत होते, की मी सेव्हीलमध्ये रहात असतांना, सहसा डे मद्रीद हॉटेलमध्ये रहायला जात असे. त्या जुन्या पद्धतीच्या, चित्रासारख्या सुंदर हॉटेलला मी या आधुनिक हॉटेलमुळे मुकले. हे खरे होते, की या हॉटेलमधून मला गुडालक़्युव्हिर नदीचे मस्त दृष्य दिसत असे. आठवड्यातून दोन तीन वेळा स्वागतकक्षासमोरील मोकळया जागेत कर्णकर्कशपणे रेंगाळणाऱ्या जाझ वाद्यवृंदाबरोबर, फॅशनेबल गर्दी उसळणारे व लहानसे नाचाचे कर्यक्रम होत असत व उत्साहाने भरलेले संभाषण होत असे.

मी दुपारभर बाहेर असे. आणि आल्यावर, न दाखवलेल्या रागाच्या गर्दीत सापडत असे. मी कार्यालयातून माझी किल्ली घेऊन, माझ्या खोलीत जायला बघितले.  पण हमाल ती देत मला म्हणाला, की मला कुणी बाई बोलावते आहे.

“मला?”

“तिला तुम्हाला भेटायची घाई आहे. ती मार्क्र्युसा डे सॅन इस्टेबॅन आहे.”

मला त्या नावाचे कुणी माहिती नसते.

“ही काहीतरी चूक दिसते आहे.”

मी असे म्हणते आहे, तोच इकडे तिकडे निरुद्देशपणे बघत, एक बाई हात पसरून, ओठांवर तेजस्वी हास्य खेळवत, माझ्याजवळ येते. माझ्या माहितीप्रमाणे माझ्या आयुष्यात, मी तिला यापूर्वी पाहिलेले नसते. ती माझे दोन्ही हात हातात घेऊन उबदारपणे दाबते. ती भरभर फ्रेंचमध्ये बोलते. “तुला किती वर्षांनी परत बघून किती छान वाटले. मी कार्यालयातील रजिस्टरमध्ये पाहिले, की तू इथे रहात आहेस आणि मी स्वतःशीच बोललेः “मला या संधीचा फायदा घ्यायला पाहिजे. आपण एकत्र नाचल्याला किती वर्षे झाली? मला विचार करवत नाही. तू अजून नाचतेस का? मी नाचते. आणि मी आता आजी आहे. मी जाड झाले आहे. पण मला त्याची पर्वा नाही. नाच मला जाड होण्यापासून रोकतो.”

ती इतक्या घाईने बोलत होती, की मी श्वास रोधून ऐकत राहिले. ती

बळकट, मध्यम वय उलटलेली, लाल कापलेल्या केसांची, अर्थात रंगवलेल्या, बाई होती. तिने स्पॅनिश बाईला फारसे न शोभणारे, पारशी फॅशनचे कपडे घातले होते. पण तिचे हसणे, फळासारख्या वासाचे आणि आनंदी होते. ती जीवनाचा पुरेपूर आनंद घेत असल्याचे दिसत होते. ती स्त्रीत्वाचा छान डौल असलेली होती. ती तरुण असताना नक्कीच सुंदर दिसत असणार, यावर माझा विश्वास होता. पण मला तिची ओळख पटेना.

"ये. माझ्याबरोबर शँपेनचा पेला घे. आपण जुन्या काळाबद्दल बोलू. की तू दुसरे काही पेय घेशील? आपली जुने सेव्हील किती बदलले आहे, बघ. लहानसे नाच आणि उत्तेजक पेये! आता सर्वत्र पॅरीस आणि लंडनसारखेच झाले आहे. आपण सुसंस्कृत लोक यात अडकलो गेलो आहोत."

ती मला नाच चालू असलेल्या, मोकळ्या जागेजवळील एका टेबलाशी घेऊन गेली. आम्ही बसलो. मी मोकळेपणे बसण्याचे नाटक करू शकत नव्हते. मला वाटत होते, मी भीतीदायक गोंधळात सापडते आहे. मी बोलले, "हा माझा वेडेपणा आहे, की मला भीती वाटते आहे. पण सेव्हील मधील जुन्या दिवसात मला तुझ्या नावाचे कुणी आठवत नाही आहे."

मी पुढे बोलण्यापूर्वी ती म्हणाली, "सॅन इस्टेबन? अर्थात माझा नवरा सालमान्काचा होता. तो आंतरदेशीय संबंधाविषयीच्या नोकरीत होता. मी विधवा आहे. तू मला पीलर कॅरेऑन म्हणून ओळखत असणार. अर्थात मी केस लाल केल्यामुळे माझ्यात फरक पडला आहे. पण बाकी माझ्यात फारसा फरक पडलेला नाही."

मी झटकन म्हणाले, “नाहीच पडलेला. फक्त मला नाव आठवत नव्हते.”

अर्थात, आता मी तिला ओळखले. पण या क्षणी मी मला भारून टाकणारी काळजीची/दुःखाची व मनोरंजनाची भावना तिच्यापासून लपवण्याचा प्रयत्न करणार आहे. कारण मला हे पटले आहे, की पिलर कॅरेऑनबरोबर मी डे मार्बेला बाईसाहेबांच्या मेजवानीत आणि जत्रेत नाच केला होता. ती बाई आता बळकट, हेवा जागृत करणाऱ्या, सधन विधवेत बदलली आहे. त्यामुळे मला फार नवल वाटते आहे. पण मला जपून पाऊल उचलले पाहिजे. सेव्हीलला पायापासून हलवणारी ती गोष्ट मला किती चांगल्या तऱ्हेने आठवते आहे, हे तिला समजले, तर मला आश्चर्य वाटेल. तिने मला आनंदाने निरोप दिला. त्यानंतर मला बरे वाटले. मला ते सगळे सहज आठवत होते.

चाळीस वर्षांपूर्वीच्या त्या दिवसात, सेव्हील विकास पावलेले व्यापारी शहर बनले नव्हते. ते गोल दगडांनी बनवलेले पांढरे रस्ते असलेले, शांत, घंटांचा मनोरा असलेली खूपशी चर्चेस असलेले गाव होते. त्यावर सारस पक्षी घरटी बांधत असत. झुंजणारे बैल, विद्यार्थि आणि साप दिवसभर सावकाशीने हिंडत असत. आयुष्य सोपे होते. हे अर्थात मोटारी येण्यापूर्वी होते. सेव्हीलचे निवासी गरीबीमध्ये राहून, गाडी असण्यासाठी शक्य ती सर्व बचत करत असत. या चैनीसाठी ते आयुष्यातील रोजच्या गरजांवर पाणी सोडायला तयार होते. नम्र वागणूक असलेला प्रत्येकजण पाच ते सातपर्यंत गुडालक्र्युव्हिर

नदीच्या काठी असलेल्या छान बागांमध्ये वरखाली फिरत असत. लंडनच्या फॅशनेबल व्हिक्टोरियापासून ते जुन्या मोडक्या टांग्यांपर्यंत सर्व प्रकारच्या गाड्या तुम्हाला दिसत. मोठ्या दणकट घोड्यांपासून ते झुंजल्यामुळे मरायला टेकलेल्या बैलांपर्यंत विविध प्राणी दिसत. पण पाहुण्यांचे लक्ष वेधून घेणारी एक गोष्ट तिथे होती, ती म्हणजे व्हिक्टोरिया. एकदम नवीन आणि तरतरीत वाहन. दोन सुंदर खेचरे ती ओढत असत. चालक आणि हमाल फिकट करड्या रंगाचा राष्ट्रीय [स्पेनचा भाग असलेला अंडालुसियाचा] गणवेष घालत असत. सेव्हीलमधील ते सर्वात सुंदर दृष्य होते. डे मार्बेला बाईसाहेबांच्या तो मालकीचा भाग होता. ती स्पेनच्या माणसाशी लग्न केलेली व उत्साहाने नवऱ्याच्या देशाच्या पद्धती शिकून घेतलेली, फ्रेंच बाई होती. पण तिच्यात पर्शियन डौल होता. त्यामुळे दोघांमध्ये फरक दिसे. इतर सर्व वाहने गोगलगाईच्या गतीने जात. त्यातील माणसे सर्वांना दिसत व त्यांना सर्व दिसे. पण चालणाऱ्या माणसांच्या दोन रांगांतून बाईसाहेब त्यांच्या खेचरांच्या गाडीमधून जोराने जात राहिल्या. त्या छान गावाच्या शेवटापर्यंत गेल्या. दोनदा परत आल्या आणि मग निघून गेल्या.

या कृत्याला काहीसा राजघराण्याचा वास येत होता. जेव्हा तुम्ही तिला मोठ्या डौलाने वेगवान व्हिक्टोरियात बसलेले बघता, तेव्हा तिचे डोके सुंदरतेने थंड असते. तिचे केस नैसर्गिक रित्या सोनेरी रंगात चमकत असतात. तिचा फ्रेंच आकर्षकपणा व निग्रही वृत्तीने तिला हे स्थान बहाल केले आहे. तिने फॅशन निर्माण केली. तिच्या आज्ञा म्हणजे कायदा होता. तिला फारसे शत्रू

नव्हते पण पूजणारे स्तुतिपाठक फारच होते. यातील सर्वात मोठी शत्रू होती, फ्रेंच लोकांमध्ये सामाजिक परिणामांनी शहाणणात, डौलदारपणात आणि चारित्र्यात पहिले स्थान मिळवलेल्या विधवा बाईसाहेब, डे डॉस पालोस. त्यांची एकुलती एक मुलगी म्हणजे डोना पिलर होती. मला पहिल्यांदा ती माहिती झाली, तेव्हा ती वीस वर्षांची होती आणि फार सुंदर होती. तिचे डोळे मोठे होते. ती बारीक होती. तिच्या त्वचेचे वर्णन करायला तुम्ही कितीही विशेषणे वापरलीत, तरी तुम्हाला ती पीचसारखी होती, असेच म्हणावे लागले असते. स्पॅनिश मुलीसाठी तिची उंची जास्त होती. तोंड लाल होते. चमकदार पांढरे शुभ्र दात होते. तिचे मोठे काळे केस ती त्या काळच्या स्पॅनिश पद्धतीने बांधे. ती भूल पडेल इतकी आकर्षक होती. तिच्या डोळ्यातील प्रकाश, हसण्यातील उब, मोह पाडणारी हालचाल इतकी बळकट प्रेमभावना निर्माण करे, की खरे तर ती बरी नव्हती. जुन्या रूढी मोडून काढणाऱ्या पिढीत, ती जन्माला आली होती. लग्नाच्या वेळेपर्यंत, या चांगल्या स्पॅनिश कुटुंबातील ही मुलगी जणू काही लपवली गेली होती.

मी नेहमी तिच्याबरोबर टेनिस खेळत असे व डे मार्बेलाच्या मेजवान्यांच्या वेळी नाच करत असे. डे मार्बेला शँपेनसहीत  फ्रेंच बायकांना मेजवानी देत असे आणि जेव्हा तिचे राजेशाही घर वर्षातून दोनदा समाजासाठी उघडे ठेवत असे, तेव्हा लिंबू सरबत व बिस्किटे दिली जात. ती तिच्या नवऱ्याप्रमाणे, बैलांच्या झुंजी लावी. जेव्हा त्यात तरुण बैलांना आणले जाई, तेव्हा तिच्या मैत्रिणींनी मागितलेले मनमोकळे व आनंदी, पद्धतशीर

जेवण ती देत असे. हे जमीनदारी पद्धतीने चालणारे सोहळे माझ्या अद्भुतरम्य कल्पनाशक्तीला खतपाणी घालत असत.

एकदा सेव्हीलमध्ये कोरीडा येथे बैलांची झुंज होणार होती, तेव्हा डोना पिलरला तिथे घेऊन जाणाऱ्या माणसाबरोबर मीही गेले. तेव्हा तिने जो ड्रेस घातला होता, तो मला गोयाने काढलेल्या मिरवणुकीच्या अग्रभागाच्या चित्रातील ड्रेसची आठवण करून देत होता.

त्या रात्री, उडत्या पाऊलांनी चालण्याचा, अंडालुसियन घोड्यावर स्वार होऊन जाण्याचा व ओरडणारे सहा बैल मागे चालत असल्याचा तो अनुभव फार सुंदर होता.

खूपशा श्रीमंत उमरावांनी डोना पिलरला मागणी घातली होती. पण तिच्या आईच्या नकारामुळे तिने त्यांना नाकारले. आईचे लग्न पंधराव्या वर्षी झाले होते. तिच्या मुलीचे लग्न विसाव्या वर्षीही झालेले नसावे, हे चांगले नव्हते. मुलगी लग्नाची कशाकरता थांबली आहे, असे विचारल्यावर ते जमणे अवघड असल्याचे कारण पुढे केले गेले. लग्न करणे हे एक कर्तव्यच होते. पिलर हट्टी होती. प्रत्येकाला नकार द्यायचे काही कारण ती शोधून काढे.

मग सत्य बाहेर आले.

उमरावाच्या पत्नी त्यांच्या मुलीबरोबर, पिलरबरोबर जुन्या फॅशनच्या टांग्यातून दिवसा छान छान जागी चक्कर मारत असे. त्यात समुद्राशेजारील फरसबंद रस्ता असे. त्या दोघींचे मुळीच पटत नसे. त्या एकमेकींकडे बघत नसल्याचे ढोंग करत. पण त्याना छेदून दुप्पट वेगाने जाणाऱ्या, करडी, सुंदर

खेचरे ओढत असलेल्या तरतरीत गाडीवरून पिलरची नजर ढळत नसे. तिच्या आईच्या काहीशा विरोधभासात्मक नजरेला तिला नजर द्यायची नसे. गाडीच्या चालकावर तिची नजर पडली, तेव्हा तो सेव्हीलमधील सर्वात देखणा माणूस असल्याचे तिला जाणवले. त्याच्या सुंदर गणवेषात तो प्रेक्षणीय दिसे. अर्थात कोणालाच समजले नाही, की काय झाले पण पिलर जितके जास्त त्याच्याकडे पाही, तितके तिला त्याचे बघणे आवडे. काही कारणाने, या गोष्टीतील हा जोडी भेटल्याचा भाग गूढच राहिला. स्पेनमध्ये सगळे सामाजिक स्तर एकमेकात मिसळून गेले होते. स्वयंपाक्याच्या धमन्यांमध्ये मालकापेक्षा जास्त खानदानी रक्त वहात असणे शक्य होते. पिलरला समजले, मला वाटते समाधानाशिवाय नाही, की गाडीचा चालक जोस हा लिऑनच्या पुरातन कुटुंबाचा वारस आहे. अंडालुसियामध्ये त्याच्याइतके उल्लेखनीय कुणीच नव्हते. आणि जन्माचे म्हणाल, तर त्यात निवडण्यासारखे थोडेच असते. फक्त तिचे आयुष्य उमरावी घरात गेले होते तर नशीबाने तो बग्गी चालवत होता. कोणालाच याची खंत नव्हती. कारण फक्त त्या उच्च जागी त्याने तिला, सेव्हीलमधील सर्वात कठीण तरुण स्त्रीला, आकर्षित केले होते. ते वेड्यासारखे एकमेकांच्या प्रेमात पडले. हे असे झाले आणि त्यानंतर लगेच आधीच्या उन्हाळयात त्याना सॅन सेबॅस्टीअन येथे भेटलेल्या, मारक्विस डे सॅन इस्टेबन नावाच्या एका तरुणाने तिच्या आईला पत्र लिहिले आणि पिलरला मागणी घातली. तो खूपच योग्यतेचा होता. फिलीप दोनच्या काळापासून दोन्ही कुटुंबाचे घनिष्ठ संबंध होते. आईने पिलरला हे सांगितले व आता काही

झाले तरी हे लग्न करायचे ठरवले. “खूप काळ तुझी लग्नासंबंधी टाळाटाळ सुरु आहे. आता हे लग्न कर नाहीतर मग कॉनव्हेंटमध्ये जाऊन जोगीण हो.” अशी तंबी पिलरला आईकडून देण्यात आली.

पिलर म्हणाली, “मी यापैकी काहीच करणार नाही.”

“मग तू काय करणार आहेस? मी तुला खूप दिवस घरात ठेवले आहे.”

“मी जोस लिऑनबरोबर लग्न करणार आहे.”

“तो कोण आहे?”

पिलर क्षणभर कां कू करू लागली. आणि खरेच अशी आशा आहे की ती थोडीशी लाजली.

“तो डे मार्बेला बाईसाहेबांच्या बग्गीचा चालक आहे.”

“कोण बाईसाहेब?”

“डे मार्बेला बाईसाहेब.”

“मला ती चांगली आठवते आहे आणि माझी खात्री आहे, की मी तुला विरोध केला, तर तू नक्की अडून बसशील. झोपेतून जागी झाल्याप्रमाणे रडशील, भेकशील, वाद घालशील. अगदी शोभा करशील.” लोक म्हणाले की तिच्या आईने तिला थोबाडीत मारले, तिचे केस ओढले. पण माझे असे मत आहे, की पिलर अशा परिस्थितीत उलट मार खायला तयार होती. तिने परत सांगितले, की ती जोस लिऑनवर प्रेम करते व तो देखील तिच्यावर प्रेम

करतो आणि ती त्याच्याबरोबर लग्न करणार आहे. तिच्या आईने कुटुंबातील सदस्यांची सभा बोलावली. त्या सर्वांसमोर हे मांडले गेले. त्यातून असे ठरवले गेले, की त्यांची नाचक्की होण्यापासून वाचण्यासाठी, पिलरने तिचे जोसबद्दलचे खोटे आकर्षण संपेपर्यंत देश सोडून, लांब कुठेतरी जाऊन रहावे. पिलरला या बेताचा सुगावा लागला तेव्हा तिने एका रात्री सगळे झोपलेले असतांना तिच्या घराच्या खिडकीतून पोबारा केला व तिच्या प्रियकराच्या पालकांकडे रहायला गेली. ते चांगले लोक होते. ते गुडालक़्युव्हिर नदीच्या दुसऱ्या काठाला असलेल्या थोड्या मागासलेल्या भागातील ट्रीआना नावाच्या लहानशा सदनिकेत रहात असत.

त्यानंतर काही लपवून ठेवणे शक्य नव्हते. काय व्हायचे ते होऊन गेले होते. गटागटाने हे प्रकरण चघळले जाऊ लागले. आसपासच्या वाइनच्या दुकानातून, वेटर मंडळी ट्रेमधून स्पॅनिश शेरीचे पेले फिरवतांना दिसू लागली. ते लोक अफवा उठवू लागले व प्रकरणावर हसू लागले. पिलरने झिडकारलेल्या तरुणांवर अभिनंदनाचा वर्षाव होऊ लागला. काय पण पळवाट शोधली आहे! तिची आई दुःखात होती. तिचा विश्वासू मित्र असलेल्या व ती पापे कबूल करत असलेल्या आर्चबिशपकडे जाण्या व्यतिरिक्त काही अजून काही बरे तिला सुचत नव्हते. तिने त्याच्याकडे जाऊन, आकर्षणाच्या भोवऱ्यात सापडलेल्या तिच्या मुलीविषयी काही उपाय सांगायला सांगितला. पिलरला बिशपच्या राजवाड्यात रहायची आज्ञा देण्यात आली. आणि कुटुंबातील भांडणे सोडवणारा, चांगला म्हातारा माणूस,

मोठा कसून प्रयत्न करून तिला तिच्या वागणुकीतील मूर्खपणा दाखवू लागला. पण तिचे मन काही वळेना. कोणी काहीही सांगितले, तरी तिला हे काही पटेना, की ती प्रेम करत असलेल्या माणसाला तिने सोडावे. खूपशा खानदानी स्त्रिया शेजारील खोलीत बसलेल्या होत्या. त्याना तिला शेवटची विनवणी करण्यासाठी पाठवण्यात आले. पण ते फुकट गेले. पिलर तिच्या निवासस्थानी आली आणि रडणाऱ्या स्त्रिया आर्चबिशपबरोबर राहिल्या. आर्चबिशप जितका धार्मिक होता, तेवढात परिस्थिती हाताळण्यातदेखील कुशल होता. जेव्हा त्याला आढळले, की आता ती भरकटलेली मुलगी कोणाचे ऐकायच्या मनस्थितीत आहे, तेव्हा त्याने तिला डे मार्बेला बाईसाहेबांकडे जायचा उपदेश केला. ती सेव्हीलमधील सर्वात हुशार बाई होती. ती कदाचित काही करू शकली असती.

पहिल्यांदा डे मार्बेला बाईसाहेबांनी रागाने नकार दिला. तिच्या सर्वात मोठ्या शत्रूच्या मुलीला विनवणी करणे, तिला लाजलावणे वाटत होते. लवकरच डोस पालोसचे घर नष्ट झाले असते. आर्चबिशपला हेकेखोरपणे अडलेल्या बायकांशी वागण्याची सवय होती. त्याने हळूवारपणे व लबाडीने तिला तिचे मन बदलायला भाग पाडले. शेवटी, ती फ्रेंच बाई, डे मार्बेला बाईसाहेबांना शरण जायला तयार झाली. मनात राग असतांना तिने निरोप पाठवून, ती त्याना भेटायला तयार आहे का, असे विचारले. भेटायला बोलावले. आणि मग होकारानंतर, त्या दुपारी त्या दोघी डे मार्बेला बाईसाहेबांच्या दिवाणखान्यात त्याना भेटल्या. पिलरकडून बाईसाहेबांनी

पहिल्यांदाच गोष्ट ऐकली. पण दुःखी आईकडून तिने परत तिला काही माहिती नसल्यासारखी तीच गोष्ट ऐकली. ती ऐकून तिचे खूप मनोरंजन झाले. अविचारी इच्छा असलेल्या मुलीच्या आईला, त्या उमरावाच्या पत्नीला, तिच्यासमोर गुडघे टेकायला लाऊन, बाईसाहेबांनी विजय साजरा केला. पण ती मनाने चांगली बाई असल्याने, तिला विनोदबुद्धीही होती.

ती म्हणाली, "ही फार कमनशिबी परिस्थिती आहे. माझा नाईलाज आहे, की माझ्या एका नोकराला या प्रसंगातून जावे लागते आहे. पण मी नेमके काय करावे, हे मला कळत नाही."

पिलरच्या आईला डे मार्बेला बाईसाहेबांच्या रंगरंगोटी केलेला चेहऱ्यावर थोबाडीत देणे आवडले असते, पण तिने तिचा राग आवरण्याच्या केलेल्या प्रयत्नामुळे, तिचा आवाज थोडा थरथरू लागला.

"हे मी माझ्याकरता तुला सांगत नाही आहे. हे पिलरसाठी आहे. मला माहिती आहे, की तू या शहरातील सर्वात हुशार बाई आहेस. मला आणि आर्चबिशपला असे वाटते, की जर यातून काही मार्ग काढायचा असेल, तर तुझ्या चाणाक्ष बुद्धीने तू तो काढू शकशील."

डे मार्बेलाला समजले, की तिला स्तुती करून भुरळ पाडणे चालू होते. तिची काही हरकत नव्हती. तिला ते आवडले.

"तुम्ही मला विचार करायला अवसर दिला पाहिजे."

"अर्थात, जर तो सभ्य गृहस्थ असेल, तर त्याने माझ्या मुलाला बोलावले असते आणि माझ्या मुलाने जोस लिऑनला ठार मारले असते. पण

डे मार्बेलाच्या बग्गी चालकाबरोबर डोस पालोसचा उमराव द्वन्द्व खेळू शकत नाही.”

“कदाचित बरोबर असेल.”

जुन्या काळात सर्व सोपे होते. मी काही गुंडांना भाड्याने घेतले असते आणि एका रात्री रस्त्यावर, त्या मूर्खाचा गळा चिरला असता. पण हे सगळे कायदे पाळून, अलीकडे चांगल्या सभ्य लोकांना अपमानापासून स्वतःचे संरक्षण करायचा काही मार्ग उरला नाही.”

बाईसाहेब पुटपुटल्या, “अडचणीवर मात करायची ही जोरदार पद्धत मी अमान्य केली असती कारण मग मी माझ्या बग्गीचा चांगला चालक गमावून बसले असते.”

पिलरची आई रागाने ओरडली, “पण त्याने जर माझ्या मुलीशी लग्न केले, तर तो चालकाची नोकरी चालू ठेवणार नाही.”

“तू पिलरला जगण्यासाठी काही पैसे देणार आहेस का?”

“मी? फुटकी कवडीदेखील देणार नाही. मी पिलरला सांगितले आहे, की तिला माझ्याकडून काही मिळणार नाही. त्याना उपाशी मरू दे. मला काही पर्वा नाही.”

“ठीक आहे. मग मला वाटते, तो माझ्याकडची बग्गीच्या चालकाची नोकरी सोडणार नाही. माझ्या तबेल्यांमध्ये खूप छान खोल्या आहेत.”

पिलरची आई खचून जाते.

डे मार्बेला बाईसाहेब लाल होतात.

पिलरची आई रडत म्हणते, “आपल्यात काय घडले हे सर्व विसरून जाऊ या. तू मला असा हास्यविषय बनायला सोडू शकत नाहीस. मी कधी तुझा अपमान केला असेल, तर मी तुला मला क्षमा करायची विनंती करते.” ती रडू लागली.

शेवटी डे मार्बेला बाईसाहेब म्हणाल्या, “अग, डोळे पूस. मला जमेल, ते मी करते.”

“तुला करण्यासारखे काही आहे का?”

“कदाचित. हे खरे आहे का, की पिलरकडे तिचा असा पैसा नाही?”

“ती माझ्या मर्जीविरुद्ध वागली तर नाही.”

डे मार्बेला बाईसाहेब चमकदार हसू हसल्या.

“सर्वसाधारणपणे असे मत आहे, की दक्षिणेकडचे लोक अद्भुतरम्य असतात आणि उत्तरेकडचे लोक जेवढ्यास तेवढे असतात. याच्या उलटेही खरे आहे. उत्तरेकडचे लोक सुधारता येणार नाहीत, एवढे अद्भुतरम्य असतात. मी खूप काळ स्पेनमध्ये राहिले आहे. त्यामुळे मला माहिती आहे, की तुम्ही लोकांनी प्रत्यक्ष काही केले नाही, तर मग तुमचे काही खरे नाही.

हे फारसे सुखावह नसलेले शेरे मारतांना पिलरची आई उघडपणे पश्चात्ताप करण्यामुळे मोडून पडली होती. ओहो, पण तिला त्या बाईचा किती द्वेष वाटत होता! डे मार्बेला बाईसाहेब उठून उभ्या राहिल्या.

“दिवसभरात तू माझ्याकडून काही ऐकशील.”

तिने ठामपणे तिच्या पाहुणीचा निरोप घेतला.

पाच वाजता बग्गी मागवली गेली आणि त्याच्या आधी दहा मिनिटे त्यासाठी बाईसाहेब तयार झाल्या व जोसला बोलावले. जेव्हा तो त्याचा फिकट करडा गणवेष घालून दिवाणखान्यात आला, तेव्हा तो दिसायला खूप छान असल्याचे ती नाकारू शकली नाही. तो जर तिच्या स्वतःच्या गाडीचा चालक नसता, तर --- पण आता तो विचार करायची वेळ नव्हती. तो तिच्यासमोर सहज चटपटीतपणे पण आत्मविश्वासपूर्ण अहंकाराने उभा राहिला. त्याच्या आविर्भावात अती सेवाभाव नव्हता.

बाईसाहेब स्वतःशी पुटपुटल्या, ‘एक ग्रीक देव, फक्त अंडालुसियामध्येच असे लोक जन्माला येऊ शकतात.’ मग मोठ्याने म्हणाल्या. “मी असे ऐकते, की तू म्हणे डोस पालोस बाईसाहेबांच्या मुलीशी लग्न करणार आहेस.”

“जर त्यांची परवानगी असेल, तर.”

तिने तिचे खांदे उडवले.

“तू कोणाशीही लग्न का करेनास, त्याच्याशी माझा काही संबंध नाही. पण तुला हे माहिती असू दे, की त्यानंतर डोना पिलरला काही भविष्य उरणार नाही.”

“हो बाईसाहेब. माझ्याकडे चांगली जागा आहे आणि मी माझ्या बायकोला तिथे ठेऊ शकतो. मी तिच्यावर प्रेम करतो.”

“त्यासाठी मी तुला दोष देऊ शकत नाही. ती सुंदर मुलगी आहे. पण मला तुला फक्त एवढे सांगणे बरोबर वाटते, की मला माझ्या बग्गीसाठी विवाहित चालक नको. तुझ्या लग्नाच्या दिवशी तू माझी नोकरी सोड. मला तुला एवढेच सांगायचे होते. तू जाऊ शकतोस.”

तिने नुकतेच पॅरीसहून आलेले रोजचे वर्तमानपत्र उघडले. पण तिच्या अपेक्षेप्रमाणे जोस गेला नाही. तो खाली मान घालून उभा होता. आता तिने वर पाहिले. “तू का थांबला आहेस?”

तो त्रासदायक सुरात बोलला, “मला तुम्ही नोकरीवरून काढून टाकाल, हे माहिती नव्हते.”

“तुला नक्कीच दुसरी नोकरी मिळेल.”

“हो, पण --- “

तिने कडकपणे विचारले, “मग आता काय?”

त्याने चुळबुळ करत सुस्कारा टाकला.

“स्पेनमध्ये दुसरीकडे कुठेच आपल्यासारखी बग्गी नाही. ती दोन सुंदर खेचरे, माणसासारखी आहेत. मी उच्चारलेला प्रत्येक शब्द त्यांना समजतो.”

बाईसाहेब त्याच्याकडे बघून अशा हसल्या, की आधीच वेड्यासारखे प्रेमात न पडलेल्या कुणीही डोके हलवले नसते.

“मला वाटते, तुला माझ्याकडची नोकरी किंवा तुझी प्रेयसी यातील एका कुणाची तरी निवड करावी लागेल.”


तो एका पायावरून दुसऱ्या पायावर रेलला. त्याने सिगरेट काढण्यासाठी खिशात हात घातला, पण नंतर तो कुठे आहे हे आठवून, स्वतःला सावरले. त्याने त्याच्या मालकीणबाईंकडे बघितले. त्याच्या चेहऱ्यावर अंडालुसियामधील सगळ्यांना माहिती असलेले ते उद्दाम हसू उमटले.

"असे असेल तर मी हो नाही करू शकत नाही. पिलरला हे समजले पाहिजे, की यामुळे माझे स्थान सर्वस्वी बदलेल. आठवड्यातील कुठल्याही दिवशी एखाद्याला बायको मिळू शकते, पण अशी नोकरी आयुष्यात एकदाच मिळू शकते. एका बाईपायी ती गमावायला मी काही मूर्ख नाही."

अशा तऱ्हेने त्या साहसाचा अंत झाला. डे मार्बेला बाईसाहेबांकडची जोसची नोकरी चालू राहिली. पण तिच्या लक्षात आले, की ते जेव्हा रस्त्यातून वेगाने जात असत, तेव्हा तिच्या अलीकडील टोपीबरोबर तिच्या देखण्या चालकाकडेही लोकांचे लक्ष जात असे. आणि एक वर्षाने, पिलरने मारक्विस डे सॅन इस्टेबनशी लग्न केले.

# The happy couple

# सुखी जोडपे




मला लँडन खूप आवडत होता, हे माहिती नव्हते. मी असलेल्या क्लबमध्ये तो सभासद होता. जेवायला बहुतेक वेळा मी त्याच्या शेजारी बसायचो. तो ओल्ड बेले येथे जज्ज होता. एका रुचीपूर्ण व मला ऐकायच्या असलेल्या केसमध्ये मला त्याच्यामुळे बसायला पुढे जागा मिळाली.

त्याच्या लांब विगमध्ये, लाल फडकणाऱ्या कपड्यामध्ये, टोपीच्या लोळणाऱ्या लांब टोकामध्ये, उभट गोऱ्या चेहऱ्यामध्ये, पातळ ओठांमध्ये व

थोडे घाबरवणाऱ्या फिकट निळया डोळयांमध्ये, तो कोर्टातील उठून दिसणारी व्यक्ती होता. तो कडक व न्यायप्रिय होता. गुन्हेगार कैद्याला तो देत असलेल्या लांबलचक तुरुंगवासाच्या तंबीमुळे, मी कधीकधी अस्वस्थ होत असे. पण जेवायच्या टेबलावरील त्याचा सुखद विनोद आणि केसची चर्चा करायची त्याची तयारी, यामुळे मला त्याच्याबरोबर रहायला आवडत असे. त्याच्या किरकोळ आजारपणाच्या तक्रारीकडे मी दुर्लक्ष करत असे. एखाद्या माणसाला फाशीची शिक्षा सुनावल्यावर, तो अस्वस्थ होत नसे का, असे मी त्याला एकदा विचारले होते, तेव्हा तो पोर्ट पिता पिता हसला होता.

"मुळीच नाही. मी नीट सारासार विचार केलेला असे आणि ज्युरीनेही त्याला दोषी ठरवलेले असे. मी त्याला सुनावलेली फाशीची शिक्षा त्याने केलेल्या गैरकृत्यासाठी योग्यच असे. आणि कोर्ट उठले, की मी माझ्या डोक्यातून तो विषय काढून टाके. भावनामय मूर्ख माणूसच दुसरे काही करेल."

त्याला माझ्याशी बोलायला आवडत असे, हे मी जाणून होतो. पण क्लबमधील ओळख याहून जास्त काही  नसे. त्यामुळे एक दिवस त्याने मला अशी तार पाठवली की तो इटालीला जातांना, वाटेत रिव्हिएरामध्ये सुट्टी घालवणार आहे आणि त्याला दोन तीन दिवस माझ्याबरोबर रहायला आवडेल, तेव्हा मला चांगलेच आश्चर्य वाटले. मी त्याला उलट तार करून कळवले, की मला असे करायला आवडेल. पण मी त्याला स्टेशनवर काहीशा भीतीदायक काळजीमध्ये पाहिले.

एक दिवस तो आल्यावर, मी माझी शेजारी व जुनी मैत्रिण असलेल्या मिस ग्रे ला मला जेवणासाठी मदत करायला सांगितले. ती पुरेशी प्रौढ होती. सुंदर आणि ओघवता संवाद साधणारी होती. त्यात कोणी खंड पाडू शकत नसे. मी त्यांना छान जेवण दिले. माझ्याकडे जज्जला देण्यासाठी पोर्ट नसली, तरी मी त्याला चांगली वाइन देऊ शकत होतो. मी त्याला ती दिली, तेव्हा त्याने थोड्या रागाने ती नाकारली होती, पण त्याला ती आवडली.

तो म्हणाला, "मला हे कधीच कळत नाही, की सुसंस्कृत वाटणारे लोक फक्त रानटीच नव्हे, तर उबग आणणारे नकोसे नकार कुणाच्या रास्त इच्छेला कसे काय देऊ शकतात.

मिस ग्रे व मी कोरडी मार्टीनी घेतली. जरी तो अधीरपणे व न आवडता आम्हाला बघत होता, तरी आम्हाला कोणी रोकू शकले नाही.

जेवण यशस्वी ठरले. चांगली वाइन व मिस ग्रे चे हलके फुलके, आनंदी संभाषण यामुळे लँडनमध्ये मला मित्रत्वाची व खुषीची, कधी न दिसणारी भावना दिसली. मला हे सरळपणे वाटत होते, की त्याचा कडक स्वभाव नकोसा होऊन, त्याला मिस ग्रे चा बायकी सहवास, तिचा ड्रेस, थोडे करडे होऊ लागलेले डोके, नाजूक अंगलट व चमकते डोळे गूढपणे व मजबूतपणे आकर्षक वाटत होते. जेवणानंतर पूर्ण समाधानासाठी, जुन्या ब्रँडीबरोबर जज्ज खूप तास आम्हाला त्याचा सहभाग असलेल्या गाजलेल्या खटल्यातील गमती जमती सांगत राहिला. जेव्हा मिस ग्रे ने दुसऱ्या दिवशी

आम्हाला जेवायला बोलावले, तेव्हा मला काही नवल वाटले नाही. मी हो म्हणायच्या आधी लँडनने मोठ्या आनंदाने त्याची तयारी दर्शवली.

ती गेल्यावर तो म्हणाला, “फार छान बाई आहे. शहाणी व बुद्धिमान आहे. मुलगी असताना ती सुंदर दिसत असणार. आताही काही वाईट नाही. तिने लग्न का केले नाही?”

“ती नेहमी म्हणते, की तिला कोणी विचारलेच नाही.”

“हे मूर्खासारखे उत्तर आहे. बायकांनी लग्न करायलाच पाहिजे. खूप बायकांना हल्ली स्वातंत्र्य हवे असते. मला त्यांचे हे विचार पटत नाहीत.”

सेंट जीनच्या समुद्राकडे तोंड करून मिस ग्रे चे लहानसे घर होते. कॅप फेरट येथे माझ्या घरापासून काही मैलांवर ते होते. दुसऱ्या दिवशी आम्ही गाडी चालवत, तिथे गेलो. आम्हाला तिने दिवाणखान्यात बसवले.

ती मला म्हणाली, “माझ्याजवळ तुमच्यासाठी एक नवलपूर्ण गोष्ट आहे. ती म्हणजे, क्रेग्ज येत आहेत.”

“शेवटी तुमची त्यांच्याशी ओळख झाली तर!”

“मला हे फार विचित्र वाटले, की शेजारी रहायचे, त्याच समुद्रावर स्नान करायचे आणि बोलायचे मात्र नाही. त्यामुळे मी त्यांना आग्रह केला. त्यामुळे आज ते जेवायला येणार आहेत. मला तुम्हाला त्यांना भेटवायचे आहे.” ती लँडनकडे वळून बोलली, “मला वाटते, तुमची काही हरकत नसेल.”

तो फार चांगल्या मनस्थितीत नव्हता. तो म्हणाला, "मिस ग्रे, तुमच्या कोणाही मित्रमंडळींना भेटायला मला आवडेल."

"ते काही माझे मित्र नाहीत. मी त्यांच्यापैकी बऱ्याचजणांना पाहिले आहे. पण कालपर्यंत मी त्यांच्याशी कधी बोलले नव्हते. एका लेखकाला व एका प्रसिद्ध जज्जला भेटणे, ही त्यांच्यासाठी चांगली मेजवानी ठरेल."

"मी क्रेग्जबद्दल मिस ग्रेकडून आधीच्या तीन आठवड्यात बरेच ऐकले होते. त्यांनी तिच्यापुढचे घर घेतले होते. पहिल्यांदा तिला त्यांचा त्रास होण्याची भीती वाटली होती. तिला एकांतवास आवडे. समाजात मिळून मिसळून, लोकांच्या क्षुल्लक गोष्टींमध्ये रस घेण्याचा त्रास घेणे, तिला नको वाटे. पण लवकरच तिला शोध लागला, की तिला त्यांच्याशी ओळख करून घेण्यात जितके स्वारस्य नाही, तेवढेच त्यांनाही नाही. पण तरी त्या लहान जागेत, ते दिवसातून दोनतीनदा तरी भेटत. पण क्रॅग्जनी कधी ती त्याना देत नसे त्याप्रमाणेच, एखादा दृष्टीक्षेप टाकण्यापलीकडे ओळख दिली नाही.

मिस ग्रे ने मला सांगितले, की तिच्या खासगीपणावर आक्रमण न करण्याचे, मोठे युक्तीबाज असे त्यांचे धोरण होते. पण माझ्याकडे एक कल्पना होती, की त्यांच्याशी बोलून तिचा काही अपमान होणार नव्हता. ती थोडी कोड्यात पडली होती. त्यांना तिच्यासारखीच थोडी ओळख करून घ्यायची होती. मी काही वेळापूर्वी असा कयास केला की पहिले पाऊल उचलायला, ती काही विरोध करणार नाही. एका प्रसंगी, आम्ही चालतांना त्यांना मागे टाकले. तेव्हा मी त्यांना नीट पाहू शकलो. लाल, प्रामाणिक चेहरा असलेला,

करड्या मिशा असलेला आणि दाट, बळकट, करडे केस असलेला क्रेगी, देखणा मनुष्य होता. तो स्वतःला छान ठेवे. फसवा उत्साह दाखवण्याची त्याची पद्धत होती. तो चांगले पैसे राखून असलेला निवृत्त दलाल होता. त्याची बायको सुंदर, उंच, फिक्या केसांची छान रचना केलेली, लांब नाकाची, मोठ्या तोंडाची, पिळदार शरीराची व हवेने रापलेल्या चेहऱ्याची होती. ती फक्त साधी सरळ नव्हे तर गंभीर होती. तिचे कपडे छान, सिनेमातल्यासारखे असायचे. ते डौलदार असले, तरी तिच्या अंगावर शोभून दिसत नसत. ते अठरा वर्षाच्या मुलीला जास्त शोभले असते. मिसेस क्रेग खात्रीने चाळीशीची होती. मिस ग्रे ने मला सांगितले, की तिचे कपडे उत्तम बेतलेले व महागाईचे असत. मला वाटते, तो चारचौघांसारखा दिसायचा आणि ती कशी दिसायची याबद्दल एकमत नव्हते. मी मिस ग्रे ला सांगितले, की ते त्यांच्यात्यांच्यातच रहात असत, त्यामुळे ती नशीबवान होती.

ती उत्तरली, "त्यांच्याबद्दल काही जरा गोड आहे."

"काय?"

"त्यांचे एकमेकांवर प्रेम आहे. ते मुलांचे कौतुक करतात."

त्यांचे मूल एक वर्षापेक्षा मोठे नव्हते. यावरून, मिस ग्रे ने निष्कर्ष काढला होता, की त्यांना लग्न करून फार वर्षे झाली नसावीत. त्याना त्या मुलासकट बघायला तिला आवडे. एक दाई त्या मुलाला सकाळी लहान बाबागाडीतून फिरायला नेत असे. पण त्यापूर्वी त्याचे आई वडील पाऊणतास मोठ्या आनंदाने, त्याला चालायला शिकवत असत. ते काही यार्ड अंतरावर

उभे रहात आणि त्या मुलाला एकाकडून दुसऱ्याकडे जायला प्रवृत्त करत. प्रत्येक वेळी ते पालकांच्याकडे झेपावले, की ते त्याला कौतुक करत उचलून घेत व घट्ट जवळ धरत. आणि शेवटी ते बाबागाडीतून जाऊ लागे, तेव्हा ते व तो दूर जातांना सहन न झाल्यासारखे, त्याच्याकडे बघत रहात.

त्यांच्या बागेच्या हिरवळीवर हातात हात घालून चालतांना त्यांना मिस ग्रे नेहमी बघे. ते एकत्र इतके आनंदी असत, की संभाषणाची गरज नसे. त्यांचे एकमेकांबद्दलचे प्रेम बघून त्या भावनाशील नसलेल्या, हट्टी बाईचे अर्थातच तिच्या उंच, देखण्या नवऱ्याबद्दलचे प्रेम बघून, तिला बरे वाटे. मिसेस क्रेगला तिच्या नवऱ्याच्या कोटावरील न दिसणारी धूळ ब्रशने झटकतांना पाहणे, हे छान दृष्य होते. मिस ग्रे ची खात्री होती, की तिने मुद्दाम त्याच्या मोज्यांना भोके पाडली होती, जेणेकरून तिला ती भोके रफू करून बुजवण्याचा आनंद मिळावा. तो देखील तिच्यावर तितकेच प्रेम करतांना दिसे. दर काही वेळाने तो तिच्याकडे नजर टाके आणि ती त्याच्याकडे बघून हसे. तो तिला छानपणे थोडे थोपटल्यासारखे करे. कारण ते काही आता तरुण नव्हते. त्यांची एकमेकांबद्दलची ओढ मनाला स्पर्शणारी होती.

मिस ग्रे ने कधी लग्न का केले नाही, हे मला कधीच माहिती नव्हते. मला जज्जइतकीच खात्री होती, की तिला खूपदा तशी संधी आली असणार. मग ती माझ्याशी क्रेगजबद्दल बोले, तेव्हा मी मला विचारी, की हे लग्नाळू प्रेम तिच्या हृदयात थोडी कळ उठवत नसे का. मला वाटे की पूर्ण सुख ही या

जगात फार दुर्मिळ गोष्ट आहे. पण हे जोडपे त्याचा मनापासून आनंद घेत होते. आणि असे असेल, की मिस ग्रे त्यांच्यात इतक्या विचित्रपणे रुची घेत होती, कारण ती एकटी राहिल्यामुळे ती कशाला तरी मुकली असल्याची भावना, ती तिच्या हृदयात दाबून टाकू शकत नव्हती.

त्यांची पहिली नावे काय होती, हे तिला माहिती नसल्याने, ती त्याना एडविन व अँजेलीना म्हणत असे. तिने त्यांच्याबद्दलची गोष्ट बनवली होती. एक दिवस तिने ती मला सांगितली. आणि मी जेव्हा त्यावर विचार केला, तेव्हा मला ती अपूर्ण वाटली. मला जेवढे आठवते त्या प्रमाणे, ती अशी आहेः खूप वर्षांपूर्वी, ते एकमेकांच्या प्रेमात पडले --- कदाचित वीस वर्षे --- जेव्हा अँजेलीना तरुण होती, विशिपेक्षा कमी वयातील ताज्या डौलात होती. एडविन शूर तरुण होता व आयुष्याच्या त्या टप्प्यावर बाहेर पडला होता. देव प्रेमाकडे दयाळूपणे बघतात, असे म्हटले जाते. परंतु व्यावहारिक गोष्टींनी डोक्याला त्रास करून घेत नाहीत. एडविनकडे व अँजेलीनाकडेही काहीच पैसा नव्हता. त्यामुळे त्यांना लग्न करणे शक्य नव्हते. पण त्यांच्याकडे धैर्य, आशा व विश्वास होता. एडविनने दक्षिण अमेरिकेला किंवा मलायाला, कुठे आवडेल तिथे, जायचे ठरवले. तिथे नशीब कमावले आणि मग त्याच्यासाठी अधीरपणे थांबलेल्या मुलीशी लग्न केले. जेव्हा तुम्ही वीसचे असून सर्व आयुष्य तुमच्यासमोर पडलेले असते, तेव्हा यात दोन तीनपेक्षा जास्त, फार तर पाच वर्षे गेली असावी का? मध्यंतरीच्या काळात अँजेलीना तिच्या विधवा आईबरोबर राहिली. पण ठरवल्याप्रमाणे गोष्टी सुरळीत घडल्या नाहीत.

एडविनला पुरेसा पैसा जमा करणे, हे त्याच्या अपेक्षेपेक्षा जास्त कठीण वाटले. फक्त अँजेलीनाचे प्रेम व तिची कोवळीकेने भरलेली पत्रे त्याला झगडण्यासाठी प्रोत्साहन देत राहिली. पाच वर्षांनंतर, त्याने सुरवात केली त्यापेक्षा तो फार काही पैसा राखून नव्हता. अँजेलीनाने त्याला खुषीने साथ दिली असती, पण अंथरुणाला खिळलेल्या बिचाऱ्या आईला सोडून जाणे, तिला शक्य नव्हते. त्यामुळे त्यांना धीर धरण्यावाचून इलाज नव्हता. त्यामुळे हळूहळू वर्षे जात होती. एडविनचे केस करडे झाले. अँजेलीना गंभीर, दमलेली व आजारलेली दिसू लागली. तिला थांबण्याशिवाय काही करता येत नव्हते. हा त्यांचा कठीण काळ होता. दुष्ट आरशामधील तिचे पूर्वीचे सुंदर रूप एक एक करून मावळू लागले. तिला असा शोध लागला, की फसवून हसणारे तारुण्य तिच्या गुडघ्यात कळ आणून तिला वाकुल्या दाखवत आहे. तिचा गोडपणा जाऊन, तिथे तक्रारखोर अपंगत्व मूळ धरु लागले. ती रहात असलेल्या लहान गावातील समाजामुळे तिचे मन कोते झाले. तिच्या मैत्रिणींची लग्ने होऊन, त्यांना मुले झाली. पण ती एखाद्या कैद्यासारखी कर्तव्य बजावत राहिली.

एडविन अजूनही तिच्यावर प्रेम करतो, याचे तिला आश्चर्य वाटले. तो कधी परत तरी येईल का, हे देखील तिला कळेना. ती बिचारी निराश होई. दहा वर्षे गेली. पंधरा गेली. वीस गेली. एडविनने तिला लिहिले, की सर्व काही सुरळीत होऊन आता त्याला आरामात रहाण्याइतके पैसे मिळत आहेत. जर तिला अजून त्याच्याशी लग्न करायची इच्छा असेल, तर तो लगेच परतू शकतो.

त्याच वेळी अँजेलीनाच्या आईने तिच्या स्वतःसाठी देखील एक त्रास ठरलेले जग सोडून जायचा विचार केला. पण इतक्या दीर्घ विरहानंतर ते भेटले, तेव्हा अँजेलीनाने दुःखाने पाहिले, की एडविन पूर्वीप्रमाणेच तरुण होता. केस करडे झाले होते, हे खरे होते. पण ते त्याला शोभून दिसत होते. तो नेहमीच छान दिसत असे. पण आता तो पूर्णपणे उमलून देखणा दिसत होता. तिला ती स्वतः म्हातारी वाटली. तिला तिचा कोतेपणा, तिचा स्थानिक रहिवास जाणवत होता. त्याच्या परदेशातील तात्पुरता निवासामुळे त्याला जी विशालता लाभली होती, त्यापुढे तिचे एकाच गावढळ जागी चिकटून रहाणे, तिला डाचत होते. तो पूर्वीसारखाच आनंदी व मोकळा होता. पण तिचा उत्साह चिरडला गेला होता. जीवनाचा कडूपणा तिच्यात उतरला होता. त्या दक्ष आणि कृतीशील माणसाला वीस वर्षांपूर्वीच्या वचनाने बांधून ठेवणे तिला राक्षसी वाटत होते. तिने त्याला स्वातंत्र्य बहाल केले. तो मरणांतिक फिका पडला.

तो मोडून पडल्यासारखा ओरडला, "तुला माझी काहीच पर्वा नाही का?"

आणि तिला अचानक जाणवले --- ओहो, टोकाचा आनंद ---- ती अजूनही त्याला पूर्वीप्रमाणेच आवडत होती. तो तिचा पूर्वीसारखाच विचार करत होता. त्याच्या हृदयात ठसलेले तिचे चित्र तसेच होते. त्यामुळे जेव्हा त्यातील खरी बाई त्याच्यापुढे उभी ठाकली, तेव्हा त्याच्यासाठी ती अजूनही अठरा वर्षांचीच होती.

त्यामुळे ते विवाहबद्ध झाले. मिस ग्रे ने तिची गोष्ट गोड शेवटाकडे आणली, तेव्हा मी म्हणालो, “माझा यातील एकाही शब्दावर विश्वास नाही.”

ती बोलली, “माझी खात्री आहे, की ती खरी आहे आणि मी तुम्हालाही त्यावर विश्वास ठेवायला लावेन. माझा विश्वास आहे, की म्हातारे होईपर्यंत ते आनंदाने एकत्र राहिले.” मग तिने थोडा चतुर असा शेरा मारला, “त्यांचे प्रेम कदाचित आभासावर आधारलेले होते. पण त्यांच्या दृष्टीने त्याना ते खरेच भासत होते, मग आता काय प्रश्न उरत होता?”

मी तुम्हाला मिस ग्रे ने लावलेल्या शोधाची ही गोष्ट सांगितली, तेव्हा मी, मिस ग्रे आणि लँडन क्रेग्ज मंडळींची वाट पाहू लागलो.

मिस ग्रे ने जज्जला विचारले, “जर तुमच्या शेजारी रहाणारे लोक उशीर करू लागले, तर तुम्हाला कसे वाटते, याचा तुम्ही कधी अनुभव घेतला आहे का?”

त्याने कटूपणे उत्तर दिले, “नाही. मी स्वतः खूप वक्तशीर आहे आणि इतरांकडूनही तशीच अपेक्षा करतो.”

“मला वाटते, तुम्हाला दारू विचारणे योग्य ठरणार नाही, नाही का?”

“बाईसाहेब, कसेही.”

“पण माझ्याकडे चांगली शेरी आहे.”

जज्जने तिच्या हातातून बाटली घेतली व त्यावरील नाव वाचले. त्याच्या ओठांवर फिकट हसू तरळले. ”मिस ग्रे, हे सुसंस्कृत पेय आहे. तुमच्या परवानगीने मी ते घेतो. वाइनचा पेला कसा भरायचा, हे एखाद्या बाईला

माहिती असल्याचे मी पाहिलेले नाही. एखाद्याने बाईच्या कंबरेला धरावे पण बाटलीच्या गळ्याला धरावे.”

तो समाधान दर्शवत, जुन्या शेरीचे घुटके घेत असतांना, मिस ग्रे ने खिडकीतून बाहेर पाहिले.

“ओहो, त्यामुळे क्रेग्ज मंडळींना उशीर झाला. ते त्यांचे बाळ परत यायची वाट बघत होते.”

मी ती बघत होती, तिथे बघितले आणि दाईला बाबागाडी त्यांच्या घरापासून मिस ग्रे च्या घराच्या दिशेने आणतांना पाहिले. क्रेगने बाळाला बाबागाडीतून बाहेर काढले आणि हवेत उंच करून झेलले. बाळाने त्याच्या मिशा ओढत, आनंदाने चित्कार केला. मिसेस क्रेग शेजारी उभी राहून बघत होती. तिच्या चेहऱ्यावरील हास्यामुळे, तिचा कडक चेहरा आल्हादक वाटत होता. खिडकी उघडी असल्याने आम्हाला तिचा आवाज ऐकू आला.

“चल प्रिया, आपल्याला उशीर झाला आहे.”

त्याने बाळाला परत बाबागाडीत ठेवले आणि ते मिस ग्रे च्या दाराशी आले व घंटी वाजवली. नोकराणीने दार उघडून, त्यांना आत घेतले. त्यांनी मिस ग्रे शी हातमिळवणी केली. आणि मी जवळ उभा होतो म्हणून तिने माझी त्यांच्याशी ओळख करून दिली. मग ती जज्जकडे वळली.

“आणि मिस्टर आणि मिसेस क्रेग, हे सर एडवर्ड लँडन.”

एखाद्याने जज्जला पुढे येऊन, हात पसरलेले पाहिले असते. पण तो जागच्या जागीच उभा राहिला. त्याने डोळ्यांवर चष्मा चढवला. तो चष्मा मी

त्याला अनेक वेळा कोर्टात मोठ्या प्रयासाने वापरतांना पाहिले होते व आता त्याने नवीन पाहुण्यांकडे पण त्याच चष्म्यातून बघितले.

मी स्वतःशीच म्हणालो. “अरेरे, किती गलीच्छ मनुष्य आहे!”

त्याने डोळयांवरून चष्मा काढला व बोलला, “काय कसे काय? आपण पूर्वी भेटल्यासारखे मला वाटते आहे, ते चुकीचे आहे का?”

त्या प्रश्नामुळे मी माझे डोळे क्रेग्जकडे वळवले. ते एकमेकांशेजारी जवळजवळ उभे होते, जसे काही ते एकमेकांचे संरक्षण करत होते. ते काही बोलत नव्हते. मिसेस क्रेग घाबरलेली दिसत होती. क्रेगच्या लाल चेहऱ्यावर जांभळी झाक पसरली आणि त्याचे डोळे जणू आग ओकू लागले. पण हे सेकंदभर टिकले.

तो खोल, स्पष्ट आवाजात बोलला, “मला नाही असे वाटत. अर्थात मिस्टर एडवर्ड, मी तुमच्याबद्दल ऐकले आहे.”

तो म्हणाला, “मूर्ख टॉमला जेवढेजण माहिती असतात, त्यापेक्षा खूप जणांना मूर्ख टॉम माहिती असतो.”

मिस ग्रे दारूची बाटली हलवत होती. आता तिने ती तिच्या दोन पाहुण्यांना दिली. तिच्या काही लक्षात आले नाही. या साऱ्याचा अर्थ काय, मला कळत नव्हते. मला तरी त्याचा काही अर्थ समजला नाही. तो काही जाणवला नाही, तो प्रसंग, काही प्रसंग घडला असला तर, फार झटपट घडला. मला असे वाटले, की काही संबंध नसतांना, एका प्रसिद्ध माणसाची पाहुण्यांशी ओळख करून दिल्यामुळे ते क्षणभर लाजल्यासारखे झाले होते.

मी मला आल्हादक बनवण्याचा प्रयत्न करत होतो. मी त्याना विचारले, की त्याना रिव्हिएरा आवडते आहे का आणि ते त्यांच्या नवीन घरात रुळले का. मिस ग्रे पण आली आणि आम्ही पाहुण्यांबरोबर आपण जशा इकडच्या तिकडच्या गप्पा मारतो, तशा मारू लागलो. ते देखील सहजतेने व आनंदाने बोलत होते. मिसेस क्रेग म्हणाली की त्यांनी समुद्रस्नान किती मजेने केले, पण तिथे मासे पकडता येत नसल्याची तक्रार तिने केली. जज्ज संभाषणात भाग घेत नव्हता पण खाली त्याच्या पायाकडे बघत बसला होता, जसे काही त्याला बरोबरीचे लोक जाणवतच नव्हते.

जेवायची वेळ झाली. आम्ही जेवणघरात गेलो. ते लहानसे गोल टेबल होते आणि आम्ही पाचजण होतो. संभाषण सर्वसामान्य स्वरुपाचेच चालले होते. मला हे कबूल करायला हवे की बहुतेक वेळ मिस ग्रे आणि मीच बोलत होतो. जज्ज गप्प होता. पण तो नेहमीच त्याच्या मनाच्या कलाने वागणारा असल्याने, मी त्याकडे फारसे लक्ष दिले नाही. मी पाहिले की त्याने छान भूक असल्यासारखे आम्लेट खाल्ले. नंतर परत ते फिरवले गेले, तेव्हा त्याने परत घेतले. क्रेग मंडळी मला जरा लाजरी वाटली. पण मला त्याचे नवल वाटले नाही. परत वाढणे सुरु झाले, तेव्हा ते जास्त मोकळेपणे बोलू लागले. ते खूप मनोरंजन करणारे लोक असल्याबद्दल मला काही विशेष वाटले नाही. त्यांचे बाळ, दोन इटालियन नोकर व मॉन्टो कार्लो येथील प्रासंगिक चक्कर सोडून, त्याना कशात रुची असल्याचे दिसत नव्हते. मला असे वाटल्यावाचून राहवले नाही, की मिस ग्रे ने त्याना ओळख होण्यासाठी बोलावून चूक केली आहे. मग अचानक काहीतरी झाले. क्रेग एकाएकी खुर्चीवरून उठला आणि डोके

आपटत जमिनीवर पडला. आम्ही उडी मारली. मिसेस क्रेग जमिनीवर त्यांच्या नवऱ्याजवळ बसल्या व त्याचे डोके तिच्या हातात घेतले.

ती रागीट आवाजात बोलली, “जॉर्ज, हे ठीक आहे. ठीक आहे!”

मी म्हणालो, “त्याचे डोके खाली ठेवा. त्याला फक्त चक्कर आली आहे.”

मी त्याची नाडी बघायला गेलो. पण ती लागेना. पण हा हृदयाचा धक्का होता की काय हे मला कळेना. तो साधारण जड व जास्त रक्त असलेला माणूस असल्यामुळे त्याला तसे होण्याचा धोका होता. मिस ग्रे ने रुमाल पाण्यात बुडवून, त्याच्या कपाळावर ठेवला. मिसेस क्रेग फार काळजीत पडलेली व दुःखी दिसली. लँडन खुर्चीत स्वस्थ बसून राहिल्याचे, मी पाहिले.

तो कटूपणे बोलला, “जर त्याला चक्कर आली असेल, तर तुम्ही त्याच्याभोवती गर्दी करून, त्याला बरे होण्यासाठी मदत करत नाही आहात.”

मिसेस क्रेगने मान वळवून त्याच्याकडे कटू द्वेषाने पाहिले.

मिस ग्रे म्हणाली, “मी डॉक्टरना फोन करते.”

मी म्हणालो, “नको. मला वाटते, त्याची काही गरज नाही. तो शुद्धीवर येतो आहे.”

“मला त्याची नाडी जोराने लागते आहे. एक दोन मिनिटात, तो त्याचे डोळे उघडेल. काय झाले, हे समजल्यावर त्याने तोंडाने श्वास घ्यायला सुरवात केली आणि उभे रहाण्यासाठी धडपडू लागला.

मी म्हणालो, “हलू नकोस. अजून काही वेळ पडून रहा मी त्याला पेलाभर ब्रँडी पाजली. त्याचा चेहरा टवटवीत झाला.

तो म्हणाला, “आता मला ठीक वाटते आहे.”

“आपण तुला पुढच्या खोलीत नेऊ. तिथे थोडा वेळ तू सोफ्यावर पडून राहू शकतोस.”

“नको, मी घरीच जातो. ते इथे जवळच तर आहे.”

तो जमिनीवरून उठला.

मिसेस क्रेग बोलली, “हो. आपण घरी जाऊ.” ती मिस ग्रे कडे वळून बोलली, “मला माफ करा. त्याला पूर्वी असे कधी झाले नव्हते.”

त्यांनी जायचे ठरवले. मलाही वाटले की त्यांनी घरी जाणे उत्तम राहील.

मिसेस क्रेगने त्याचा एक दंड धरला. मी एक धरला आणि मिस ग्रे ने दार उघडल्यावर, तो थोडासा थरथरत असला तरी चालू शकला. जेव्हा आम्ही त्यांच्या घरी पोचलो, तेव्हा मी आत जाऊ लागलो व त्याला कपडे काढायला मदत करू लागलो. पण ते दोघेही ऐकेनात. मी परत मिस ग्रे कडे गेलो. ते आईस्क्रीम खात होते.

मिस ग्रे म्हणाली, “मला नवल वाटले, त्याला चक्कर का आली. सगळ्या खिडक्या उघड्या आहेत आणि आज एवढे गरम पण नाही.”

जज्ज बोलला, “मलाही नवल वाटते.”

माझ्या लक्षात आले, की त्याच्या फिकट चेहऱ्यावर स्वतःच्या कर्तृत्वाचे समाधान पसरले होते. आम्ही कॉफी घेतली. जज्ज आणि मी गोल्फ खेळायला चाललो होतो. आम्ही गाडीत बसलो टेकडीजवळ असलेल्या माझ्या घरापर्यंत गेलो.

लँडनने मला विचारले, "मिस ग्रे ला हे लोक कसे काय माहिती? ते मला थोडे खालच्या दर्जाचे वाटले. ते तिच्या सामाजिक स्तरातले वाटले नाहीत."

"तुला ती बाई माहिती आहे. तिला खासगीपणा जपायला आवडतो. जेव्हा ते तिच्या शेजारी रहायला आले, तेव्हा तिने ठरवले होते, की त्यांच्याशी आपले काही देणे घेणे नाही. पण जेव्हा तिला समजले, की ते देखील तिच्याशी फटकून वागू इच्छितात, तेव्हा तिला त्यांच्याशी ओळख करून घेतल्याशिवाय रहावेना."

तिने तिच्या शेजाऱ्यांबद्दल लावलेल्या शोधाची गोष्ट मी त्याला सांगितली. त्याने निर्विकार चेहऱ्याने, ती ऐकून घेतली.

"मी शेवट केल्यावर तो म्हणाला, "माझ्या प्रिय मित्रा, तुझी मैत्रिण, मिस ग्रे ही भावनाशील गाढव आहे. मी तुला सांगतो, बायकांनी लग्न करायला हवे. जर तिला अर्धा डझनभर बिघडलेली मुले असती, तर तिचा सगळा मूर्खपणा निघून गेला असता."

"तुला क्रेगजबद्दल काय माहिती आहे?"

त्याने थंड नजरेने माझ्याकडे बघितले.

“मी? मला त्यांच्याबद्दल का काही माहिती असेल? मला वाटले, ते सर्वसामान्य लोक आहेत.”

अजून काही बोलायची तयारी नसल्यासारख्या शेवटच्या कटू आवाजात, त्याने मला बर्फाळ थंड दृष्टीने पाहिले. आम्ही मुकाट्याने वाट संपवली.

लँडन साठीत होता. गोल्फ खेळतांना तो चेंडू लांब मारणारा नसला, तरी तो चपट्या काठीने चेंडू भोकात घालवण्यात कसबी होता. त्यामुळे त्याने मला सहज हरवले. जेवणानंतर मी त्याला मॉन्टो कार्लो येथे घेऊन गेलो. तिथे संध्याकाळभर टेबलावर रोलेट खेळून त्याने बरेच पैसे जिंकले. ओळीने घडलेल्या या घटनांनी त्याला उल्लेखनीय रीत्या चांगले खेळकर बनवले.

आम्ही रात्रीसाठी वेगळे झालो, तेव्हा तो म्हणाला, “माझा दिवस छान गेला. मी तो मनापासून उपभोगला.”

दुसऱ्या दिवसाची सकाळ मी कामात घालवली. जेवायच्या वेळेपर्यंत आम्ही भेटलो नाही. आम्ही जेवण संपवत आणले तेव्हा मला फोन आला. जेव्हा मी परत आलो, तेव्हा माझा पाहुणा कॉफीचा दुसरा कप पित होता.

मी म्हणालो, “मिस ग्रे चा फोन होता.”

“ओहो, तिला काय सांगायचे होते?”

“क्रेग्ज पळून गेले. काल रात्री ते नाहीसे झाले. नोकराणी गावात रहातात आणि त्या जेव्हा सकाळी आल्या, तेव्हा त्यांना घर रिकामे दिसले. त्यांना काही कळेना --- क्रेग्ज, दाई आणि बाळ --- सामान घेऊन निघून गेले.

त्यांनी टेबलावर नोकराणींचे पगाराचे पैसे व पूर्ण महिन्याचे भाडे ठेवले होते व व्यापाऱ्यांची बिले.”

जज्ज काही बोलला नाही. त्याने खोक्यातून सिगरेट काढली. ती नीट तपासली. नंतर ती सावकाशीने काळजीपूर्वक पेटवली.

मी विचारले, “तुला याबद्दल काय बोलायचे आहे?”

“अरे माझ्या मित्रा, तुला हे अमेरिकन वाक्प्रचार वापरलेच पाहिजेत का? तुला इंग्लिशमध्ये काय ते बोलता येत नाही का?”

“तो अमेरिकन वाक्प्रचार होता का? त्याने मला काय म्हणायचे आहे, ते नेमके सांगता आले. क्रेग्ज आणि तू यापूर्वी भेटला होतात, हे मला न कळण्याइतका तू मला मूर्ख समजू नकोस. आणि जर ते कल्पनेतल्यासारखे, पण खरेच नाहीसे झाले असतील तर हे स्पष्ट आहे, की तुम्ही जेव्हा केव्हा भेटलात ती परिस्थिती फारशी सुखावह नसावी.”

जज्ज गालातल्या गालात हसला. त्याच्या निळया, थंड डोळयात एक चमक आली.

तो म्हणाला, “काल रात्री तुम्ही मला फार चांगली ब्रँडी दिली. जेवणानंतर कडक पेय घेणे, हे माझ्या तत्वांविरुद्ध झाले. पण एखादा कमकुवत मनुष्यच त्याच्या तत्वांना गुलाम बनवू शकतो. आणि एकदा मी उपभोग घ्यायचे ठरवले.”

मी ब्रँडी पाठवली व जज्जने स्वतः भरपूर ओतून घेतलेली पाहिली. समाधानाने तो घुटके घेत होता.

त्याने मला विचारले, “तुला विंगफोर्ड खूनखटला आठवतो का?”

“नाही.”

“कदाचित तू त्यावेळी इंग्लंडमध्ये नसशील. हे दयनीय आहे. तू कोर्टात सुनावणी ऐकायला यायला हवे होतेस. तुला ते आवडले असते. त्यामुळे बरीच खळबळ माजली होती. वर्तमानपत्रे त्याबद्दल पाने भरभरून छापत होती.

मिस विंगफोर्ड एक श्रीमंत, प्रौढ, लग्न न केलेली बाई होती. ती गावाकडे एका सोबतिणीबरोबर रहायची. तिच्या वयासाठी ती चांगली सुदृढ बाई होती. आणि जेव्हा ती अचानक वारली, तेव्हा तिच्या मित्रांना आश्चर्य वाटले. ब्रॅंडन नावाच्या तिच्या डॉक्टराने मृत्यूचा दाखला दिला व तिला रीतीने पुरले गेले. इच्छापत्र वाचले गेले. त्यानुसार असे कळले, की तिचे काय होते, ते साठ ते सत्तर हजार पौंड तिने तिच्या सोबतिणीसाठी ठेवले होते. त्यांचे संबंध तणावाचे होते, पण कोणी त्याबद्दल काही करू शकले नाही. इच्छापत्र तिच्या वकिलाने केले होते व त्यावर साक्षीदार म्हणून तिच्या कारकुनाची व डॉक्टर ब्रॅंडनची सही होती.

पण मिस विंगफोर्डकडे तीस वर्षे काम केलेली एक नोकराणी होती. इच्छापत्रात तिची आठवण ठेवली जाईल, अशी तिला आशा होती. मिस विंगफोर्डने तिला वचन दिले होते, की ती इच्छापत्रात तिच्यासाठी काही रक्कम ठेवेल. आणि त्यात तिचा उल्लेखही नसलेला पाहून, तिला दुःख झाले. दफनविधीसाठी आलेल्या चार भाचरांना तिने हे सांगितले, की नक्की

तिच्या मालकिणीला विष दिले गेले असणार. ते जर पोलिसात जाणार नसतील, ते ती स्वतः जाणार असे ती म्हणाली. पण मग त्यांनी काही तसे केले नाही. पण ते डॉक्टर ब्रँडनला भेटायला गेले. तो हसला व म्हणाला, की मिस विंगफोर्डचे हृदय कमकुवत होते. तो अनेक वर्षे तिच्यावर उपचार करत होता. त्याला जसे वाटत होते, तसाच तिचा झोपेत शांतपणे मृत्यू झाला. त्याने सांगितले नोकराणीच्या म्हणण्याकडे काही लक्ष देऊ नका. ती नेहमीच सोबतिणीचा, मिस स्टारलिंगचा, द्वेष करत असे व तिला तिचा हेवा वाटत असे. डॉक्टर ब्रँडनला त्या भागात बराच मान होता. तो अनेक वर्षे मिस विंगफोर्डचा डॉक्टर होता. तिच्याबरोबर बरेच वेळा रहाणाऱ्या दोन भाच्यांनाही तो चांगला माहिती होता. त्या इच्छापत्राप्रमाणे त्याचा काही फायदा होणार नव्हता. त्यामुळे त्याच्या शब्दांवर विश्वास ठेवायला काही हरकत नव्हती. त्यामुळे चारही भाचरे करण्यासारखे काही नसल्याचे उमजून लंडनला निघून गेली.

पण त्या नोकराणीने इतकी बडबड केली, की शेवटी पोलिसांना, मला कबूल केले पाहिजे, की त्यांच्या इच्छेविरुद्ध, प्रेत खणून बाहेर काढायचा फतवा काढावा लागला. कायदेशीर तपासणी झाली तेव्हा असे आढळले की तिला झोपेच्या गोळीमधून सावकाश मरणाकडे नेणारे व्हेरोनल औषध जास्त प्रमाणात दिले गेले होते. हे मिस स्टारलिंगने केले असल्याचे कोर्टात निष्पन्न झाले. तिला अटक झाली. स्कॉटलंड यार्डकडून गुप्तहेर पाठवला गेला आणि त्याला काही अनपेक्षित पुरावा मिळाला. असे दिसले की मिस स्टारलिंग आणि डॉक्टर ब्रँडन या दोघांबद्दल खूपच वावड्या उठायला लागल्या. ते दोघे

काही कारणाशिवाय लोकांना जागोजागी एकत्र दिसू लागले. अश अफवा उठली की ते लग्नासाठी, मिस विंगफोर्ड मरायची वाट बघत थांबले होते. त्यामुळे या केसला नवे वळण मिळाले. थोडक्यात, पोलिसांना पुरेसा पुरावा मिळाला व त्यावरून त्यांनी मिस स्टारलिंग आणि डॉक्टर ब्रँडन याना मिस विंगफोर्डच्या खुनाच्या आरोपाखाली अटक केली.”

जज्जने ब्रँडीचा अजून एक घुटका घेतला.

ही केस कोर्टात माझ्यापुढे आली. दोन्ही आरोपी वेड्यासारखे एकमेकांच्या प्रेमात होते. म्हातारीला मारल्यावर, मिस स्टारलिंगने केलेल्या लबाडीने तिच्या फळफळलेल्या नशीबाच्या जोरावर लग्न करायचे, असे तिचे ठरले होते. मिस विंगफोर्डला झोपतांना नेहमी मिस स्टारलिंगने बनवलेला कपभर कोको दिला जात असे. त्यात विषाच्या गोळया विरघळवून, दिल्याने मिस विंगफोर्डचे मरण ओढवले, असे कोर्टात सिद्ध झाले.

आरोपींनी स्वतःचा बचाव स्वतःच करायचे ठरवले. आरोपीच्या पिंजऱ्यात उभे राहून त्यांनी खूप आरडाओरडा केला. परंतु त्याना रात्री कंबरेभोवती हात घालून फिरताना बघितल्याचे समोर आले व डॉक्टरच्या दवाखान्यातील नोकराणीने डॉक्टरच्या घरी त्यांना एकमेकांचे चुंबन घेताना पाहिल्याचे सांगितले. तरीही ते फक्त मित्र असल्याचा दावा करत होते. दुर्दैवाने वैद्यकीय पुराव्यावरून असे सिद्ध झाले की मिस स्टारलिंग कुमारिका होती.

डॉक्टर ब्रँडनने कबूल केले, की त्याने मिस विंगफोर्डला व्हेरोनल हे औषध दिले होते, कारण तिने निद्रानाशाची तक्रार केली होती. पण ते किती

प्रमाणात व अगदी नाईलाज असेल तरच घ्यायचे अशा स्पष्ट सूचनाही दिल्या होत्या. बचाव करतांना तो म्हणाला, की तिला आत्महत्या करायची असल्याने तरी किंवा चुकून, तिने ते औषध जास्त घेतले असणार. त्यामुळे तिची तब्येत बिघडली असणार. मिस विंगफोर्ड आनंदी व आयुष्य मजेत घालवणारी सर्वसामान्य म्हातारी होती. आठवड्याने तिला भेटायला येणाऱ्या जुन्या मैत्रिणीच्या दोन दिवसांनतरच्या भेटीच्या आधीच ती गेली. तिने कुणाकडे झोप लागत नसल्याची तक्रार केली नव्हती. उलट तिला नेहमी चांगली झोप लागत असल्याचे नोकराणीला माहिती होते. तिने चुकून किंवा आत्महत्या करण्यासाठी जास्त औषध घेतले असावे, यावर विश्वास ठेवणे अवघड होते. हे डॉक्टर आणि सोबतिणीचेच कृत्य होते. हेतू अगदी उघड आणि पुरेसा होता. मी सगळ्याची उत्तम प्रकारे गोळा बेरीज करून, ज्युरीपुढे ठेवली. ते माझे कामच होते. मी देवाकडे आरोपींना जास्तीत जास्त शिक्षा देण्याची आळवणी करत होतो. तुम्हाला हे माहिती असेल असे मला वाटत नाही, की जज्ज म्हणून कर्तव्य निभावतांना, तुम्हाला कोर्टाचा कौल काय आहे तो कळतो. पण त्याचा तुमच्यावर परिणाम होऊन द्यायचा नसतो. त्या दिवशी कोर्टात असा एकही माणूस नव्हता, की ज्याला ते दोघे दोषी नाहीत असे वाटत होते. मी माझ्यावर संशयाची छाया पडू दिली नाही, की ज्युरी त्याना दोषी ठरवणार आहेत. ज्युरी काय निर्णय घेणार ते कळत नव्हते. ते तीन तास चर्चा करत होते. आणि जेव्हा ते परत आले, तेव्हा मला लगेच समजले, की माझा गैरसमज झाला होता. खुनाच्या केसमध्ये, जेव्हा ज्युरी आरोपींना दोषी ठरवणार असतात, तेव्हा ते त्यांच्याकडे बघत नाहीत. ते लांबवर

बघतात. मला असे दिसले, की तीन चार ज्युरी दोन कैद्यांकडे बघत आहेत. त्यांनी ते दोषी नसल्याचा निर्णय दिला. मिस्टर आणि मिसेस क्रेगची खरी नावे, डॉक्टर ब्रँडन व मिसेस ब्रँडन होती. मी इथे बसून सांगू शकतो, की त्यांनी तो क्रूर खून केला होता. आणि त्याना फाशीची शिक्षाच व्हायला हवी होती."

"ज्युरींना असे का वाटले असेल की ते दोषी नाहीत?"

"मी स्वतःला हा प्रश्न विचारला. आणि मला काय स्पष्टीकरण मिळाले असेल, असे तुला वाटते? ही गोष्ट सिद्ध केली गेली, की ते कधीच प्रेमिक नव्हते. तुम्ही यावर विचार केलात, तर, ही या केसमधील सर्वात चौकस गोष्ट होती. प्रेमिक मिळण्यासाठी ती बाई खून करायला तयार होती. पण कायद्याविरुद्ध असलेले प्रेमप्रकरण कबूल करायला तयार नव्हती."

माणसाचा स्वभाव फार विचित्रपणे अतर्क्य असतो, नाही का?"

लँडनने ब्रँडीचा अजून एक पेला भरत म्हटले, "अगदी खरे आहे."

# Appearance and reality
# दृष्यमानता आणि खरेपणा



ही गोष्ट खरी असेल, असे मी ठामपणे सांगू शकत नाही. पण मला ती एका फ्रेंच साहित्याच्या प्राध्यापकाने इंग्लिश विद्यापीठात सांगितली. तो फार चारित्र्यवान माणूस होता. त्यामुळे मला वाटते, त्याने ती सांगितली, त्याअर्थी ती खरीच असणार. त्याच्या मते, फ्रेंच व्यक्तिरेखा मुख्यत्वे फुललेल्या ज्यांच्यामध्ये दिसतात, अशा तीन फ्रेंच लेखकांकडे विद्यार्थ्यांचे मन वळवणे, हे काम तो करत असे. तो म्हणे, ते लेखक वाचल्याने, तुम्ही फ्रेंच लोकांबद्दल एवढे शिकता, की त्याच्या हातात सत्ता असती, तर त्याने अशा राजे लोकांवर विश्वास न ठेवता, त्यांच्या कामासंबंधी अगदी कठीण अशी परीक्षा

दिल्याशिवाय त्यांची विद्यापीठात नेमणूक केली नसती. त्यातील एक लेखक रॅबेलीयन होता. रक्ताळलेल्या फावड्यापेक्षा जास्त करमणूक करेल, अशी उद्धट व असंबद्ध वागणूक देणारी कुदळ म्हणजे ‘गॉलोसेरी’ हे रॅबेलीयनचे पुस्तक होय. सर्वसामान्य ज्ञान म्हणजे फक्त घोड्याची बुद्धी असलेला ला फोन्टेन आणि शेवटचा म्हणजे ले पांचे लिहिणारा कॉर्नेल. हे शब्दकोशात पांचे याचा अर्थ पक्ष्याचे मोठे, दिखाऊ पीस असा दिला आहे. म्हणजे शिरस्त्राणावर घातलेले उमरावाचे मानांकित चिन्ह. म्हणजे रूपक दृष्ट्या, धीटपणा, प्रतिष्ठा, नायकगिरी, नसता डौल वा अभिमान बाळगणारा. फॉन्टेनॉयच्या सभ्य फ्रेंच माणसांनी राजा दुसरा जॉर्ज याच्या ऑफिसर्सना पहील्यांदा ‘बंदुक चालवा.’ असे म्हणायला शिकवले, ते हे ले पांचे. ज्याने कॅंम्ब्रेनच्या नाजूक ओठांना वॉटरलूचा शब्दप्रयोग शिकवलाः ‘सुरक्षारक्षक मरतो, पण शरण जात नाही.’ तेच ते ले पांचे, ज्याने नोबेल बक्षीस मिळवलेल्या फ्रेंच गरीब कवीला सुरेख हावभावांनी उदारपणे ते परत करायची विनंती केली, तेच ते ले पांचे, माझा प्राध्यापक गंभीर नव्हता आणि त्याने सांगितलेल्या गोष्टीत त्याने तीन महत्वाचे, शैक्षणिक फ्रेंच गुण ठासून सांगितले.

मी त्याचे नाव दृष्यमानता आणि खरेपणा, असे ठेवले आहे. माझ्या देशाने एकोणीसाव्या शतकात केलेले सर्वात महत्वाचे तत्वज्ञानविषयक काम [खरे की खोटे] म्हणून याकडे बघता येईल. हे चौकटीतील पण उत्तेजित करणारे आहे. हे उत्तम इंग्लिशमध्ये बऱ्यापैकी विनोदी अंगाने लिहिले गेले असले, तरी त्याने तत्वज्ञानविषयक खोल दरीतून आत्मिक दोरीच्या सहाय्याने

फिरतांना उद्दीपित अवस्थेतील आनंद मिळू शकतो. तो पुस्तकाचा शेवट समाधानाने करतो, की काहीही लोंबत असले तरी आपल्याला विशेष फरक पडत नाही. इतक्या प्रसिद्ध पुस्तकाचे नाव, माझ्या गोष्टीला वापरणे, हे स्तुतीपूर्वक रीत्या माफ केले जाईल, कारण ते गोष्टीचे विचारपूर्वक मंथन करते. तसे पाहिले तर आपण सगळेच थोडेफार तरी तत्वज्ञ असतोच. सत्याविषयी तिच्या भावना एवढ्या बळकट होत्या आणि दृष्यायमानतेविषयीची संवेदना इतकी मनापासूनची होती, की ती सहज असा दावा करू शकली असती, की तत्वज्ञ अनेक शतके त्यातील संबंध शोधून काढायच्या फोल प्रयत्नात गुंतलेले असतांना, तिने तो आधीच शोधून काढला होता. लिसेट फ्रेंच होती. ती कामाच्या दिवसाचे कैक तास पॅरीसमधील फॅशनेबल जागी कपडे घालण्यात व काढण्यात घालवी. आपला बांधा कमनीय असल्याची चांगली जाणीव असणाऱ्या एका तरुण स्त्रीसाठी हा सुखद व्यवसाय होता. थोडक्यात ती कपडे चढवले जाणारा पुतळा होती. तिचा मागील भाग इतका अरुंद होता, की खेळाचे कपडे घालू शके व ती इतकी उंच होती, की मोठ्या डौलाने पाठीवर कपड्याचा काही भाग फडकता ठेऊ शके. त्यामुळे ती तुमच्या नाकासाठी हिथरच्या फुलांच्या वासाचा आभास निर्माण करू शके. तिचे पाय लांब असल्यामुळे, ती आरामात पायजमा घालू शके. तिची नाजूक कंबर व छोटेसे वक्ष यावर तिने चढवलेला साधा पोहायचा पोशाख कोणाच्याही इच्छेविरुद्ध त्याना तिच्याकडे वळून बघायला लावे. ती कुठलाही कपडा घालू शके. ती फरचा कोट घाले, तेव्हा तिला बघायला गर्दी जमून, कोट बनवायचे पैसे सार्थकी लागले, असे सर्वात शहाण्या लोकांना वाटे. जाड्या, अती जाड्या,

बुटक्या, हडकुळ्या, रेखीव बांधा नसलेल्या, म्हाताऱ्या, सरळसोट बायका हातवाल्या मोठ्या खुर्च्यांमध्ये बसत आणि लिसेट तिला शोभणारे कपडे घातल्याने, फार गोड दिसे. तिचे डोळे मोठे व तपकिरी होते. तोंड मोठे व लाल होते. आणि तुकतुकीत पण उन्हाने थोडीशी तपकिरी झालेली त्वचा होती. ती वरवर तरी गर्विष्ठपणे वरचढ, स्वभावाने वाईट आणि थंडपणे काही लागते नसलेली, अशी दिसणारी होती. हे पुतळ्यासाठी महत्वाचे होते. ती डौलाने चालू लागली, हळूच गोल वळली. सगळे जग तिला क्षुद्र वाटत होते. हे वाळवंटात फिरणाऱ्या उंटासारखे होते. लिसेटच्या मोठ्या तपकिरी डोळ्यात, संशयाची ठिणगी दिसत होती. तिच्या लाल ओठांमधून जराशा रागानंतर हसू फुटणार, असे ते थरथरत होते. मिस्टर रेमंड ले सुईर त्या चमकदारपणाकडे आकर्षित झाला.

तो त्याच्या बायकोशेजारील, बोगस सोळाव्या लुईच्या खुर्चीवर बसला होता. त्याच्या बायकोने त्याला वसंत ऋतूतील फॅशनचा खासगी सोहळा बघायला येण्यासाठी आग्रह केला होता. हा मिस्टर रेमंड ले सुईरच्या मैत्रीपूर्ण वर्तनाचा परिणाम होता. कारण तो फार कामात गर्क असलेला माणूस आहे, असे एखाद्याला वाटले असते. तासभर नुसते बसून निरनिराळ्या प्रकारच्या घाबरवणाऱ्या कपड्यांमधील डझनभर तरूण, सुंदर स्त्रियांची कवायत बघत रहाण्यापेक्षा, त्याला करण्यासारख्या अनेक महत्वाच्या गोष्टी होत्या. त्यांच्यापैकी कुणीही त्याच्या बायकोला ती आहे, त्यापेक्षा वेगळे काही करून बदलू शकेल, असे त्याला वाटत नव्हते. ती पन्नाशीची, उंच, हडकुळी बाई होती. तिचे अवयव फारच मोठे होते. त्याने तिच्याबरोबर तिच्या

दिसण्यासाठी लग्न केले नाही आणि त्यांच्या पहिल्यावहिल्या मधुचंद्राच्या अधीर दिवसातदेखील तिने ते तसे असल्याची कल्पना केली नव्हती. त्याच्या स्वतःच्या जोरात चालणाऱ्या वाहनांच्या कारखान्याच्या बरोबरीने, स्टीलच्या कारखान्याची ती भावी मालकीण असल्याने, त्याने तिच्याशी लग्न केले होते. ते लग्न यशस्वी ठरले होते. तिने त्याला जवळजवळ व्यवसायिक खेळाडूंइतक्याच कुशलतेने टेनिस खेळणारा, गिगोलोइतक्या कुशलतेने नृत्य करणारा व ब्रिजमधील माहीर लोकांबरोबरसुद्धा खेळात स्वतःचा ठसा उमवणारा मुलगा दिला होता आणि जवळजवळ राजपुत्र असलेल्या मुलाशी जिचे लग्न करून देता येईल, अशी सुंदर मुलगी दिली होती. त्याच्या मुलांचा त्याला अभिमान होता. त्याच्या चिकाटीने व पुरेशा नैतिक अधिष्ठानाने साखर कारखान्यात, सिनेमा कंपनीत, मोटारींच्या कारखान्यात व वर्तमानपत्रात त्याने उत्तम प्रकारे रस घेऊन, बस्तान बसवले होते. शेवटी त्याने एका जिल्ह्यामध्ये पुरेसा पैसा खर्च करून, लोकसभेमध्ये तो निवडून जाऊ शकेल, अशी परिस्थिती निर्माण केली होती. तिथे तो त्याच्या हजेरीने रुबाब वाढवत असे. त्याचा सुखकारक जाडेपणा, कठीण काळातही दिसणारी त्याची सकारात्मक त्वचा, नीट राखलेली करडी चौकोनी दाढी, टक्कल पडलेले डोके, मानेवर मागील बाजूस असलेल्या वळया, असा तो एकंदरीत दिसे. या सर्वांचा परिणाम असलेली व्यक्ती तो आहे, हे समजण्यासाठी त्याच्या काळया कोटाच्या लाल बटनाकडे बघण्याची गरज नव्हती. तो पटापट निर्णय घेणारा माणूस होता. जेव्हा त्याची बायको फॅशनचा खासगी सोहळा आटपून, ब्रिज खेळायला निघाली, तेव्हा त्याने व्यायाम म्हणून लोकसभेपर्यंत चालत जायचे

ठरवले. तिथे त्याचे देशासंबंधीचे कर्तव्य त्याला खुणावत होते. फक्त एवढ्यानेच त्याला समाधान नव्हते, तर जिथे शिंप्याचे दुकान बंद होत आल्याने तरुण स्त्रिया बाहेर पडणार, हे ठरलेले होते, तिथे मागील रस्त्यावर त्याने वरखाली व्यायाम करण्यासाठी जायचे ठरवले. काही तरुण व सुंदर, काही सुंदर नसलेल्या म्हाताऱ्या, अशा स्त्रिया गटागटाने बाहेर पडू लागल्यावर, तो ज्याची वाट बघत होता, ती वेळ आल्याचे त्याला समजले. दोन तीन मिनिटात, लिसेट तिच्या मैत्रिणीबरोबर बाहेर पडली. एखाद्या कमी महत्वाच्या माणसाला तिने कदाचित लाजवले असते, पण त्यामुळे आपला मिस्टर रेमंड ले सुईर जराही कचरला नाही. तो तिच्याकडे गेला व टक्कल दिसणार नाही इतपतच, पण अदबीने त्याची टोपी झुकवून, तिला अभिवादन केले.

तिची पसंती मिळवण्यासाठी हसत, तो बोलला, "बाईसाहेब, शुभ संध्याकाळ."

तिने त्याच्याकडे एक ओझरता कटाक्ष टाकला. तिचे लाल ओठ हसतांना थोडे थरथरुन कडक झाले. तिने डोके दुसरीकडे वळवले आणि मैत्रिणीबरोबर बोलत, दुर्लक्ष करून चालू पडली. हे त्याला न पटल्याने, तो वळून त्या दोन मुलींच्या मागे काही यार्ड जाऊ लागला. त्या मागील रस्त्याने थोड्याशा गेल्या. मग एका रस्त्याला वळल्या आणि डे ला मॅडेलेन या जागी त्यांनी बस घेतली. मिस्टर रेमंड ले सुईरचे समाधान झाले. त्याने खूपसे योग्य असे निष्कर्ष काढले. ती मैत्रिणीबरोबर घरी चालली होती, ही गोष्ट नक्की असे

सिद्ध करत होती, की तिने तिच्या स्तुतीपाठकाला मान्यता दिली नव्हती. जेव्हा त्याने तिला अभिवादन केले, तेव्हा ती निघून गेली होती. यावरून असे दिसत होते, की ती काहीही लाजीरवाणा प्रकार घडू नये, म्हणून काळजी घेत होती. ती नम्र व वागायला चांगली होती. सुंदर तरुण बायकांनी तसे असलेले त्याला आवडे. तिचा स्कर्ट व कोट, काळी टोपी आणि रेयॉनचे मोजे असे सुचवत होते, की ती गरीब होती आणि त्यामुळे गुणी होती. त्याने तिला पाहिलेल्या छान कपड्यात, ती जेवढी सुंदर दिसे, तेवढीच अशा कपड्यातही दिसे. खूप वर्षे त्याच्या मनात एक मजेशीर छोटासा भाव होता. त्यात विशेष अशी भावना नव्हती. ती आनंदी पण तरीही विचित्रपणे दुःखदायक होती. पण त्याला ती लगेच जाणवली.

तो पुटपुटला, “हे प्रेम आहे. हे स्तुती करणारे, आधार देणारे, आनंद पसरवणारे प्रेम आहे.”

त्याला ते पुन्हा अनुभवायची अपेक्षा नव्हती. तो आत्मविश्वासाने, ताठ खांद्याने चालू लागला. तो खासगी गुप्तहेराच्या कार्यालयात गेला आणि तिथे अशा सूचना दिल्या, की अशा अशा पत्त्यावर कपड्यांसाठीच्या पुतळ्याचे काम करणाऱ्या लिसेट नावाच्या तरूणीची चौकशी करावी. मग तो अमेरिकन कर्जे यावर चर्चा करत टॅक्सी घेऊन, भपकेबाज इमारतीत गेला व वाचनालयात शिरून, त्याच्या आवडत्या आरामखुर्चीत बसून आनंदाने एक डुलकी काढली.

त्याने मागवलेली माहिती, त्याला तीन दिवसांनी मिळाली. त्याची

किंमत स्वस्त होती. लिसेट लॅरीओन बाईसाहेब पॅरीसमध्ये बॅटींग्नोलेज नावाच्या भागात, एका दोन खोल्यांच्या सदनिकेत, तिच्या विधवा आत्याबरोबर रहात होती. मोठ्या लढाईत तिचे वडील जखमी झालेले नायक होते. फ्रान्सच्या नैऋत्येला असणाऱ्या लहानशा गावात त्यांचे सिगरेटी विकायचे दुकान होते. सदनिकेचे भाडे दोन हजार फ्रान्स होते. तिचे आयुष्य आखीव होते. पण तिला सिनेमे बघायला आवडत. तिला प्रियकर म्हणजे काय, ते माहिती नव्हते. ती एकोणीस वर्षांची होती. ती दुकानातील तिच्या मित्रांची आवडती होती आणि इमारतीतील इतर सदनिकाधारक तिच्याशी चांगले बोलत असत. अर्थातच ती मान देण्यासारखी तरुण स्त्री होती. मिस्टर रेमंडला असा विचार करण्याशिवाय गत्यंतर नव्हते, की त्याच्या उदास काळातील रिकाम्या वेळासाठी ती खूपच योग्य होती. राज्याची काळजी घेतांना व मोठ्या जबाबदारीच्या गोष्टींचे ओझे वाहतांना त्याला थोडा आराम व करमणूक हवी होती.

त्याच्या डोक्यात जो शेवट होता, तो मिळवण्यासाठी, त्याने कुठल्या कुठल्या पायऱ्या घेतल्या, हे सांगत बसणे हे आवश्यक नाही. असल्या कामात व्यक्तिशः लक्ष घालण्यासाठी, तो फारच महत्वाचा व व्यग्र माणूस होता. अशा प्रकारच्या देशाच्या संसदेसाठी मतदान करणाऱ्या माणसाकडे एक हुशार गुप्त सचिव होता. तो सरळ लिसेटच्या गरीब व विधवा असणाऱ्या आत्याकडे, सलॅडीन बाईसाहेबांकडे, गेला आणि तिला सांगितले, की नेहमी वेळ कमी पडणाऱ्या मिस्टर रेमंड ले सुईर यांनी अलीकडे सिनेमांमध्ये रुची घ्यायला सुरवात केली आहे आणि तो तयार करण्याचे काम ते सुरु करायच्या विचारात

आहेत. [ सर्वसामान्य माणसाचा कसा उपयोग करून घ्यायचा, हे डोक्याने हुशार माणसे कसे जमवतात, हे बघा. ] शिंप्याचे दुकान असलेल्या रस्त्यावर मिस्टर रेमंड ले सुईर यांनी लिसेटला पाहिले होते व तिच्या दर्शनाने, ते प्रभावित झाले होते. ती ज्या नखऱ्याने व बुद्धी वापरून कपडे घाले, त्यावरून तिला सिनेमात एखादी भूमिका देणे योग्य ठरेल, असे त्यांना वाटले. [सर्व बुद्धीमान लोकांप्रमाणे, लोकसभा सदस्य नेहमी त्याना शक्य तेवढे सत्याजवळ पोचतात.] गुप्त सचिवाने मग सलॅडीन बाईसाहेबांना व त्यांच्या भाचीला, ओळख होण्यासाठी व मिस्टर रेमंड ले सुईर यांना लिसेटच्या सिनेमाविषयक दृष्टीकोनाबद्दल अंदाज बांधता यावा म्हणून, जेवायला बोलावले. सलॅडीन बाईसाहेब तयार होत्या पण त्या म्हणाल्या, की त्या त्यांच्या भाचीला विचारतील.

जेव्हा सलॅडीन बाईसाहेबांनी लिसेटसमोर प्रस्ताव ठेवला व मिस्टर रेमंड ले सुईर यांचे महत्व, उच्च पद व अदबशीरपणा याचे वर्णन करून, ते किती उदार यजमान आहेत ते तिला सांगितले, तेव्हा त्या तरुण स्त्रीने ते फारशा लायकीचे नसल्यासारखे, तिचे सुंदर खांदे उडवले. ती म्हणाली, “तो म्हातारडा!”

सलॅडीन बाईसाहेब बोलल्या, “तो जरी म्हातारडा असला, तरी तो तुला सिनेमात काम करायला देणार असेल, तर आपले काय जाते?”

लिसेट म्हणाली, “तुझे खरे आहे. हे तसे काही त्रासदायक वाटत नाही. पण निरर्थक आहे. थोडे असभ्य आहे.” चांगल्या वळणाच्या तरुण

स्त्रिया धक्का देण्यासाठी असे शब्द वापरतात. हे मारून मुटकून अविश्वास दाखवणे असते. ती त्याला सरळसरळ लैंगिक दृष्ट्या असभ्य म्हणाली.

सलॅडीन बाईसाहेबांनी म्हटले, "तरीही आपण मोठे महागाईचे जेवण जेऊ शकतो. आता तू काही लहान मुलगी नाहीस."

"त्याने जेवायला कुठे बोलावले आहे?"

"चॅटाऊ डे मद्रीदमध्ये. सगळे जाणतात, की ते जगातील सर्वात महागडे हॉटेल आहे."

ते तसे का नसेल? तिथे जेवण खूप छान असते. त्याचे तळघर प्रसिद्ध आहे. उन्हाळ्याची चाहूल लागत असतांना, तिथे जेवण्यासाठी, ती जादूई संध्याकाळ ठरेल. लिसेटच्या गालावर खूप सुंदर खळी दिसू लागली आणि लाल मोठ्या चेहऱ्यावर स्मितहास्य फुलले. तिचे दात अगदी पाहिजे तसे होते.

ती पुटपुटली, "मी दुकानातून नवीन ड्रेस उसना आणेन."

काही दिवसांनी मिस्टर रेमंड ले सुईर यांच्या सचिवाने, सलॅडीन बाईसाहेबांना व त्यांच्या भाचीला टॅक्सीने बॉइस डे बुलोगनला आणले. लिसेट एका यशस्वी मॉडेलच्या ड्रेसमध्ये भलतीच आनंदी दिसत होती आणि सलॅडीन बाईसाहेब काळ्या सॅटीनमध्ये व लिसेटने या प्रसंगासाठी खास बनवलेल्या टोपीत फारच मान देण्यासारख्या दिसत होत्या. सचिवाने त्या दोघींची ओळख मिस्टर रेमंड ले सुईर यांच्याशी करून दिली. त्याने दोघीना हळूवारपणे, राजकीय पुढाऱ्याच्या डौलाने अभिवादन केले. लोकांची परिस्थिती ओळखून त्यातून स्वतःचा फायदा करून घेण्याच्या त्याच्या

पद्धतीमुळे, आसपासच्या टेबलांवरील लोकांनी त्याचे पाहुणे कसे असतील, हे ओळखले. अगदी समजुतीने जेवण झाले आणि महिन्याभराने लिसेट एका लहानशा छान सदनिकेत रहायला गेली. ती तिच्या कामाच्या जागेपासून व मिस्टर रेमंड ले सुईर यांच्या घरापासून सोयीस्कर अंतरावर होती. ती नवीन सदनिका एका वाकबगार माणसाकडून, आधुनिक सुखसोयींनी सुसज्ज केली गेली. मिस्टर रेमंड ले सुईर यांची इच्छा होती, की आता लिसेटने त्यांचे काम [ ? ] सुरु करावे. तो कामात मग्न असेल तेव्हा टिवल्या बावल्या करण्यात वेळ न घालवता, तिनेही काम करावे. त्याला माहिती होते, की बायकांना करायला काही उद्योग नसेल, तर त्या उगीचच पैसे खर्च करत सुटतात. डोके वापरणाऱ्या माणसाला या गोष्टी चांगल्या कळतात.

आयती मिळालेली संधी लिसेटसाठी विचित्रपणे एक दुर्गुण ठरली. मिस्टर रेमंड ले सुईर यांची ती आवडती होती व तो उदार होता. पण लवकरच लिसेट बचत करायला शिकली, याचे त्याला समाधान वाटले. ती तिची सदनिका काटकसरीने चालवायला शिकली. तिचे कपडे रास्त बाजारभावाने विकत आणू लागली आणि प्रत्येक महिन्याला ठराविक रक्कम घरी वडिलांना पाठवू लागली. त्या पैशांनी त्यांनी लहान लहान जमिनीचे तुकडे खरेदी केले. ती शांतपणे आधुनिक जीवन जगत होती. मिस्टर रेमंड ले सुईर खूष होता. सदनिकेची देखभाल करणाऱ्या बाईच्या मुलाला सरकारी नोकरी हवी होती. लिसेटकडे येणारे लोक म्हणजे तिची आत्या आणि दुकानातील एक दोन मैत्रिणी.

मिस्टर रेमंड ले सुईर आयुष्यात एवढा सुखी कधीच नव्हता. या जगात आपण काही चांगले कृत्य केले, तर त्याचे बक्षीस मिळतेच. जेव्हा राज्यसभेत अमेरिकन कर्जाची चर्चा चालली होती, तेव्हा फक्त दयेपोटीच तर त्याने वसंत ऋतूतील त्या दुपारी, फॅशनचा खासगी सोहळा पहाण्या साठी बायकोला साथ दिली नव्हती का? तेव्हाच त्याने प्रथम सुंदर लिसेटला पाहिले नाही का? त्याला ती जितकी जास्त माहिती झाली, तेवढी ती त्याला अधिकाधिक आवडू लागली. ती आनंदी व आधुनिक मैत्रीण होती. ती चांगली बुद्धिमान होती. तो जेव्हा राज्याच्या कामाविषयीच्या प्रश्नांची चर्चा करे, तेव्हा ती हुशारीने ती चर्चा ऐकून घेई. जेव्हा तो खूप दमलेला असे, तेव्हा ती त्याला विश्रांती मिळून त्याची मनस्थिती सुधारेल, असे बघे. तो सतत येई व ती त्याचे चांगले स्वागत करे. सहसा पाच ते सात. कधी कधी तो बाहेरगावी जाई. ती त्याला असे भासवी, की तो फक्त तिचा प्रियकर नाही, तर मित्र आहे. कधीकधी ते तिच्या सदनिकेत, एकत्र जेवण घेत. असे. आनंदी वातावरणात आरामशीरपणे ते मागवलेले खास जेवण असे. त्याला घरगुती वातावरणाचे सुख मिळे. त्याचे मित्र त्याला सांगत, की तो वीस वर्षांनी तरुण दिसू लागला आहे. त्यालाही ते जाणवे. त्याला त्याच्या चांगल्या भविष्याची चाहूल लागली होती. आयुष्यभर सरकारी नोकरीत, प्रामाणिकपणे कष्ट केल्यावर, त्याला हे सुख मिळायलाच हवे, असे त्याला वाटे. दोन वर्षे असे सुखात सर्व चालू असतांना, पॅरीसमध्ये परत आल्यावर, तो लोकसभेला हजेरी लावून, एका रविवारी सकाळी त्या सदनिकेत त्याच्या किल्लीने दार उघडून आत शिरल्यावर, आज विश्रांतीचा दिवस असल्याने रेमंड ले सुईर असा विचार

करत होता, की तिला घेऊन अंथरुणावर पडावे. तेव्हा अचानक त्याला ती त्याने आधी कधीही न बघितलेल्या एका तरूण, सभ्य माणसाबरोबर खासगी गोष्टी करत, न्याहारी घेत असलेली दिसली. त्या तरुणाने मिस्टर रेमंड ले सुईर यांचा नवा कोरा पायजमा घातला होता. त्याला बघितल्यावर लिसेटला आश्चर्य वाटले. तिला खरेच धक्का बसला.

ती बोलली, “अरेच्या, तू कुठून एकदम अवतीर्ण झालास? उद्यापर्यंत तू येण्याची मी अपेक्षा करत नव्हते.”

त्याने यांत्रिकपणे उत्तर दिले, “मंत्रीमंडळाची बैठक संपली. मग मी निघालो. आता माझी नेमणूक अंतर्गत मंत्रीमंडळात झाली आहे.”

पण खरे तर त्याला हे बोलायचे नव्हते. त्याचा पायजमा घातलेल्या माणसाकडे त्याने रागाने पाहिले. तो ओरडला, “हा कोण आहे?”

लिसेटचे मोठे लाल तोंड गूढ पण आकर्षक अशा हास्यात बुडाले.

ती उत्तरली, “माझा प्रियकर.”

मिस्टर रेमंड ले सुईर ओरडला, “तू मला मूर्ख समजतेस का? तो तुझा प्रियकर असल्याचे मला समजले आहे.”

“मग तू मला का विचारलेस?”

मिस्टर रेमंड ले सुईर कृतीप्रवण मनुष्य होता. तो सरळ लिसेटकडे गेला आणि त्याच्या उजव्या हाताने, आधी तिच्या डाव्या गालावर व नंतर डाव्या हाताने उजव्या गालावर जोरात एक चपराक लगावली.

लिसेट ओरडली, "दुष्टा!"

तो हे आक्रमक दृष्य लाज वाटून बघणाऱ्या त्या तरुणाकडे वळून त्याच्यावर धाऊन जात, त्याला हाताला धरून ढकलत व दाराकडे बोट दाखवत ओरडला, "चालता हो. इथून चालता हो."

नाराज भागधारकांच्या वार्षिक सभेत भुवई उंचावून, त्यांचावर सहज हुकमत गाजवणारा व रागवलेल्या करदात्यांना उडवून लावायची सवय असलेला, असा हा उच्चपदस्थ अधिकारी आहे, असे कुणालाही वाटले असते. आणि त्या तरुणाने बहुधा दाराला कडी लावली होती. खरे तर काय करावे, हे न कळून तो तिथे उभा राहिला. तिथे उभे राहून त्याने लिसेटकडे मनापासून गंभीरपणे बघितले आणि त्याचे खांदे जरासे शहारवले.

मिस्टर रेमंड ले सुईर ओरडला, "तू कशाकरता थांबला आहेस? तू मला जोर वापरायला लावणार आहेस का?"

लिसेट बोलली, "तो पायजमा घालून बाहेर जाऊ शकत नाही."

"तो त्याचा पायजमा नाही. तो माझा आहे."

"तो त्याच्या कपड्यांसाठी थांबला आहे."

मिस्टर रेमंड ले सुईरने आजूबाजूला पाहिले. मागील एका खुर्चीवर काही पुरुषी कपडे विस्कटलेल्या अवस्थेत पडले होते. त्याने त्या तरुणाकडे रागारागाने पाहिले.

तो दुःखाने थंड सुरात म्हणाला, "तू तुझे कपडे घेऊ शकतोस."

त्या तरुणाने ते काखेत धरले, जमिनीवर पडलेले बूट घेतले आणि झटपट खोली सोडली. मिस्टर रेमंड ले सुईरने भरपूर शिव्यांचा खजिना वाहिला. शिव्यांचा असा उपयोग त्याने कधी केला नव्हता. त्याने लिसेटला त्याला तिच्याविषयी काय वाटते, ते सांगितले. ते स्तुतीपर नव्हते. त्याने तिचा ऋणाइतपणा डावलणारा स्वभाव काळयाकुट्ट रंगाने रंगवून दाखवला. तिला अनेक टीकात्मक नावाने संबोधून, तिच्यावर आगपाखड केली. एका प्रामाणिक माणसाच्या विश्वासाला तडा देऊन कुठल्याही बाईने आजपर्यंत त्याला फसवले नसल्याचे सांगत, स्वर्गातील अनेक देवतांच्या साक्षी काढल्या. राग, अभिमानाला लागलेली ठेच, आणि नाराजी व्यक्त करण्यासाठी जेवढे वाईटसाईट बोलता येईल तेवढे तो बोलला.

लिसेटने तिची बाजू मांडायचा प्रयत्न केला नाही. तिने मान खाली घालत, शांतपणे सर्व काही ऐकून घेतले. मिस्टर रेमंड ले सुईरच्या आविर्भावाने तुकडे केलेला तिचा अभिमान तिने प्रत्युत्तर न करता निमूटपणे गिळून टाकला. त्याने तिच्याकडे जळजळीत कटाक्ष टाकला.

“माझी चांगली बातमी प्रथम तुला ऐकवायला मी सरळ इथे आलो. माझी अपेक्षा होती, की मी तुझ्याबरोबर अंथरुणाच्या टोकाला बसून, न्याहारी करेन.”

“माझ्या बिचाऱ्या आवडत्या, तू अजून न्याहारी केली नाहीस काय? मी तुझ्यासाठी लगेच काही मागवते.”

“मला काही नको आहे.”

“काहीतरी बोलू नको. तू आता पेलणार असलेल्या मोठ्या जबाबदारीसाठी, तुझ्या अंगात शक्ती असली पाहिजे. “

तिने घंटी वाजवल्यावर नोकराणी आली. तिने तिला गरम कॉफी आणायला सांगितली. ती आणल्यावर लिसेटने ती ओतली. तो तिला हातदेखील लावत नव्हता. तिने पावाला लोणी लावले. त्याने खांदे उडवले आणि खायला लागला. मध्यंतरीच्या काळात त्याने लिसेटच्या अविश्वासूपणाबद्दल काही शेरेबाजी केली. ती शांत राहिली.

तो म्हणाला, “या सर्व प्रसंगात काही आहे. ही अपमान करणारी उद्धट वागणूक असल्याने, तुला माफ करायचा काही प्रश्नच नाही. तुला माहिती आहे, की मी काही शिक्षेतून सूट देणारा मनुष्य नाही. माझ्याशी चांगले वागणाऱ्या माणसांसाठी मी उदार असतो. पण माझ्याशी बरे न वागणाऱ्यांना मी दया दाखवत नाही. माझी कॉफी पिऊन झाल्यावर मी कायमसाठी ही सदनिका सोडेन.”

लिसेटने सुस्कारा सोडला.

“आता मी तुला सांगतो, की तुझ्यासाठी माझ्याकडे एक आश्चर्यकारक गोष्ट आहे. माझे काही बरेवाईट झाल्यास, आपल्या भेटीचा दुसरा वाढदिवस साजरा करताना मी तुझ्यासाठी ठराविक पुरेशी रक्कम व काही प्रमाणात स्वातंत्र्य देत आहे.”

लिसेटने हळू आवाजात विचारले, ”किती?”

“एक लाख फ्रान्स.”

तिने परत सुस्कारा सोडला. तेवढ्यात मिस्टर रेमंड ले सुईरच्या डोक्याला मागील बाजूने काही लागले. त्यामुळे तो दचकला.

तो ओरडला, “ते काय आहे?”

“तो तुझा पायजमा परत करतो आहे.”

त्या तरुण माणसाने दार उघडले व मिस्टर रेमंड ले सुईरच्या डोक्यावर पायजमा फेकला आणि परत ते लाऊन घेतले. मिस्टर रेमंड ले सुईरने त्याच्या गळयाभोवतालचा पायजमा काढून टाकला.

“वा, पायजमा परत करायची काय नामी पद्धत आहे! तुझ्या मित्राला काही शिक्षण दिसत नाही.”

लिसेट पुटपुटली, “अर्थात त्याला तुझ्यासारखे शिक्षण नाही.”

“आणि त्याला माझ्यासारखे डोकेही नाही?”

“ओहो, नाही.”

“तो श्रीमंत आहे का?”

“फुटकी कवडीही नाही.”

“मग तू त्याच्यात एवढे काय पाहिलेस?”

लिसेट हसून बोलली, “तो तरुण आहे.”

मिस्टर रेमंड ले सुईरने खाली पाहिले. त्याच्या डोळयात अश्रू उभे राहिले. व गालावरून ओघळून कॉफीत पडू लागले. लिसेटने त्याच्याकडे दयाबुद्धीने पाहिले.

ती म्हणाली, “माझ्या बिचाऱ्या मित्रा, एखाद्याला आयुष्यात सर्व काही मिळत नाही.”

“मी तरुण नाही, हे मला माहिती होते. पण माझी परिस्थिती, माझे भविष्य, माझी बळकटी. मला वाटले त्याने मी ती त्रुटी भरून काढेन. पण काही बायकांना फक्त पुरुषांचे ठराविक वयच आवडते, असे दिसते. मंत्र्याची लहानशी मैत्रिण असणे, त्याना मान देणारे वाटते. तुझ्या तोंडावर तुझी योग्यता फेकणे, मला काहीच जड नाही. पण तरी ही गोष्ट उरतेच, की मी तुला वार्षिक दोन हजार भाड्याच्या घरातून व कपडे घालणाऱ्या पुतळ्याच्या नोकरीतून बाहेर काढले. ते तुझ्यासाठी एक प्रकारे उत्थान होते.”

“गरीब पण प्रामाणिक आईवडिलांची मुलगी असल्याची मला लाज वाटत नाही. तू मला दिलेल्या नम्र जगात मी माझे आयुष्य काढले.”

“तुझे या मुलावर प्रेम आहे का?”

“हो.”

“आणि माझ्यावर नाही?”

“तुझ्यावरदेखील आहे, पण वेगळ्या प्रकारचे आहे. मी तुझ्यावर प्रेम करते, कारण तू इतका प्रसिद्ध आहेस आणि तुझे बोलणे रुचीपूर्ण आणि काय करावे, ते सांगणारे असते. तू दयाळू आणि उदार असल्याने, मी तुझ्यावर प्रेम करते. मी त्याच्यावर प्रेम करते, कारण त्याचे डोळे मोठे आहेत, केस लाटा असलेले आहेत आणि तो फारच सहज व सुंदर नाचतो.”

“तुला माहिती आहे, माझ्या स्थानामुळे. मी तुला नाचाला घेऊन जाऊ शकत नाही. मी असे म्हणायचे धाडस करतो, की तो माझ्याएवढा होईल, तेव्हा त्यालाही केस नसतील.”

लिसेटने कबूल केले. पण त्याने फार काही झाले आहे, असे तिला वाटले नाही. ती बोलली, “ते खरेही असेल.”

“तू काय केलेस, हे समजल्यावर तुझी आत्या, माननीय सलॅडीन बाईसाहेब काय म्हणेल?

“तिला नवल वाटेलच असे नाही.”

“तुला असे म्हणायचे आहे का, की ती तुझ्या वागण्याला पसंती देईल? शूर आणि कमी शूर यांच्यातील नाते मोजता येण्यासारखे नाही. नैतिक दृष्ट्या बांधून ठेवणाऱ्या पद्धती संपल्या आहेत. हे किती दिवस चालू आहे?”

“मी पहिल्यांदा दुकानात गेले, तेव्हापासून. तो लयोन्समधील मोठ्या रेशीम कंपनीसाठी काम करतो. एकदा तो त्यांचे नमुने दाखवायला आला. आम्हाला एकमेकांचे दिसणे आवडले.”

“पण पॅरीसमध्ये मोहाला बळी पडणाऱ्या तुझ्यासारख्या तरुण स्त्रीला उपदेश करायला तुझी आत्या होती. तिने तुला या तरुण माणसाबरोबर काहीही करायला परवानगी दिली नसती.”

“मी तिची परवानगी विचारली नाही.”

“करड्या केसांचे तुझे वडील मरायला टेकले आहेत, हे तुझ्यासाठी पुरेसे नाही. त्या जखमी नायकाला देशसेवा केल्याबद्दल, तंबाखू विकायचा

परवाना मिळाला आहे, त्यांचा विचार तुझ्या मनात येत नाही का? अंतर्गत सुरक्षेचा मंत्री म्हणून, तो विभाग माझ्या अधिपत्याखाली आहे, हे तू विसरली आहेस का? तुझ्या चुकीच्या अनैतिक कृत्यामुळे मी माझ्या अखत्यारीत असलेले, त्यांचा परवाना रद्द करण्याचे स्वातंत्र्य घेतले तर?''

''मला माहिती आहे, की तू सभ्य गृहस्थ असल्याने अशा प्रकारची दुष्ट गोष्ट करणार नाहीस.''

त्याने त्याचा हात वजन पडेल असा, पण कदाचित फार नाटकी पद्धतीने हलवला.

''घाबरू नकोस. देशासाठी चांगले काम काम केलेल्या माणसावर असा सूड उगवण्याच्या कारणाने, मी कधीच इतक्या खालच्या थराला जाणार नाही. जरी मला कोणाच्याही चुकीच्या वागण्याबद्दल तिटकारा वाटला, तरी मी माझा आब राखून असेन.''

तो त्याची न्याहारी पुरी करू लागला. लिसेट काही बोलली नाही. तिथे शांतता पसरली. पण त्याची भूक भागल्यावर त्याची मनस्थिती बदलली. तिच्यावर चिडल्याचे त्याला वाईट वाटू लागले. विचित्रपणे लिसेटच्या अज्ञानाचा विचार करून, त्याने स्वतःला दयनीय बनवून, त्या बाईमध्ये पश्चात्तापाची भावना निर्माण करायचे ठरवले.

''पण सवय मोडणे सोपे नाही. माझ्या अनेक व्यापातून वेळ काढून त्या क्षणी मला इथे येण्याची बुद्धी झाली, म्हणून मला बरे वाटले. लिसेट, तू मला थोडा पश्चात्ताप करायला लावशील का?

“अर्थात.”

त्याने एक खोल सुस्कारा टाकला.

“तू मला एवढे फसवशील, असे मला कधीच वाटले नव्हते.”

ती विचारपूर्वक पुटपुटली, “ही असली फसवणूक राग आणते किंवा पश्चात्ताप करायला लावते. तसे पाहिले, तर पुरुष माणसे विनोदी असतात. त्याना मूर्ख बनवले, तरी ते क्षमा करू शकत नाहीत. याचे कारण ते खूप निरुपयोगी असतात. ज्या गोष्टींचा काही संबंध नाही, अशा बिनमहत्त्वाच्या गोष्टींना ते महत्व देतात.

“मला तू माझा पायजमा घातलेल्या तरुणाबरोबर न्याहारी घेतांना सापडणे, ही तुला बिनमहत्त्वाची गोष्ट वाटते का?

“जर तो माझा नवरा असता आणि तू प्रेमिक असतास, तर तू म्हणतोस ते सहज शक्य वाटले असते.”

“नक्कीच. कारण तेव्हा मी त्याला फसवत असेन आणि माझा मान सुरक्षित राहील.”

“थोडक्यात, मला त्याच्याबरोबर लग्न केले पाहिजे, जेणेकरून माझा मान सुरक्षित राहील.”

क्षणभर त्याला काही समजले नाही. मग त्याच्या हुशार मेंदूत, तिच्या बोलण्याचा अर्थ तरळून गेला. मग त्याने झटपट तिच्याकडे पाहिले. तिच्या छान डोळयात त्याला नेहमीच एक प्रकारची चमक दिसे, जी त्याला गूढपणे

आकर्षक वाटत असे. आणि तिच्या लाल मोठ्या चेहऱ्यावर लबाड हसू असल्याचा त्याला संशय येई.

“हे विसरू नकोस, की लोकसभेचा सदस्य म्हणून मला नैतिक रीतीभाती पाळणे आणि चांगली वागणूक ठेवणे क्रमप्राप्त आहे.”

“त्याचे तुला फार ओझे वाटते आहे का?”

त्याने त्याची देखणी चौकोनी दाढी संयमितपणे व मोठ्या मिजासीने कुरवाळली.

तो उत्तरला, “त्याला काही किंमत नाही.” पण त्याने जे शब्द वापरले, त्याला फ्रान्सचा संदर्भ होता आणि त्यामुळे जास्त सनातनी लोकांना धक्का बसला.

“तो तुझ्याशी लग्न करणार आहे का?”

“तो माझे कौतुक करतो. अर्थात तो माझ्याशी लग्न करेल. जर मी त्याला सांगितले की माझ्याकडे जवळजवळ लाख फ्रान्स आहेत, तर मग त्याला अजून काय हवे?”

मिस्टर ले सुईरने परत तिच्याकडे पाहिले. रागाच्या भरात तो तिला त्याचा असा विचार असल्याचे म्हणाला, की तिच्यावर खर्च केलेले एक लाख फ्रान्सबद्दल तो फेरविचार करणार आहे. या अतिरेकी कृत्याचा तिच्यावर काय परिणाम होतो व तिने केलेली फसवणूक तिला केवढ्याला पडते, हे तिला दाखवून द्यायचे, असा त्याचा विचार होता. पण त्याची पत पणाला लागते, तेव्हा मागे सरणारा तो माणूस नव्हता.

त्याच्या पदावर असलेला एक तरुण माणूस त्याच्या आयुष्यात यापेक्षा अजून काही अपेक्षा करतो. पण तो तुमचे कौतुक करत असेल, तर तो नेहमी तुमच्या बाजूने असतो.

“मी तुला सांगितले नाही का, की तो एक व्यावसायिक प्रवासी आहे? तो पॅरीसला फक्त शनिवार- रविवार येऊ शकतो.”

मिस्टर रेमंड ले सुईर म्हणाला, “ते अजून वेगळे आहे. नैसर्गिककपणे त्याला हे जाणण्याचे समाधान असेल, की तो इथे नसतांना, मी इथे राहून तुझ्यावर लक्ष ठेवावे.”

लिसेट बोलली, “खूपच समाधान असेल.”

संभाषणाला चालना देण्यासाठी, ती उठून उभी राहिली. आणि मिस्टर रेमंड ले सुईरच्या गुडघ्यांवर येऊन बसली. त्याने तिचा हात कोवळेपणे दाबला.

तो म्हणाला, “लिसेट, तू मला फार आवडतेस. मला तू चूक केलेली आवडणार नाही. तो तुला सुखी करेल, याची तुला खात्री आहे का?”

“मला असे वाटते.”

“मी योग्य ती चौकशी करतो. निष्कलंक चारित्र्य असलेला व ज्याच्या नैतिकतेविषयी काही संशय नसेल असा जर तो नसेल, तर मी तुला त्याच्याशी लग्न करून देणार नाही. आपल्या आयुष्यात या माणसाला आणण्यापूर्वी, आपण त्याच्याविषयी पूर्णपणे जाणून घेतले पाहिजे.

लिसेटने काही हरकत घेतली नाही. तिला माहिती होते की मिस्टर रेमंड ले सुईरला सर्व गोष्टी शिस्तशीर पद्धतीने केलेल्या आवडतात. आता तो जायची तयारी करू लागला. त्याला त्याची चांगली बातमी बायकोला द्यायची होती. त्याच्या कार्यालयीन कामाशी संबंधित लोकांच्या गाठीभेटी घ्यायच्या होत्या.

लिसेटचा निरोप घेतांना, तो म्हणाला, “अजून एक गोष्ट आहे. जर तू लग्न करणार असशील, तर तू काम करणे सोडून दिले पाहिजेस. बायकोची जागा घरात असते. हे माझ्या सगळ्या तत्वांविरुद्ध आहे, की विवाहित स्त्रीने तिच्या नवऱ्याला घरगुती आयुष्याला पारखे करावे व त्याच्या नोकरीची संधी हिसकावून घ्यावी. ”

लिसेटने विचार केला की, खोलीत फेऱ्या मारतांना, उंचनिंच व बळकट तरुण माणसाने आधुनिक मॉडेल म्हणून, ढुंगण हलवत खोलीभर फिरणे, जरा विनोदीच दिसेल. पण मिस्टर रेमंड ले सुईरच्या तत्वनिष्ठेविषयी तिला आदर होता.

ती म्हणाली, “प्रिया, ते तुझ्या इच्छेप्रमाणे होईल.”

चौकशी समाधानकारक निघाली आणि कायदेशीर बाबी पूर्ण केल्यावर, शनिवारी सकाळी लग्न झाले. अंतर्गत सुरक्षेचा मंत्री, मिस्टर रेमंड ले सुईर, सलॅडीन बाईसाहेब हे साक्षीदार होते. नवरा एक सरळ नाकाचा, छान डोळयांचा व काळया लाटांसारख्या केसांचा सडपातळ तरुण माणूस होता. त्याने त्याचे केस त्याच्या कपाळापासून सरळ मागे वळवले होते. तो

प्रवाश्यापेक्षा, टेनिसच्च्या खेळाडूसारखा दिसत होता. महापौर मंत्र्याच्या उपस्थितीने प्रभावित झाले होते. फ्रेंच पद्धतीप्रमाणे त्याने त्याची वक्तृत्वकला दाखवणारे छोटेसे भाषण केले. लग्न झालेल्या जोडप्याला आधीच जे माहिती होते, तेच परत सांगायला त्याने सुरवात केली. त्याने नवऱ्याला माहिती दिली, की तो चांगल्या आईबापाचा मुलगा असून चांगल्या व्यवसायात आहे. जेव्हा अनेक तरूण माणसे त्यांच्या आनंदाचा नुसता विचार करत असतात, तेव्हा त्याने लग्नबंधन स्वीकारल्याबद्दल त्याने तरुण माणसाचे अभिनंदन केले. त्याने नवरीला आठवण करून दिली, की तिचे वडील मोठ्या लढाईतील नायक होते आणि त्यांच्या कीर्ती मिळवलेल्या जखमांमुळे त्याना तंबाखू विकायची परवानगी मिळालेली होती आणि त्यानी अजून असे सांगितले, की पॅरीसमध्ये आल्यापासून तिने एका फ्रेंच अभिरुचीच्या, चैनीच्या सदनिकेत राहून, तिचे जीवनमान उंचावले आहे. अंतर्गत सुरक्षेचा मंत्री, मिस्टर रेमंड ले सुईर,महापौर यशस्वी,सुशिक्षित होते आणि त्यानी थोडक्यात अद्भुतरम्य साहित्यातील प्रेमीजनांची ओळख करून दिली. ज्यांचे कायदेशीर पण अल्पजीवी मिलन पश्चात्ताप करण्यासारख्या गैरसमजाने संपुष्टात आले, असे रोमिओ आणि ज्युलीएट, तिचे कपडे काढून, तिच्या नम्रपणाला धक्का लावण्यापेक्षा समुद्रात मरण पावणारे पॉल आणि व्हर्जिनिया आणि शेवटी लग्नाला कायदेशीरपणे मान्यता मिळाल्याशिवाय, सुखोपभोग न घेणारे डॅफनीस आणि क्लोए! तो इतका भारावला होता, की लिसेटच्या डोळयातून अश्रू येऊ लागले. त्याने सलॅडीन बाईसाहेबांचे अभिनंदन केले. कारण तिच्या मार्गदर्शनाखाली, मोठ्या शहरातील एकटी तरुण मुलगी म्हणजेच तिची सुंदर भाची सर्व धोक्यांपासून

वाचली होती. शेवटी ज्या लग्नासाठी मिस्टर रेमंड ले सुईरसारखा मंत्री साक्षीदार म्हणून उपस्थित राहिला, त्या नवविवाहित आनंदी दांपत्याचे त्याने अभिनंदन केले. महापौर म्हणाले, "ही मिस्टर रेमंड ले सुईर यांच्या उच्च नैतिक अधिष्ठानाची परीक्षा होती आणि उद्योगधंद्यात अग्रणी असलेल्या या मुत्सद्याने नम्रपणे वेळात वेळ काढून, त्याचे गुणविशेष व कर्तव्यतत्परता दाखवली आहे." लवकर लग्न करायचे, सुरक्षित कुटुंब असण्याचे व फ्रान्सच्या शक्तीवर्धनासाठी व चांगल्या परिणामांसाठी, मुले जन्माला घालायचे महत्व त्याने पटवून दिले. लग्नाची न्याहारी मिस्टर रेमंड ले सुईर यांना भावनिक ममत्व असणाऱ्या, चटाऊ डे मद्रीदमध्ये झाली. याचा आधीही उल्लेख केला गेला, की त्यांच्या अनेक आवडींपैकी मंत्र्यांना [ आता आपण त्याना तसे संबोधले पाहिजे. ] मोटारींचा कारखाना काढायची हौस होती. नवऱ्यामुलाला लग्नाची भेट म्हणून त्यांनी दोन आसनांची त्यांनी बनवलेली मोटार दिली. आणि जेवण झाल्यावर, त्यातून तरूण जोडपे मधुचंद्रासाठी निघाले. हा फक्त शनिवार रविवारपुरताच होता. कारण तरुण माणसाला परत मार्सेलीस, टाउलॉनला व नाईसला जाऊन, कामाला लागायचे होते. लिसेटने तिच्या आत्याचा व मिस्टर रेमंड ले सुईर यांचा पापा घेतला.

ती कुजबुजली, "मी सोमवारी पाच वाजता तुझी वाट बघते."

तो उत्तरला, "मी तिथे येईन."

ते त्यांच्या मोटारीत बसून निघून गेले आणि मिस्टर रेमंड ले सुईर व सलॅडीन बाईसाहेब त्या आधुनिक पिवळ्या मोटारीकडे बघत राहिले.

शॅंपेनची सवय नसल्याने, थोडे उदास होत, सलॅडीन बाईसाहेब सुस्कारा टाकला व बोलल्या, “जोपर्यंत तो तिला सुखी करतो आहे --- “

मिस्टर रेमंड ले सुईर जोर देत बोलले, “जर त्याने तिला सुखी केले नाही, तर त्याची माझ्याशी गाठ आहे.”

“प्रिय बाईसाहेब, अच्छा. तुम्हाला डे न्युइली रस्त्याला बस मिळेल.”

त्याने लक्ष द्यायला हवे होते, असा राज्याच्या बाबतीतला विचार करत व समाधानाने सुस्कारा टाकत, तो गाडीत शिरला. हे या परिस्थितीला शोभत होते, की त्याची बायको शिंप्याच्या दुकानातील लहानसा पुतळा नव्हती, तर माननीय विवाहित स्त्री होती.

The three fat women of Antibes

# अँटीबेसच्या तीन जाड बायका



एकीचे नाव मिसेस रिचमन होते आणि ती विधवा होती. दुसरी मिसेस सूटक्लिफ होती. ती अमेरिकन असून तिचा दोन वेळा घटस्फोट झाला होता. तिसरीचे नाव मिसेस हिकसन असून, ती प्रौढ कुमारिका होती. त्या तिघी आरामशीर चाळीशीत होत्या आणि पैसा राखून होत्या. मिसेस सूटक्लिफचे

पहिले नाव विचित्रपणे ॲरो होते. ती तरूण आणि बारीक असतांना, तिला ते आवडत असे व ते तिला शोभूनही दिसत असे. प्रासंगिक विनोदासारखे, ते सतत घेतले जाणे तिला चिडवल्यासारखे, किंवा उगीच स्तुती केल्यासारखे वाटे. ती यावर विश्वास ठेवायला तयार नव्हती, की ते तिच्या चारित्र्याशी मिळते जुळते आहे. ते नेमकेपणा, वेग आणि उद्देश सुचवत असे. तिचे नाजूक अवयव आता चरबीने जाड झाले होते त्यामुळे आता तिला ते कमी आवडे. तिचे दंड, खांदे आणि ढुंगण आकाराने इतके वाढले होते, की तिला आवडतील असे योग्य कपडे मिळणे दुरापास्त होऊन बसले होते. तिच्या पाठीमागे तिच्या नावाची टवाळी केली जात असे. ते तिला चांगले ठाऊक होते पण ते थांबवणे शक्य नव्हते. ती मध्यम वयाकडे झुकली होती. तिच्या डोळयांचा रंग खुलण्यासाठी ती अजून नखरे करे. कलात्मकतेने, तिचे छानसे केस चमकदार दिसत. तिला बिट्राइस रीचमनचे व फ्रान्सिस हिकमनचे काय आवडे, तर त्या दोघी तिच्यापेक्षा खूप जाड होत्या. त्यामुळे ती त्यांच्यापुढे बारीक दिसे. त्या दोघी तिच्यापेक्षा वयाने मोठ्या होत्या आणि तिला त्या छोट्या तरुणीसारखे वागवत. त्यात काही न पटायचा प्रश्न नव्हता. त्या स्वभावाने चांगल्या स्त्रिया होत्या आणि त्या तिला आनंदाने तिच्या पुरुषमित्रावरुन चिडवत असत. त्या दोघीनी अशा प्रकारचा अविचार सोडून दिला होता. मिसेस हिकसन क्षणभरदेखील तसला विचार करत नसे. पण त्यांना तिच्या खेळीमेळीच्या लैंगिक आकर्षणाबद्दल सहानुभूती वाटे. त्या हे समजून होत्या, की ॲरो आज ना उद्या एखाद्या माणसाला सुखी करणार आहे.

मिसेस रिचमन म्हणाल्या, “अग, फक्त तू आता आणखी जाड होता कामा नयेस. मिसेस हिकसन म्हणाल्या, आणि कृपया, तो कुणी जो तू निवडशील, तो ब्रिज खेळत असल्याची खात्री कर.

त्यांनी तिच्यासाठी पन्नाशीचा एक बऱ्यापैकी सुस्थितीतला आणि सभ्य माणूस पाहिला. तो निवृत्त अॅडमिरल होता. उत्तम गोल्फ खेळणारा होता. तो काही ताण नसलेला, पण चांगल्यापैकी उत्पन्न असलेला विधुर होता. अॅरोने त्यांचे आनंदाने ऐकले. आणि तिने मनाशी विचार केला, की ही काही तिची कल्पना नव्हती. हे खरे होते, की तिला लग्न करायला आवडले असते. पण महिन्यापूर्वी तिचा विचार एका काळया, बारीक, चमकत्या डोळयांच्या, खर्जातील मोठा आवाज असणाऱ्या, स्पॅनिश लीनेजचा, वंशज असलेल्या इटालियनकडे वळला. वेळोवेळी स्वतःकडे आरशात बघतांना, तिला असे वाटले, की आपण काही फार मोठ्या दिसत नाही.

त्या तिघी खास मैत्रिणी होत्या. मिस हिकसन, मिस रिचमन आणि अॅरो सूटक्लिफ. त्यांच्या जाडेपणाने आणि ब्रिजच्या आवडीने, त्यांना जवळ आणले होते. त्या प्रथम कार्लसबॅडला भेटल्या. तिथे त्या एकाच हॉटेलात रहात होत्या. त्यांचा डॉक्टरही एकच होता. तो त्याना सारख्याच निर्दयीपणे वागवत असे. बिट्राइस रीचमन प्रचंड होती. ती सुंदर होती. तिचे डोळे छान होते. लाली लावलेले गाल होते. लिपस्टिक लावलेले ओठ होते. ती सधन विधवा असून, समाधानी होती. ती तिच्या अन्नाचे कौतुक करे. तिला पाव, लोणी, बटाटे, क्रीम व सुएट पुडिंग आवडे. वर्षातले अकरा महिने ती तिला

हवे ते खाई आणि एक महिना कार्लसबॅडला बारीक होण्याकरता जाई. पण दर वर्षी ती फुगतच चालली होती. ती डॉक्टरच्या चुका काढे. पण त्याच्याकडून तिला सहानुभूती मिळत नसे. तो तिला अनेक वेगवेगळया साध्या व सरळ गोष्टी निदर्शनास आणून देई.

ती जोरदारपणे निषेध करत म्हणे, “पण मला जर कधीच माझ्या आवडीच्या गोष्टी खायला मिळाल्या नाहीत, तर मग आयुष्यात जगण्यासारखे उरलेच काय?”

तो नापसंतीदर्शक रित्या खांदे उडवी. नंतर तिने मिस हिकसनला सांगितले, की तो डॉक्टर स्वतःला समजतो, तितका हुशार नाही. मिस हिकसन मोठ्याने, मनापासून हसली. तिचा आवाज खोल खर्जातील होता. मोठा, चपटा पिवळटसर रोगिष्ट चेहरा होता. त्यावरील छोटे चमकदार डोळे लुकलुकत. ती खांदे पाडून, मान खाली घालून व हात खिशात घालून चाले. कुणाचे लक्ष न जाता ती जेव्हा असे करे, तेव्हा ती लांब सिगरेट ओढे. ती शक्य तोवर पुरुषी कपडे घाले.

ती म्हणे, “मी झालरीचे कपडे आणि प्लेट असलेले स्कर्ट घालून, काय मोठी सुंदर दिसते! जेव्हा तुम्ही माझ्याइतके जाड असता, तेव्हा तुम्हाला आरामशीर वाटेल, असेच कपडे घाला.”

ती ट्विडचे जड बूट घाले आणि शक्यतो टोपी घालत नसे. पण ती

एखद्या बैलासारखी धष्टपुष्ट होती. ती बढाया मारत असे की, अगदी थोडी पुरुष माणसे तिच्यापेक्षा लांबवर चेंडू फेकू शकत असतील. बोलण्यात, ती सरळ होती. गोदीतील जहाजातून माल चढविण्याचे व उतरवण्याचे काम करणाऱ्या लोकांपेक्षा जास्त शक्तिमान असल्याचे ती शपथपूर्वक सांगे. तिचे नाव फ्रान्स असले, तरी तिला फ्रँक म्हटलेले आवडे. दुसऱ्यांना कह्यात राखू शकणाऱ्या तिच्या आनंदी व मैत्रीपूर्ण चारित्र्याच्या बळकटीने, त्या तिघी एकत्र बांधल्या जात. त्या पाणी एकत्र पित. एकाच तासात तिघींच्या अंघोळी होत. चालायचे श्रम पण तिघी एकत्र करत. व्यावसायिक लोकांबरोबर टेनिस खेळून, त्या खूप धावत. एकाच टेबलावर बसून बरेच पसरलेले पण ठराविक वेळी जेवण घेत. त्यांचे चांगले विनोद कधी नाहीसे होत नसत. आणि त्यांच्यापैकी कुणाचेही वजन आदल्या दिवशीइतकेच भरे, तेव्हा फ्रँकचे टोचणारे विनोद, बिट्राइसचे मित्रत्वाचे विनोद व ॲरोचे खेळकर सुंदर विनोद, मरगळ नाहीशी करत असत. पण वजन वाढल्यास, मोठे परिणामकारक उपाय योजले जात. गुन्हेगाराला चोवीस तास झोपून रहावे लागे. तिला फक्त डॉक्टरांनी शिफारस केलेले, त्यात कोबी घातलेले गरम पाण्याच्या चवीचे भाज्यांचे प्रसिद्ध सूप मिळे.

त्या तिघी कधीच खूप जवळच्या मैत्रिणी नव्हत्या. ब्रिज खेळण्यासाठी, कुणी चौथी भिडू लागत नसती, तर त्या पूर्णपणे स्वतंत्र होत्या. त्या भीतीदायक, उत्साही खेळाडू होत्या. त्यांचे दिवसभराचे कामकाज झाले की त्या टेबलाशी ब्रिज खेळायला बसत. बायकी असलेली ॲरो तिघींमध्ये सर्वात उत्तम, कडक, बुद्धिमान खेळ खेळे. त्यात ती काही दया दाखवत नसे.

हो नाही करत कोणतीही सूचना स्विकारत नसे व कोणाच्याही चुकीचा फायदा घेतल्याशिवाय रहात नसे. बिट्राइस भक्कम व भरवशाची खेळाडू होती. फ्रँक चढाईखोर होती. ती मोठी खेळाचे छक्के पंजे जाणणारी होती. सर्व अधिकार तिच्या जिभेवर नाचत असत. शत्रुत्व पद्धतीवर त्यांच्यात लांब वादावादी चाले. त्या एकमेकींवर कुरघोडी करायला बघत. हे सरळ होते, की त्यांच्यापैकी कुणीच निदान पंधरा कारणे असल्याशिवाय एकही पत्ता खेळत नसे. पण त्यांच्या संभाषणातून हे देखील नक्की होते, की निदान पंधरा चांगल्या कारणांसाठी, त्या एखादी खेळी खेळत नसत. जर त्याना ब्रिजसाठी सतत त्यांच्यासारखीच चौथी भिडू शोधण्याची कटकट करावी लागली नसती आणि चोवीस तास ते डॉक्टरने शिफारस केलेले सूप! त्याला [बिट्राइस ] फार खराब, [ फ्रँक ] आक्रमक व [ ॲरो ] अतिशय वाईट म्हणे. ते पिऊनही त्यांचे वजन दोन दिवसात, एक औसानेही कमी झाले नसते, तरी त्यांचे जीवन परिपूर्ण झाले असते. या कारणासाठीच फ्रँकने लेनाला त्यांच्याबरोबर अँटीबेसला रहायला येण्याचे आमंत्रण दिले. फ्रँकने सुचवल्यामुळे, त्या तिथे काही आठवडे काढणार होत्या. तिला सर्वसामान्य विचार करता, ते गैरलागू वाटले. की बिट्राइसचे वजन नेहमी वीस पौंड कमी होत असे. तिच्या न आवरता येणाऱ्या भुकेला वाट देतांना, ते पुन्हा वाढत असे. बिट्राइस अशक्त झाली होती. तिच्या खाण्यावर लक्ष ठेवण्यासाठी तिला कुणा बळकट इच्छाशक्ती असलेल्या व्यक्तीची गरज होती. तिने असे सुचवले, की कार्लसबॅड सोडल्यावर, त्या अँटीबेसला घर घेतील. तिथे त्यांना भरपूर व्यायाम करता येईल --- त्यांना माहिती होते, की बारीक होण्यासाठी पोहण्या

सारखा दुसरा चांगला व्यायाम नाही --- आणि शक्य तर त्यांनी तो उपाय केला असता. त्यांचा स्वतःचा स्वयंपाकी ठेऊन, त्याना निदान जाड बनवणाऱ्या गोष्टी टाळता आल्या असत्या. त्याना तिघीनाही अजून काही पौंड वजन कमी न करण्याचे काहीच कारण नव्हते. ती एक चांगली कल्पना होती. बिट्राइसला माहिती होते, की तिच्यासाठी काय चांगले आहे. जर तिने मोह टाळला, तर ते तिच्यासाठी चांगले होते. शिवाय तिला जुगार खेळायला आवडत असे. आणि तो खेळायच्या ठिकाणी, ती आठवड्यातून दोन तीन वेळा तरी जाऊन तिचा वेळ छान घालवत असे. असे. ॲरोला अँटीबेस आवडत असे. कार्लसबॅडला येऊन महिना झाल्यावर, ती दिवसभर पोहायचा पोशाख व रंगीबेरंगी गाउन घालून हिंडणाऱ्या तरुण इटालियन्स, भावनामय स्पेनचे लोक, कपड्यांची छानछोकी करणारे फ्रेंच आणि लांब हातांचे इंग्रज, यांच्यातील उत्तम माणसाला शोधत फिरत असे. हा तिचा बेत सफल होऊन, त्यांचा वेळ मस्त गेला. आठवड्यातून दोन दिवस त्या फक्त जास्त उकडलेली अंडी व कच्चे टोमॅटो खात असत. रोज सकाळी जीव मुठीत धरून, वजनकाट्यावर उभ्या रहात. ॲरोने अकरा पौंड वजन कमी केले. त्यामुळे तिला मुलीसारखे वाटू लागले. बिट्राइस आणि फ्रँक यांनी विशिष्ट तऱ्हेने उभे राहून, स्वतः टीन एज मध्ये असल्याची कल्पना लढवली. त्यांनी आणलेल्या यंत्रात किलोग्रॅमची नोंद होत होती. त्यांनी विशेष हुशारी दाखवून, त्यांना परिवर्तित करून पौंड आणि औसांना डोळे मिचकावून दाखवले.

पण ब्रिजसाठीचा चौथा खेळाडू मिळवणे अवघडच राहिले. एकजण मूर्खासारखी खेळे. दुसरी इतकी हळू खेळे, की तुम्ही वेडे होऊ लागता. एक

भांडखोर होती व एकजण सारखी हरायची. तुम्हाला हवी तशी चौथी भिडू मिळणे अवघड होते.

एका सकाळी त्या पायजम्यात गच्चीमध्ये समुद्राकडे बघत बसलेल्या असतांना व बिनसाखरेचा, बिनदुधाचा चहा पित असतांना व डॉक्टर हुडेबर्टने स्वतः बनवून वजन न वाढण्याची खात्री दिलेले, हलके कोरडे बिस्कीट खाताना फ्रँकने तिच्या पत्रांतून डोके वर काढून बघितले.

ती म्हणाली, "लेना फिंच रिव्हिएराहून येणार आहे."

ॲरोने विचारले, "ती कोण आहे?"

"तिने माझ्या चुलत भावाशी लग्न केले आहे. तो काही महिन्यांपूर्वी वारला. ती आता कुठे उदासीने मोडून पडण्यातून, बाहेर पडते आहे. तिला इथे पंधरा दिवस रहायला बोलावले, तर?"

बिट्राइस विचारले, "ती ब्रिज खेळते का?"

फ्रँक तिच्या खर्जातील आवाजात म्हणाली, "ती खेळते आणि खूप छान खेळते. आपल्याला बाहेरच्या कुणावर अवलंबून रहायला नको."

"तिचे वय काय आहे?"

"माझ्याएवढीच आहे."

"हे ठीक वाटते आहे."

मग ते ठरले.

फ्रँक तिच्या नेहमीच्या फसवेपणे तिची न्याहारी संपल्यावर, एक तार

करायला बाहेर पडली. तीन दिवसांनी लेना फिंच आली. फ्रँक तिला स्टेशनवर भेटली. ती तिच्या नवऱ्याच्या अलीकडील मृत्यूमुळे, खोलवर नव्हे, पण वाईट रीत्या दुःखात होती. फ्रँक तिला दोन वर्षात भेटली नव्हती. तिने हळूवारपणे, तिचा पापा घेतला आणि नीटपणे तिच्याकडे पाहिले.

ती म्हणाली, "अग, तू किती बारीक झाली आहेस!"

लेना शूरपणे हसली. "मी अलीकडे कशाकशातून गेले! माझे वजन खूप कमी झाले आहे."

फ्रँकने सुस्कारा टाकला. तो सहानुभूतीमुळे, की तिच्या चुलत भावाच्या मरणामुळे की हेव्यामुळे, ते समजले नाही.

तरीपण लेना इतकी काही नाराज झाली नव्हती आणि झटपट अंघोळ केल्यावर फ्रँकबरोबर एडेनरॉकला जायला तयार झाली. फ्रँकने तिची तिच्या दोन मैत्रिणींबरोबर ओळख करून दिली. त्या माकडघर नावाने ओळखल्या जाणाऱ्या जागी बसल्या. ती समुद्राजवळील, काचांनी बंदिस्त केलेली जागा होती. तिथे मागे बार होता. तिथे पोहायच्या पोशाखातील, पायजम्यातील व गाउनमधील लोकांचा चिवचिवाट चालला होता. ते टेबलांवर पेये पित बसले होते. बिट्राइसचे कोमल हृदय लहान खिडकीकडे गेले आणि अॅरोला नेहमीसारखेच बहुधा अठ्ठेचाळीस वयामुळे, तिला अशक्त झालेले पाहून, तिचा कळवळा आला. एक वेटर त्यांच्याकडे आला.

फ्रँकने लेनाला विचारले, "प्रिय, तू काय घेणार?"

“ओहो, मला माहिती नाही. तुम्ही सगळ्या घ्याल, तेच. कोरडी मार्टीनी किंवा व्हाईट लेडी.”

ॲरो आणि बिट्राइसने तिच्याकडे झटपट पाहिले. प्रत्येकीला माहिती होते, की अशा पेयांनी वजन वाढते.

फ्रँक दयाळूपणे बोलली, “तू प्रवासाने दमलेली असणार.”

तिने कोरडी मार्टीनी, लिंबू सरबत आणि स्वतःसाठी व दोन मैत्रिणींसाठी संत्र्याचा रस आणायला सांगितला.

तिने स्पष्टीकरण दिले, “या उन्हाळ्यात आम्हाला कडक पेय नको वाटते.”

लेना फुशारकी मारत बोलली, “ओहो, माझ्यावर त्याचा काही परिणाम होत नाही. मला कडक पेये आवडतात.”

ॲरो तिच्या मेकपच्च्या थराच्च्या आत थोडी फिकी पडली. [ ती व बिट्राइस अंघोळ करतांना कधीच त्यांचा चेहरा ओला करत नसत. त्यामुळे त्याना फ्रँकसारख्या जाड बाईने तिला पाण्यात सूर मारायला आवडत असल्याचे ढोंग करणे त्यांना विचित्र वाटले. ] पण ती काही बोलली नाही. संभाषण सहज व सुखाने चालले होते. त्या आपापल्या चवीप्रमाणे बोलायच्या गोष्टी बोलत होत्या. आता त्या जेवणासाठी त्यांच्या रहायच्या ठिकाणी चालल्या होत्या.

प्रत्येकीच्या रुमालात जाडेपणा घालवणारे बिस्कीट होते. तिचे ताट त्यांच्या कडेला ठेवतांना, लेना चमकदार हसू हसली

तिने विचारले, “मला थोडा पाव मिळेल का?”

त्या तीन बायकांच्या कानावर फार उद्धट व अपमानकारक शब्द पडले. त्यामुळे त्यांना धक्का बसला. त्यांनी गेल्या दहा वर्षात पाव खाल्ला नव्हता. अधाशी बिट्राइसनेदेखील त्यापुढे फुल्ली मारली होती. चांगली यजमान असलेल्या फ्रँकने सर्वात पहिल्यांदा स्वतःला सावरले.

ती स्वयंपाक्याकडे वळत त्याला पाव आणायला सांगत लेनाला बोलली, “अर्थात प्रिय”

तिच्या आनंदी पद्धतीने लेना बोलली, “आणि लोणी देखील.”

क्षणभर तिथे लाजीरवाणी शांतता पसरली.

फ्रँक म्हणाली, “घरात ते शिल्लक आहे की नाही कुणास ठाऊक! पण मी बघते. स्वयंपाकघरात कदाचित असेल.

बिट्राइसकडे वळत लेना म्हणाली, “मला पाव लोणी खूप आवडते. तुम्हाला आवडत नाही का?”

बिट्राइस आजारल्यासारखे हसली व स्वतःला उघडे न करता उत्तर दिले. स्वयंपाक्याने फ्रेंच पावाची लांब, कुरकुरीत गुंडाळी आणली. लेनाने त्याचे दोन भाग केले व त्यावर चमत्कारासारखे लोणी पसरले. तो भाजून पुढे केला गेला.

फ्रँक म्हणाली, “आम्ही अगदी साधे खातो. मला आशा आहे की तुला याचे काही वाटणार नाही.”

लेना म्हणाली, “नाही. नाही. मलाही साधे जेवणच आवडते.” तिने लोणी घेऊन माशावर पसरले. “जोपर्यंत मला पाव, लोणी, क्रीम आणि बटाटे मिळत आहेत, तोपर्यंत मी खूप आनंदी आहे.”

तिघींनी एकमेकींकडे कटाक्ष टाकले. फ्रँकचा खूप पिवळसर तपकिरी चेहरा थोडासा पडला. तिने बेचवीने तिच्या ताटलीतील कोरड्या, चपट्या तुकड्याकडे पाहिले. तिची सुटका करायला बिट्राइस धाऊन आली.

ती म्हणाली, “हे इतके कंटाळवाणे आहे, की इथे क्रीम मिळत नाही. रिव्हिएरामध्ये तुम्हाला त्याशिवाय चालवून घावे लागते.”

लेना बोलली, “हे दयनीय आहे.”

बाकीच्या जेवणात तेलकट भाग काढून टाकलेली मेंढीची कटलेट होती. त्यामुळे बिट्राइस ते खाऊ शकली. आणि पाण्यात उकळलेला पालक होता. शेवटी झाकण ठेऊन सावकाश शिजवलेले पेअर होते. लेनेने पेअरची चव घेतली व स्वयंपाक्याकडे चौकस नजर टाकली. त्या हुशार माणसाला लगेच कळले, की जरी या टेबलावर पूर्वी कधीही साखर मागवली गेली नसली, तरी आता ती हवी आहे. त्याने अजिबात वेळ न दवडता, एक बाऊलभरून साखर आणून दिली. त्या तिघींनी ती बघून न बघितल्यासारखे केले. कॉफी आली आणि लेनाने तिच्या कपात तीन चमचे साखर घातली.

मित्रत्वाचा आव आणत, ॲरो बोलली, “तुला साखरेची आवड दिसते.”

फ्रँकने तिच्या कपात एक चमचा साखर घातली व म्हणाली,

“आम्हाला साखर फार गोड वाटते.”

लेना म्हणाली, “हे उबग आणणारे आहे.”

बिट्राइसचे ओठांचे कोपरे खाली वळले. तिने साखरेकडे खूप वेळ पाहिले.

फ्रँक कडकपणे बोलली, “बिट्राइस.”

बिट्राइसने एक सुस्कारा टाकला आणि साखरेकडे वळली.

त्या ब्रिज खेळायला टेबलाशी बसल्या, तेव्हा फ्रँकला मोकळे वाटले. तिला कळत होते, की ॲरो आणि बिट्राइस उदास झाल्या होत्या. तिला असे वाटत होते, की लेना त्यांना आवडावी. आणि तिचा असा प्रयत्न होता की, लेनाने दोन आठवडे त्यांच्याबरोबर मजेत काढावेत. ॲरोने पहिले रबर नवीन पाहुणीबरोबर कापले.

तिने विचारले, “तू व्हॅन्डरबिल्ट किंवा कल्बरटन खेळतेस का?”

लेना मनमानीपणे म्हणाली, “मला खेळायला काही हरकत नाही. मी नैसर्गिकपणे खेळते.”

ॲरो दुष्टपणे बोलली, “मी फक्त कल्बरटन खेळते.”

तीन जाड बायकांनी भांडायला सुरवात केली. खरेच त्याना काही रीतभात नव्हती. जेव्हा विषय ब्रिजवर आला, तेव्हा फ्रँकची कुटुंबाविषयीची भावना विसरली गेली आणि ती देखील रागाने नापसंती दर्शवून पाहुणीशी तशीच भांडायला लागली. पण निसर्गाच्या वरदानाने लेनाला चांगले वाचवले. तिला कुशलतेने खेळायची निसर्गदत्त देणगी होती व दांडगा अनुभव

होता. ती कल्पकपणे, झटपट, धीटपणे व खात्रीपूर्वक खेळे. ती आता कुठली खेळी खेळणार आहे, हे इतर खेळाडूंच्या लक्षात यायच्या आत, ती खेळून मोकळी होई. इतर खेळाडू बायका पूर्णपणे चांगल्या स्वभावाच्या व उदार असल्याने, त्या हळूहळू शांत होत. हा खरा पूल होता. त्याना खूप मजा येई. ॲरो आणि बिट्राइस यांना लेनाबद्दल आपुलकी वाटू लागली. हे समजल्यामुळे, फ्रँकने सुटकेचा एक मोठा सुस्कारा सोडला. हा बेत यशस्वी होत होता.

काही तासांनी खेळ संपवून त्या वेगळ्या झाल्या. फ्रँक आणि बिट्राइस गोल्फ खेळायला गेल्या. ॲरोने नुकतीच ओळख झालेल्या, तरुण राजपुत्र, रुकामेरबरोबर भरभर चालायला सुरवात केली. तो खूप गोड व देखणा तरुण होता. लेनाने विश्रांती घ्यायचे ठरवले.

जेवणापूर्वी थोडा वेळ त्या परत भेटल्या.

फ्रँक बोलली, “प्रिय लेना, मी अशी आशा करते, की तू ठीक आहेस. तुला करायला काही नसताना एकटीला ठेवणे, माझ्या सद्सदविवेकबुद्धीला जरा टोचत होते.”

“ओहो, क्षमा मागू नकोस. माझी छान झोप झाली. मग मी जुआनला जाऊन, दारू घेतली. आणि तुला माहिती आहे का, की मला काय शोध लागला? तू इतकी खूष होशील. मला एक छोटेसे चहाचे दुकान सापडले. तिथे मला ताजे, दाट, मस्त क्रीम मिळाले. मी त्याला अर्धा डबा भरून रोज

पाठवायला सांगितले आहे. मला वाटले, याचा घरातील मंडळींना उपयोग होईल.''

तिचे डोळे चमकत होते. ती त्या तिघी आनंदित होण्याची अपेक्षा करत होती.

तिच्या दोन मैत्रिणींच्या चेहऱ्यावरील रागाकडे दुर्लक्ष करत, फ्रँक बोलली, ''किती छान केलेस! पण आम्ही कधीच क्रीम खात नाही. या हवेत त्यामुळे घशाशी येते.''

लेना आनंदाने म्हणाली, मग सगळे मलाच खावे लागेल.''

ॲरोने लांबलचक विचार करून, थंडपणे म्हटले, ''तू कधी तुझ्या सुडौलपणाचा विचार करत नाहीस का?

''डॉक्टर म्हणाले, की तुम्ही ते खायला पाहिजे.''

''त्यांनी बटाटे, पाव, लोणी व क्रीम हे सगळे खायला सांगितले आहे का?''

''हो. तुम्ही साधे जेवण म्हणालात, तेव्हा मला वाटले, तुम्हाला हेच म्हणायचे आहे.''

बिट्राइस म्हणाली, ''तू आकाराने अगदी प्रचंड होशील.''

लेना आनंदाने हसली. ''नाही. मी नाही होणार. मी कशानेही जाड होत नाही. मी नेहमी सगळे खाते. पण त्याचा माझ्यावर थोडासुद्धा परिणाम होत नाही.''

यानंतर जो सन्नाटा पसरला, तो स्वयंपाकी आल्यामुळे मोडला.

त्याने जाहीर केले, “बाईसाहेब, मी आपली काय सेवा करू शकतो?”

फ्रँकच्या खोलीत लेना झोपायला जाईपर्यंत, त्यांनी त्यावर रात्री उशीरापर्यंत चर्चा केली. संध्याकाळभर त्या छान उत्साही होत्या. तेव्हा त्यांनी एकमेकींना मित्रत्वाने चांगले झोडपले, असेच नीट बघणाऱ्याला दिसले असते. पण आता त्यांनी तो मुखवटा उतरवून ठेवला. बिट्राइसची मनस्थिती ठीक नव्हती. ॲरो त्रास द्यायला बघत होती. फ्रँक एकटी राहू इच्छित होती.

बिट्राइस दुःख करत म्हणाली, “हे माझ्यासाठी चांगले नाही, की मी इथे नुसते बसून तिने माझ्या आवडत्या गोष्टी खातांना बघायचे.”

फ्रँक एक फटकारा देत बोलली, “आपल्या कुणासाठीच हे चांगले नाही.”

ॲरो म्हणाली, “तू तिला इथे बोलवायलाच नको होतेस.”

फ्रँक ओरडली, “मला कसे माहिती असणार?”

बिट्राइस म्हणाली, “मला असा विचार केल्याशिवाय रहावत नाही, की जर तिला खरोखर तिचा नवरा मेल्याचे दुःख असेल, तर ती एवढे खाणार नाही. तो वारल्याला फक्त दोन महिनेच झाले आहेत. म्हणजे मला म्हणायचे आहे, गेलेल्या माणसाला तुम्ही थोडा तरी मान दिला पाहिजे, नाही का?”

ॲरो दुष्टपणे बोलली, “ती आपल्यासारखेच का खात नाही? ती पाहुणी आहे.”

“ती काय म्हणाली, तुम्ही ऐकले का, की म्हणे डॉक्टरने तिला सगळे

खायला सांगितले आहे.”

“मग तिने आजारी माणसांसाठी असणाऱ्या विश्रांतीगृहात जायला हवे.”

बिट्राइस शोक करत बोलली, “हे अगदी असह्य आहे.”

“जर मी सहन करू शकते, तर तुम्ही का नाही?”

ॲरो बोलली, “ती तुझी वहिनी आहे, आमची नव्हे. मी नुसती बसून, तिचे पोसणीचे डुक्कर होताना बघू शकत नाही.”

फ्रँक नेहमीपेक्षा खर्जातील आवाजात हल्ला करत म्हणाली, “हे अन्नाला इतके महत्व देणे, असभ्यपणाचे आहे. शेवटी कशाला महत्व आहे, तर उत्साहाला.”

ॲरो डोळे चमकवत बोलली, “फ्रँक, तू मला असभ्य म्हणालीस?”

बिट्राइस मध्येच बोलली, “नाही, अर्थात ती तशी नाही आहे.”

मी असे होऊन देणार नाही, की आपण अंथरुणात असू तेव्हा तू स्वयंपाकघरात जाऊन, लबाडीने तिला छान पूर्णान्न देशील.

फ्रँक उडी मारून उभी राहिली. “ॲरो, तू असे बोलायचे धारिष्ट्य कसे काय करू शकतेस? मी स्वतः जे करायला तयार नाही, ते मी दुसऱ्याला करायला सांगणार नाही. तू मला एवढी वर्षे ओळखते आहेस आणि तरीही मी अशी वाईट गोष्ट करू शकेन, असे तुला वाटते का?”

“मग असे कसे, की तू कधीच काही काळजी करत नाहीस?”

फ्रँकने खोल श्वास घेत, रडायला सुरवात केली.

"मी खूप पौंड वजन कमी केले आहे, हे बोलणे फार दुष्टपणाचे आहे."

ती एखाद्या मुलासारखी रडली. तिचे मोठे शरीर गदगदले आणि अश्रू तिच्या विशाल छातीवर ओघळले.

ॲरो ओरडली, "प्रिय, मला तसे म्हणायचे नव्हते. ती गुडघ्यांवर बसली आणि तिच्या फुगीर दंडांनी फ्रँकला कवटाळून धरले. तिने शोक केला आणि तिच्या डोळयांचा मेकप गालांवर ओघळला.

फ्रँक हुंदके देत म्हणाली, "म्हणजे तुला असे म्हणायचे आहे का, की एवढे सगळे केल्यावरही, मी बारीक दिसत नाही?

ॲरो रडत रडत बोलली. "प्रिय, अर्थातच तू दिसतेस."

प्रत्येकीच्या ते लक्षात आले.

बिट्राइस सहज उदास किंवा उद्दीपित होणारी नसली, तरी हळूहळू रडू लागली. हे फार दयनीय होते. ती निधड्या छातीची फ्रँक डोळयातून पाणी काढतांना बघून, खरेच कठीण हृदयदेखील हेलावले असते. तरीही आता त्यांनी अश्रू पुसून टाकले आणि थोडी ब्रँडी पाणी घालून घेतली. ती जाडे पणाला सर्वात बरी असल्याचे डॉक्टरांनी सांगितले होते. मग त्यांना बरेच बरे वाटू लागले. त्यांनी त्यांचा शांतपणा बिघडू नये, म्हणून महत्वाचा निर्णय घेतला की लेना तिच्यासाठी मागवलेले सकस अन्न घेईल. ती नक्कीच उत्तम ब्रिज खेळाडू होती. आणि शेवटी हे पंधरा दिवसांसाठीच तर होते. तिचे तेवढे दिवस छान जावे, म्हणून त्या काही करायला तयार होत्या. त्यांनी प्रेमाने

एकमेकींचा पापा घेतला व रात्रीसाठी विचित्रपणे खूष होऊन अलग झाल्या. त्यांच्या तिघींच्या जीवनात इतकी बहार आणणाऱ्या नवलपूर्ण मैत्रीत कोणीही बाधा आणू शकत नव्हते.

पण मानवी स्वभाव कमकुवत असतो. तुम्ही त्याच्याकडून फार अपेक्षा ठेऊ शकत नाही. त्यांनी भाजलेला मासा खाल्ला तर लेनाने मॅक्रोनी सिझलिंग व लोणी खाल्ले. त्यांनी भाजलेली कटलेट्स खाल्ली तर लेनाने बदकाच्या यकृताची मऊसर पूड खाल्ली. त्या आठवड्यातून दोन वेळा खूप उकळलेली अंडी कच्च्या टोमॅटोबरोबर खात असत. तेव्हा लेना क्रीममध्ये बुडालेले मटार व चांगल्या पद्धतीने शिजवलेले बटाटे खाई.

स्वयंपाकी कुशल होता. त्याने मिळालेली संधी घेऊन, एकापेक्षा एक रुचकर, पोषक आणि रसदार पदार्थ बनवायला सुरवात केली.

लेना सुस्कारा टाकत नवऱ्याचा विचार करत म्हणाली, "त्याला फ्रेंच स्वयंपाक खूप आवडायचा."

स्वयंपाक्याला शोध लागला, की तो सहा प्रकारचे दारूचे मिश्रण करु शकतो. लेनाने माहिती दिली, की डॉक्टरने तिला दुपारी जेवतांना बर्गंडी आणि रात्रीच्या जेवणात शँपेन प्यायची शिफारस केली आहे. त्या तिघींनी हे देखील समजून घेतले. त्या बडबड्या, आनंदी आणि मजेशीर बायका होत्या. [ बायकांची ती नैसर्गिक फसवी देणगी असते. ] पण बिट्राइस दयनीयपणे उदास झाली व लंगडू लागली. ॲरोचे नाजूक निळे डोळे कडकपणे चमकू लागले. फ्रँकचा खोल आवाज अजून कठोर झाला. ब्रिज खेळताना हा ताण

आपोआप दिसून आला. त्यांचे किती हात होतात, त्यावर त्याना बोलायला नेहमी आवडे व त्यांची चर्चा मित्रत्वाची असे. आता त्यात ठळक कडूपणा आला. कधीकधी एकजण दुसरीला नको इतक्या मोकळेपणे चूक दाखवू लागली. कधीकधी चर्चा वादामध्ये बदलू लागली. त्यात मतभेद होऊ लागले. कधीकधी चर्चांचा शेवट रागाने गप्प बसण्यात होऊ लागला. एकदा मुद्दाम मान खाली घालायला लावल्याबद्दल, फ्रँकने ॲरोला शिव्या दिल्या. दोन तीन वेळा सर्वात मऊ असलेल्या बिट्राइसला रडायची पाळी आली. दुसऱ्या एका प्रसंगी, ॲरोने तिच्या हातातील पत्ते फेकून दिले आणि रागाने खोलीबाहेर निघून गेली. त्यांचे स्वभाव एकमेकींना टोचू लागले. लेना शांतता पसरवत होती.

ती म्हणाली, "ब्रिजवरून भांडणे, हे दयनीय आहे. शेवटी तो फक्त एक खेळ आहे."

हे तिच्यासाठी चांगलेच होते. तिने पूर्ण जेवण घेतले व अर्धी बाटली शँपेन प्यायली. तिचे नशीबही जोरावर होते. ती त्यांचा सगळा पैसा जिंकत होती. एक वहीत गुणांची नोंद ठेवली जात होती. तिचे पैसे सतत वाढत होते.

तिच्यासाठी सर्व ठीक होते. तिचे जेवण भरपूर होते. शिवाय अर्धी बाटली शँपेन ती पित होती. आणि प्रासंगिक नशीबही तिच्या बाजूने होते. ती सतत पैसे जिंकत होती. जगात काही न्याय नव्हता का? त्या एकमेकींचा द्वेष करायला लागल्या. प्रत्येक डावानंतर एका वहीत गुण लिहिले जात होते. तिचे गुण दिवसेंदिवस नियमितपणे वाढत चालले होते. जगात काही न्याय नावाची

गोष्ट होती की नाही? त्या एकमेकींचा द्वेष करू लागल्या. जरी त्या तिचा द्वेष करत असल्या, तरी त्या तिला विश्वासाने त्यांच्या खासगी गोष्टी सांगत राहिल्या. प्रत्येकजण तिच्याकडे जाऊन दुसऱ्या कशा वाईट आहेत, ते सांगत राहिली. ॲरो म्हणाली तिची खात्री आहे, की तिच्यापेक्षा खूप वयस्क बायकांना बघणे, हे तिच्यासाठी वाईट आहे. तिच्या वाटचे दिलेले भाडे बुडवून, उरलेला उन्हाळा व्हेनिसला जाऊन काढणे, हा त्याग करण्यासाठी, तिचे मन चांगले आहे. फ्रँक लेनाला म्हणाली, की ॲरोसारखा काही गंभीर उद्देश नसणे किंवा बिट्राइससइतके मोकळेपणे मूर्ख असणे, याने तिचे समाधान होणार नाही. तिच्या मजबूत मनाने अशी अपेक्षा करणे फार जास्त होते.

ती अपेक्षा उंचावत बोलली, "मला बुद्धीमान संभाषण हवे असते. जेव्हा माझ्यासारखा मेंदू असतो, तेव्हा तुमची मित्रमंडळीदेखील बुद्धीच्या त्याच उंचीची पाहिजेत."

बिट्राइसला फक्त शांतता हवी होती. ती म्हणाली, "मी खरोखर बायकांचा हेवा करते. त्या इतक्या अविश्वासू आणि बोचकारणाऱ्या असतात."

जेव्हा लेनाला येऊन पंधरा दिवस होत आले, तेव्हा तीन जाड बायका एकमेकींशी जवळजवळ बोलतच नव्हत्या. त्या लेनाला भेटल्या पण जेव्हा ती तिथे नव्हती, तेव्हा त्यांनी ढोंग केले नाही. त्यांची भांडणे बंद झाली होती. त्यांनी एकमेकींकडे दुर्लक्ष केले. आणि जेव्हा हे शक्य नव्हते, तेव्हा एकमेकींना थंड नम्रपणे वागवले.

लेना मैत्रिणींबरोबर इटालियन रिव्हिएरामध्ये रहाणार होती. ती ज्या गाडीने आली त्याच गाडीत तिला बसवून, फ्रँकने तिचा निरोप घेतला. तिने पत्त्यात जिंकलेला बराचसा त्यांचा पैसा ती घेऊन चालली होती.

डब्यात चढतांना ती म्हणाली, "मला तुमचे आभार कसे मानावे, तेच कळत नाही. माझी येथील भेट नवलपूर्ण झाली."

फ्रँक हिकसनला एखाद्या पुरुष माणसासारखा कसला अभिमान वाटत असेल, तर तो म्हणजे ती सभ्य बाई होती. आणि तिचे उत्तर भव्यता आणि उदारता याचा संगम साधणारे होते. "लेना, तुझ्याबरोबर आम्हाला सगळ्यांना खूप मजा आली. आम्हाला छानपैकी मेजवानीच मिळाली."

पण गाडी सुटून, जेव्हा ती वळली, तेव्हा तिने असला लांबलचक सुस्कारा टाकला आणि सबंध फलाट जणु तिच्या आत हलला. तिने तिचे भरदार खांदे वळवले आणि घराच्या दिशेने चालू लागली.

थोड्या थोड्या वेळाने ती उद्गारत होती, "उफ! उफ!"

तिने कपडे बदलून तिचा पोहायचा पोशाख घातला. पायात चपला घातल्या. आणि वरून पुरुषांचा गाउन [ त्याचे काही विशेष नाही. ] व एडेनरॉकला गेली. जेवणापूर्वी तिथे अंघोळीला अजून वेळ होता. ती माकडघरातून गेली. तिच्या ओळखीचे कुणी दिसल्यास, शुभ सकाळ म्हणाली. कारण तिला अचानक मानवजातीबद्दल शांत वाटले आणि मग ती स्तब्धपणे थांबली. तिचा तिच्या डोळ्यांवर विश्वास बसेना. तिथे एका टेबलाशी बिट्राइस एकटीच बसलेली होती. तिने मॉलीनेक्समधून आदल्या

दिवशी विकत आणलेला पायजमा घातला होता. तिच्या गळयाभोवती मोत्यांची माळ होती. फ्रँकच्या झटपट नजरेने तिचे केस आताच वळवून आणलेले पाहिले. तिचे गाल, डोळे व ओठही रंगवलेले होते. जाड आणि विशाल, ती होतीच पण ती सुंदर नव्हती, असे कुणी म्हणू शकले नसते. पण ती काय करत होती? फ्रँकच्या मुलभूत चालीप्रमाणे, आळशीपणे वाकत, असंस्कृत माणसासारखी ती बिट्राइसकडे गेली. तिच्या काळया अंघोळीच्या पोषाखात, बिट्राइस जपानी लोक समुद्रात पकडतात, त्या प्रचंड व्हेलसारखी, गावठी भाषेत समुद्रगाईसारखी दिसत होती.

ती तिच्या खर्जातील आवाजात बोलली, “बिट्राइस, तू इथे काय करते आहेस?”

हे लांबच्या डोंगरातून गडगडाट झाल्यासारखे झाले. बिट्राइसने तिच्याकडे थंडपणे पाहिले. ती उत्तरली, “मी खाते आहे.”

“काही सांगू नकोस. तू मला खाताना दिसत नाही आहेस.”

बिट्राइससमोर क्रसॉ, लोणी, स्ट्रॉबेरी जॅम आणि क्रीमचा जग पडला होता.

बिट्राइस छान गरम पावावर लोणी फासकटत होती. मग तिने तो जॅममध्ये गुंडाळला आणि त्यावर दाट क्रीमचा थर दिला.

फ्रँक ओरडली, “तू स्वतःला मारून घेशील.”

बिट्राइस घास तोंडात कोंबत, शांतपणे म्हणाली, “मी काही काळजी करत नाही.”

"तू अनेक पौंडांनी तुझे वजन वाढवशील."

"खड्यात जा."

ती फ्रँकच्या तोंडावर हसली. "अरे बापरे, या क्रसॉला काय छान वास येतो आहे!"

"बिट्राइस, तू मला नाराज केलेस. मला वाटले होते, तू निश्चयाची पक्की आहेस."

"ही तुझी चूक आहे. ती रागीट बाई! तू तिला आहार कमी करायला सांगायला हवे होतेस. पंधरा दिवस मी तिला एखाद्या डुकरासारखे खाताना बघत होते. ते मला अगदी सहन होत नव्हते. मी एक तरी भरपूर जेवण घेणार आहे."

फ्रँकच्या डोळ्यात पाणी भरले. तिला एकदम अशक्त बाईसारखे वाटू लागले. बळकट माणसाने तिला मांडीवर बसवून, तिला कुरवाळलेले व लहान मुलीच्या नावानी हाका मारलेले आवडले असते. मूकपणे ती बिट्राइसच्या शेजारील खुर्चीत धपकन बसली. एक वेटर आला. दयनीयपणे तिने कॉफी आणि क्रसॉ मागवला. ती सुस्कारत म्हणाली, "मीही तेच मागवते."

तिने धापा टाकत, तिचा हात पावापाशी नेला, पण बिट्राइसने ताटली ओढून घेतली.

तो ओरडली, "नको, तू हे खाऊ नकोस. तू मागवलेले येईपर्यंत थांब."

बायका नेहमी एकमेकींना प्रेमाने हाक मारतात, तशी फ्रँकने बिट्राइसला हाक मारली. क्षणार्धात वेटर क्रसॉ, जॅम, लोणी आणि कॉफी घेऊन आला.

एखाद्या सिंहिणीसारखी ती त्याच्या अंगावर ओरडली, "अरे मूर्खा, क्रीम कुठे आहे?

तिने खायला सुरवात केली. तिने अधाशीपणे खाल्ले. समुद्रस्नान व नंतर उन्ह खाऊन, लोक इथे येऊन दारू पिण्यासाठी गर्दी करू लागले. ॲरो आता राजपुत्र रोकामेअरबरोबर फिरत होती. तिने सुंदर रेशमी वस्त्र घातले होते. ते एका हाताने स्वतःभोवती लपेटून घेतले होते, जेणेकरुन ती शक्य तेवढी बारीक दिसावी. तिने डोके उंच ठेवले होते, जेणेकरुन त्याला तिची दुहेरी हनुवटी दिसू नये. ती आनंदाने हसत होती. तिला लहान मुलीसारखे वाटत होते. त्याने तिला नुकतेच सांगितले होते [ इटालियनमध्ये ] की तिचे डोळे भूमध्य समुद्राच्या निळाईप्रमाणे वाटाण्याच्या सूपसारखे दिसत आहेत. त्याचे चकचकीत काळे केस विंचरण्यासाठी, तो पुरुषांच्या खोलीत गेला. पेय पिण्यासाठी त्यांनी पाच मिनिटांनी भेटायचे ठरवले. गालांवर अजून थोडी लाली लावण्यासाठी व ओठ अजून थोडे लाल करण्यासाठी, ॲरो बायकांच्या खोलीत गेली. वाटेत तिला फ्रँक आणि बिट्राइस दिसल्या. ती थांबली. तिचा डोळ्यांवर विश्वास बसेना.

तो ओरडली, "अरे देवा, काय ग डुकरीणींनो, वेटर."

बटाटे आणले गेले. सर्व अरेबियाला देखील इतका सुवास येत नसेल.

तिची ठरलेली भेट ती पार विसरून गेली. क्षणार्धात वेटर तिच्या बाजूला हजर झाला.

तिने आज्ञा दिली, “या बायका काय खात आहेत, ते मलाही आणा.”

फ्रँकने तिचे जड डोके ताटलीवरून वर करून बघितले. ती ओरडली, “मला बदकाच्या यकृताची मऊ पूड आणा.”

बिट्राइस ओरडली, “फ्रँक!”

“गप्प बस.”

“ठीक आहे. मलाही थोडे चालेल.”

कॉफी आणली गेली. गरम रोल्स, क्रीम आणि बदकाच्या यकृताची मऊ पूड आणली गेली. त्यांनी त्यावर क्रीम पसरले आणि खाल्ले. त्यांनी मोठे चमचे भरून जॅम खाल्ला. त्यांनी छान कुरकुरीत पाव मिटक्या मारत खाल्ला. ॲरोच्या प्रेमाचे काय? राजपुत्राला त्याचा राजवाडा रोमला ठेऊ दे. आणि किल्ला अपेनिनेसला ठेऊ दे. त्या काही बोलत नव्हत्या. त्या जे काही करत होत्या, ते फार गंभीर होते. त्या पद्धतशीरपणे खूप जवळीक दाखवत, जेवल्या.

फ्रँक रागाने पण विचारपूर्वक म्हणाली, “मी पंचवीस वर्षात बटाटे खाल्ले नाही.”

बिट्राइस ओरडली, “आम्हा तिघींसाठी तळलेले बटाटे आणा.”

“ठीक आहे, बाईसाहेब.”

बटाटे आणले गेले. सर्व अरेबियाला देखील इतका सुवास येत नसेल.

त्यांनी ते बोटे चाखत खाल्ले.

अ‍ॅरो म्हणाली, “मला जेवणामध्ये कोरडी मार्टीनी आणा.”

फ्रँक बोलली, “अ‍ॅरो, तू जेवणामध्ये कोरडी मार्टीनी घेऊ शकणार नाहीस.”

“घेऊ शकणार नाही? तर मग थांब आणि बघ.”

फ्रँक बोलली, “ठीक आहे. मला दोन कोरडी मार्टीनी आणा.”

बिट्राइस बोलली, “मला तीन कोरडी मार्टीनी आणा.”

त्या आणल्या गेल्या व मोठे मोठे घोट घेत प्यायल्या गेल्या. तिघींनी एकमेकींकडे बघून सुस्कारे टाकले. मागच्या पंधरवड्यातील
गैरसमज दूर झाले. परत एकदा त्यांच्या हृदयात दुसरीबद्दलचे प्रेम उफाळून आले.

खूप समाधान देणारी मैत्री आपण तोडायला निघालो होतो, यावर त्यांचा विश्वास बसेना. त्यांनी बटाटे संपवले.

बिट्राइस बोलली, “मला नवल वाटते, त्यांच्याकडे इक्लेअर चॉकलेट्स असतील का?”

“नक्कीच असतील.” आणि खरेच होती

फ्रँकने एक सबंध तिच्या मोठ्या तोंडात टाकले. ते गिळून दुसरे तोंडात टाकले. पण ते खाल्ल्यावर तिने इतर दोघींकडे पाहिले आणि काल्पनिक राक्षसी लेनाच्या हृदयात सूडबुद्धीने चाकू खुपसला.

“तुम्ही काही म्हणा, पण ती खरेच ब्रिजचा खेळ फारच कुजक्या पद्धतीने खेळत असे.”

ॲरोने कबुली दिली, “बिचारी!”

पण बिट्राइसने अचानक विचार केला, की तिला मेरीनग्यू आवडेल.

अनुवादिकेची ओळख

# डॉ. वृषाली जोशी



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे चाळीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.


मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.

संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.

कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.


सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.


संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२१७४६२४५



वृषाली जोशी
The
RODGERS & HAMMERSTEIN'S
SOUND OF MUSIC
संगीताचा नाद


ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)


*Agatha Christrie*

















ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)


Agatha
Christrie


























वृषाली जोशी
स्टीफन झ्वाइग
बुद्धिबळाची गोष्ट

वृषाली जोशी
The Death of
Ivan Ilych
इव्हान इलयीचचा मृत्यू

वृषाली जोशी
चार्ल्स डिकन्स

सॉमरसेट मॉम
पॅसिफिकच्या बेटांवरील कथा
वृषाली जोशी

कत्तल करायची मेंढी
व इतर कथा
रोआल्ड डाल
वृषाली जोशी
"Personally, I think it's...right under our noses."

वृषाली जोशी
मार्क ट्वेन

वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
लघुकथासंग्रह

वृषाली जोशी
लिओ टॉलस्टॉय
लघुकथासंग्रह

वृषाली जोशी
स्टीफन लिकॉक



वृषाली जोशी
विश्वकथा१



वृषाली जोशी
विश्वकथा-२


वृषाली जोशी
विश्वकथा-३



वृषाली जोशी
विश्वकथा-४


वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
कंटाळवाणी गोष्ट
Classics To Go
A Dreary Story
Anton Chekhov


वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH
MUNRO SAKI


THE PICTURE OF
DORIAN GRAY
द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE


सोमरसेटमॉम
मेजवानीपूर्वी
व इतर कथा
अनुवाद
वृषाली जोशी
BEFORE
THE PARTY



वृषाली जोशी
THE
SHAKESPEARE
STORIES
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअरच्या चार कथा
Much Ado
about
Nothing
Twelfth
Night






शेरलॉक होम्स


भाग १ ते ८ (५० कथा)


ज्या कव्हरवर क्लिक कराल ते पुस्तक उघडेल








**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे पंधरावे वर्ष.**

**डॉ. वृषाली जोशी यांचे हे चाळीसावे पुस्तक.**

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य होत्या. त्यांनी काही काळ विदेशात राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशी वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. वाचकांची अभिरुची उंचावली तरच लेखकांकडूनही दर्जेदार साहित्य निर्माण होईल. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतु मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपलॆ साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे. त्यांनी आजवर ई साहित्यच्या वाचकांसाठी केलेल्या जागतिक साहित्याच्या अनुवादांची दहा हजाराहून अधिक पृष्ठे प्रकाशित झाली आहेत व तो एक विक्रमच आहे.

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही

अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१४), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (४२), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(४०), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(३०), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(१२), जगदिश खांदेवाले(६) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(९), श्याम कुलकर्णी(८), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(३), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर(३), बंकटलाल

जाजू (३), प्रवीण दवणे, आर्या जोशी असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यद्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं ’इ’यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।